# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०४/२०१३

प्रकरण क्र. ०१ :- दि. २०/०२/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ०१ :-

दि. २०/०२/२०१३ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

७

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०४/२०१३

प्रकरण क्र. ०२ :- महिला व बालकल्याण समितीच्या योजना राबविण्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या कामकाजाबाबत अधिकार व कर्तव्य समितीला देणेबाबत. (दि. २१/०१/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. ५)

(सदरचा ठराव फेटाळण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. ३ बाबत दि. २५/०३/२०१३ रोजी वर्तमानपत्रात सुचना देऊन इच्छूक नागरीकांकडून संमतीपत्र / हमीपत्र मागविण्यात आली होती. त्याप्रमाणे दि. ०५/०४/२०१३ रोजी एकूण १५ संमतीपत्र / हमीपत्र दाखल झालेली आहेत. दाखल झालेल्या संमतीपत्र / हमीपत्रावर विचार करणेसाठी दि. १७/०४/२०१३ रोजी मा. आयुक्त यांचे दालनामध्ये सर्व पक्षाचे / गटाचे गटनेते, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये तांत्रिक मुद्यावर वाद झाल्यानंतर संबंधित विभागाकडे अभिप्रायासाठी पत्रव्यवहार केलेला आहे. अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर योग्य त्या उमेदवारांची नावे मा. आयुक्त सो. शिफारस करतील त्यानुसार पुन्हा विषय महासभेपुढे घेण्यात येईल. सबब प्रकरण क्र. ३ मागे घेण्यात येत आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०४/२०१३

**प्रकरण क्र. ०४ :-** **महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वी कच्चे पक्के नाले सफाई / खोदाईच्या अंतर्गत येणाऱ्या कामाच्या प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ०२ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या क्षेत्रातील कच्चे / पक्के नाले सफाई, खोदाई करणे, गाळ / माती वाहतुक करणे आदी कामे पावसाळ्यापूर्वी करणे कामी भाड्याने जे.सी.बी., पोकलन, बोटपोकलन मशिन, हायड्रा मशीन, क्रेन, डंम्पर, टोरस तसेच इमारतीच्या प्रवेश द्वाराजवळ तसेच रोड क्रॉसिंग करुन पावसाच्या पाण्याचा निचरा करणे कामी विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप आवश्यकतेनुसार खरेदी करणे, कच्चे / पक्के नाले सफाई करण्यासाठी कंत्राटी मजुर घेणे त्याचप्रमाणे शहरामध्ये काही ठिकाणी अति सखल परिसर असुन त्या ठिकाणी पावसाळ्या दरम्यान थोडा फार पाऊस झाल्यास त्या परिसरातील नागरी वसाहतीतील घरात व इमारतीमध्ये पावसाचे पाणी शिरुन नागरीकांची गैरसोय होत असते. अशाठिकाणी कायमस्वरुपी पावसाच्या पाण्याचा उपसा करणे कामी विविध क्षमतेचे संक्शन पंप ठेवण्यात यावे. याकरीता निविदामध्ये मासिक दर मागविण्यात यावे व अन्य ठिकाणाकरीता प्रती तासाप्रमाणे दर मागविण्यात यावे जेणेकरुन पावसाळ्यात नागरीकांची गैरसोय होणार नाही. वरील कामाच्या निविदा मागविण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत असून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील वॉर्ड सफाई / नाले सफाई या लेखाशिर्षातील तरतुद अपुरी पडल्यास या कामी आरोग्य व सोयी तसेच रुग्णालये व दवाखाने अंतर्गत असलेल्या लेखा शिर्षातील शिल्लक तरतुदीतून पुर्नःविनियोजन करण्यास ही सभा मान्यता देत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रातील एकात्मीक नाले बांधणे ह्या योजनेअंतर्गत नाले बांधकाम करणेकामी ज्या नाल्यांचे बांधकाम करण्याचे कार्यादेश देण्यात आले आहेत त्या नाल्याची सफाई व खोदाई करुन निघालेला गाळ, माती, वाहतुक करणे तसेच नाल्याचा प्रवास सुरळीत करणे इत्यादी कामे संबंधीत ठेकेदाराकडुन करुन घेण्यात यावी. सदरची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण होतील ह्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने दक्षता घ्यावी.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील नाले सफाई खोदाई करणेकामी झालेल्या खर्चास ही सभा कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- जुबेर इनामदार**

**सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र मेहता यांनी सदर ठरावात खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

आपण शहरात बघितले तर २० फुट, ३० फुट, ४० फुट रुंदीचे हे नाले दिसतात पण जिकडुन शेवटी पाण्याचा निचरा होतो ती जाफरी खाडी असु द्या, राई, मुर्धा, मोर्वा असु द्या ह्या शहराचे पाणी तिकडुन खाडीत जात असते ते नाले आपण बघितले तर पाच फुटाचे राहीले आहेत. त्यामध्ये पूर्वी दोन बोटी यायच्या, एक यायची आणि एक जायची ह्या प्रकारे ती खाडी होती. आतापर्यंत जेवढ्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत त्यामध्ये कधीपण त्या खाडीचा समावेश करण्यात आला नाही भग तुमच्याकडे तरतुद नसते, ठेकेदारानी निविदा भरलेली नसते. म्हणून त्याची साफसफाई कधी होतच नाही. सुचना अशी आहे की, खाडीचा जो काही खर्च असेल त्याला आर्थिक प्रशासकीय मान्यता द्यावी व त्या खाडीची साफसफाई करुन घेण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(1)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. ०६/०४/२०१३ मा. महासभा सुचना क्रमांक ०१ यानुसार

## मा. महासभा गुरुवार दि. १८/०४/२०१३

प्रकरण क्र. :- ०५ मिरारोड येथील मौजे पेणकरपाडा येथील विकास आराखड्यातील आरक्षण क्र. १८७, १८८, १८९, १९० संचलन व देखभाल व दुरुस्ती करीता करारनाम्याचे नुतनीकरण करण्यास मान्यता देणे.

ठराव क्र. :- ( 03)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात खालीलप्रमाणे आरक्षणे आहेत.

| अ.क्र. | अरक्षण क्रमांक | क्षेत्र | प्रयोजन |
|---|---|---|---|
| १ | १८७ | ११०००.०० चौ. मिटर | बगीचा |
| | १८८ | ७६००.०० चौ. मिटर | दफनभूमी |
| | १८९ | ४७००.०० चौ. मिटर | स्मशानभूमी |
| | १९० | ४५००.०० चौ. मिटर | दफनभूमी |
| | १९६ | १०८५०.०० चौ. मिटर | बगीचा (भागशः) |

वरील आरक्षणे स्वखर्चाने विकसीत करुन त्याचे संचलन देखभाल व दुरुस्ती करण्यास प्रशासकीय ठराव क्र. ४५ दि. १९/०४/२००२ च्या निर्णयानुसार दि. १९/०४/२००२ रोजीच्या पत्रान्वये मे. अस्मिता कंन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना परवानगी देण्यात आलेली आहे. सदर संस्थेसोबत दि. २३/०४/२००२ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. सदर करारनामा हा ११ वर्षे मुदतीकरीता असून सदर मुदत ही दि. २२/०४/२०१३ रोजी संपत आहे. सदर करारनाम्यातील अटीनुसार सदर करारनाम्याचे नुतनीकरण सदर संस्थेच्या इच्छेवर अवलंबून राहील असे नमूद आहे. सदर आरक्षणाच्या जागेचे रु. १/- प्रति महिना या नाममात्र दराने भाडे आकारण्यात येत आहे.

मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी सदर आरक्षणाचे संचलन व देखभाल दुरुस्ती पुढील कालावधी करीता करण्याबांबत कळविलेले आहे. सदर आरक्षणापैकी आरक्षण क्र. १८७, १८८, १८९ व १९० मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या संस्थेमार्फत विकसित करण्यात आलेली असून त्याचा वापर सुरु आहे. आरक्षण क्र. १९६ ही जागा सीआरझेड क्षेत्राने बाधीत होत असल्याने विकसित करण्यात आलेली नाही.

सदरचे आरक्षण संस्थेमार्फत विकसित करुन त्यावर आवश्यक देखरेख केल्याने बांधकामावर होणा-या महानगरपालिकेच्या निधीची बचत झालेली आहे. तरी मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या संस्थेस पुढील कालावधी सदर आरक्षणे संचलन, देखभाल व दुरुस्ती करण्याकरीत करारनाम्याचे नुतनीकरण करावे व संस्थेला सदर जागेमध्ये होर्डीग्ज उभारुन जाहीरात करण्याचीही परवानगी देण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

सूचक : प्रमोद सामंत

अनुमोदक :

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

महापौर

सौ. कॅटलीन परेरा

मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईदर महानगरपालिका

(6)

## मा. महासभा दि. १८/०४/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ०६ ) :-** विकास कामांना प्रशासकिय / आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ( ०४ ) :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक, तसेच विकास योजनेतील रस्त्याखालून विविध यंत्रणाच्या केबल्स, पाईप लाईन इ. टाकण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. संबधित यंत्रणाकडून, नविन केबल्स टाकणे, जलवाहिनी टाकणे त्याची दुरूस्ती करणे इत्यादीसाठी आवश्यक परवानगी घेऊन व शुल्क भरून खोदण्यात येतात. सदर दुरूस्ती शुल्कातून बाधित रस्ते दुरूस्ती केले जातात. यासोबत अतीवृष्टीमुळे पडणारे खड्डे देखिल महानगरपालिकेकडे विविध यंत्रणामार्फत रस्ते दुरूस्तीसाठी जमा केलेल्या रक्कमेतून, दुरूस्ती करून घेण्यात येतात. मागील पाच वर्षात विविध यंत्रणाकडून रस्ते दुरूस्ती करण्यासाठी जमा केलेली रक्कम व प्रत्यक्षात खर्च झालेली रक्कम यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | संबंधित यंत्रणाकडून जमा रक्कम | खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २००८-२००९ | रू. ५.२० कोटी | रू. ८.५४ कोटी |
| २ | २००९-२०१० | रू. ८.१३ कोटी | रू. ९.२४ कोटी |
| ३ | २०१०-२०११ | रू. १३.२९ कोटी | रू. १३.६५ कोटी |
| ४ | २०११-१२ | रू. १४.३० कोटी | रू. १३.४४ कोटी |
| ५ | २०१२-१३ | रू. २४.४४ कोटी | रू. १६.०० कोटी |

महानगरपालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पात रस्ते दुरूस्ती करीता योग्य तरतुद करण्यात येते. सदर तरतुदीतून दरवर्षी आवश्यक रक्कमेच्या प्रभाग निहाय वार्षिक मुदतीच्या निविदा मागविण्यात येतात. सदर वार्षिक दर मा. स्थायी समिती सभेकडून मंजूर करून घेण्यात येतात व खोदाई परवानग्या दिल्यावर तसेच पावसाळ्यात पडणाऱ्या खड्डे दुरूस्तीसाठी आवश्यकते नूसार अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम प्राधिकरणाची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेऊन वार्षिक मंजूर दराने संबधित ठेकेदारास कार्यादेश देऊन रस्ते दुरूस्तीची कामे करून घेण्यात येतात.

सन २०१३-१४ या वर्षाकरीता रस्ते देखभाल, दुरूस्ती, पुर्नःपृष्ठीकरण या लेखाशिर्षाखाली रू. २०.०० कोटी एवढ्या रक्कमेची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. सदर रक्कमेपैकी रू. १६.०० कोटी रक्कमेच्या वार्षिक दराच्या प्रभाग निहाय निविदा मागवून दर निश्चित करून रस्ते दुरूस्तीची करावयाची सर्व कामे आवश्यकतेनूसार अंदाजपत्रके तयार करून संबधित ठेकेदाराकडून करून

घेता येतील. तसेच पावसाळ्यात पडणारे खड्डे देखिल तातडीने अंदाजपत्रके तयार करून मंजूर दराने ठेकेदाराकडून करून घेण्यात येतील. सन २०१२-१३ या वर्षात देखभाल व दुरुस्तीची कामे वार्षिक निविदा मागवून करण्यात आली आहेत त्याकामी रु. ११.०० कोटी रकमेच्या प्रभाग निहाय निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर खर्चास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या सहा प्रभाग समित्या तयार करण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला असून सदर प्रभाग समिती निहाय अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फुटपाथ / नाले / गटारे / फुटपाथवर आर.सी.सी. / लोखंडी/ फायबर झाकणे बसविणे, स्लॅब, पेव्हर ब्लॉक, कर्बस्टोन दुरुस्ती करणे कामासाठी प्रभाग निहाय रु. ५०.०० लक्ष रक्कमेच्या निविदा मागवून कार्यादेश देण्यात आलेले होते. त्यानुसार एकूण रु. २.०० कोटी खर्च अपेक्षित होता. सदर खर्चास ही सभा प्रशासकिय / आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच चालू वर्षाकरीता गटारे, फुटपाथ व स्लॅब मधील झाकणासाठी वार्षिक निविदासाठी रु. २.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास ही सभा प्रशासकिय व आर्थिक मान्यता देत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी निविदा मागविण्यात आली होती. मा. स्थायी समिती सभेने मंजूर केलेल्या दरानुसार रु.६०.३३६ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक:- श्री ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०४/२०१३

**प्रकरण क्र. ०७ :-** **भाईंदर (पूर्व) इंद्रलोक भागातील बगीचा आरक्षण क्र. २२१ चे "हिन्दु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यान" असे नामकरण करण्याबाबतच्या विनंतीवर निर्णय होणेबाबत.**

**ठराव क्र.०५ :-**

भाईंदर पूर्व इंद्रलोक भागातील बगीचा आरक्षणाचे "हिन्दु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान" असे नामकरण करण्याबाबतच्या ठरावास / निर्णयास राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व बहुजन विकास आघाडी या पक्षांचा विरोध नसून प्रशासनाकडे आलेला नामकरणाचा प्रस्ताव व सदर प्रस्ताव एकत्र आणून पुन्हा मा. महासभेत विषय आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | सिंग मदन उदितनारायण | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | पाटील रोहिदास शंकर | |
| ६ | वंदना मंगेश पाटील | ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ७ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ८ | मेहता डिंपल विनोद | |
| ९ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | ९ | केळुसकर प्रशांत नारायण | निरंक |
| १० | ग्रिटा स्टिफन फॅरो | १० | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| ११ | डॉ. आसिफ गुलाब शेख | ११ | रावल भगवती जयशंकर | |
| १२ | गोविंद हेलन जॉर्जी | १२ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १३ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १३ | शरद केशव पाटील | |
| १४ | लियाकत ग. शेख | १४ | मेघना दिपक रावल | |
| १५ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १५ | जैन गिता भरत | |
| १६ | खण्डेलवाल सुरेश | १६ | जैन रमेश धरमचंद | |
| १७ | नरेश तुकाराम पाटील | १७ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १८ | शबनम लियाकत शेख | १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| १९ | अनिता जयवंत पाटील | १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | |
| २० | म्हात्रे परशुराम प्रभाकर | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | भावसार शिल्पा कमलेश | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | वंदना रामदास चक्रे | २२ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २३ | भोईर कमलेश यशवंत | २३ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २४ | रविंद्र भिमदेव माळी | २४ | जैन दिनेश तेजराज | |
| २५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २५ | अरोरा दिपिका पंकज | |
| २६ | पिसाळ मनिषा नामदेव | २६ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २७ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २७ | अनिल बाबुराव भोसले | |
| २८ | पाटील सुनिता कैलास | २८ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| २९ | वेतोसकर राजेश शंकर | २९ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३० | प्रभात प्रकाश पाटील | ३० | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३१ | बगाजी शर्मिला विल्सन | ३१ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३२ | रकवी सुहास माधवराव | ३२ | तारा विनायक घरत | |
| ३३ | झिनत रऊफ कुरेशी | ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३४ | मोहम्मद फरिद सिंद्धीक कुरेशी | ३४ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३५ | पुजारी कांचना शेखर | ३५ | जयमाला किशोर पाटील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३६ | काझी रशीदा जमील | ३६ | संदिप मोहन पाटील | |
| ३७ | इनामदार जुबेर | ३७ | परमार अनिता भरत | |
| ३८ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३८ | पाटील प्रणाली संदिप | |
| ३९ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | ३९ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ४० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ४० | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ४१ | डिसा मर्लिन मर्विन | ४१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ४२ | भट दिप्ती शेखर | | | |
| ४३ | विराणी रेखा अनिल | | | |
| ४४ | सामंत प्रमोद जयराम | | | |
| ४५ | भोईर भावना राजू | | | |
| ४६ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४७ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०४/२०१३

प्रकरण क्र. ०८ :- श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी, यांच्या स्वेच्छा निवृत्तीबाबत...

ठराव क्र. :- ०६

महानगरपालिका आस्थापनेवरील श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी हे दि. ०१/०४/१९९० पासून तत्कालीन नगरपरिषदेत वाहन चालक या पदावर नियुक्ती असुन, सद्यःस्थितीत अग्निशमन विभागात पदोन्नतीने सहाय्यक अग्निशमन अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.

श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांनी दि. १६/०२/२०१३ रोजीच्या अर्जामध्ये त्यांचा अखंडीत सेवेचा कालावधी २० वर्षापेक्षा जास्त झाला असल्याने, त्यांनी 'स्वेच्छा निवृत्ती' घेण्याचा निर्णय घेतला असुन दि. १६/०२/२०१३ रोजीचे विनंती अर्जाने कळविले आहे. श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांनी कार्यालयास विनंती अर्ज सादर केला त्यावेळी त्यांची २२ वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे. श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांनी सेवा कालावधीत ज्या-ज्या विभागात काम केले त्या संबंधित विभागाकडून ना-देय दाखला मागणी केलेली आहे. त्यानुसार अग्निशमन विभाग, (उप-आयुक्त) व लेखा विभाग यांचेकडील ना-देय दाखला प्राप्त झालेले असुन महानगरपालिकेस त्यांचेकडून कोणत्याही प्रकारे येणे नाही.

प्रस्तावित उपरोक्त श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांचा अखंडीत सेवेचा कालावधी २२ वर्षे पेक्षा जास्त झाला असल्याने त्यांचे विनंती अर्जानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्त) नियम-१९८२ चे नियम ६६ अंतर्गत तरतुदी अन्वये अर्ज केल्या दिनांकापासुन तीन महिन्याचे आत सेवा निवृत्ती स्विकारली नाही तर तिन महीन्यानंतर सेवा निवृत्ती अंमलात येईल. अशी तरतुद असल्यामुळे स्वेच्छा निवृत्तीचे आदेश मंजूर करुन तीन महिने मुदतीच्या अंतिम दिनांकाच्या एक दिवस आधी निर्गमीत करणे उचीत आहे.

श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांची वेतनश्रेणी (९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४००) अशी असुन सहाय्यक आयुक्त या पदाचे समकक्ष वेतनश्रेणीत त्यांचे वेतन असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अंतर्गत तरतुदी अन्वये नियुक्ती प्राधिकरी मा. महासभा असल्याने श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडिस, सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांचे स्वेच्छा निवृत्तीस ही सभा मान्यता देत आहे. यापूढील प्रशासकीय कार्यवाही मा. आयुक्तांनी करावी.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटिल

**अनुमोदन :-** श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. ०६/०४/२०१३ मा. महासभा सुचना क्रमांक ०१ यानुसार
## मा. महासभा गुरुवार दि. १८/०४/२०१३

**प्रकरण क्र. :- ( ०८ ) श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर (सध्या निलंबीत) यांना सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत.**

**ठराव क्र . :- ( ०७ )**

श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांना विविध प्रकरणी हलगर्जीपणा व निष्काळजीपणा कारणास्तव कार्यालयाचे आदेश जा. क्र. मनपा/आस्था/७२७/२०१०-११, दि. ३०/०९/२०१० अन्वये निलंबीत करण्यात आलेले आहे. श्रीमती सिमा मिश्रा, यांचे निलंबन महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७८, दि. ०१/०२/२०११ अन्वये कायम करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्रीमती सिमा मिश्रा यांचेवर विविध दोन प्रकारचे आरोप ठेवून विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. श्रीमती सिमा मिश्रा, यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप खालीलप्रमाणे आहेत.

१) संगणक खरेदी,

२) मालमत्ता करातील नोंदीमधील फेरफार,

विभागीय चौकशीमध्ये वरील दोन आरोपांपैकी अ.क्र. ०२ दोषारोप सिध्द होत नसल्याचे चौकशी अहवालात निष्पन्न झालेले आहे आणि सदर दोन आरोपांबाबत चौकशी अहवालातील तपशिल विचारात घेता सदरचा चौकशी अहवाल स्विकृत करुन अ.क्र. ०२ चे आरोपांबाबत श्रीमती सिमा मिश्रा, यांना दोषमुक्त करण्यास हरकत नाही.

तथापि वरील अ.क्र. ०१ चा आरोप सिध्द झाल्याचे विभागीय चौकशीत निष्पन्न झाले आहे व तसेच श्रीमती सिमा मिश्रा, यांना संगणक खरेदीमध्ये आवश्यक ती सचोटी व कर्तव्यपारायणता न राखता जो हलगर्जीपणा व निष्काळजीपणाचा आरोप सिध्द झालेला आहे,

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५६ अन्वये श्रीमती सिमा मिश्रा यांची एक वार्षिक वेतन वाढ कायमस्वरुपी (पुढील वेतन वाढीवर परिणामासह) रोखण्याचे शास्ती लादण्याचे वेगळे आदेश काढण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी श्रीमती सिमा मिश्रा, यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे आणि ज्याअर्थी विभागीय चौकशीत सिध्द झालेल्या आरोपाबाबत शास्ती लादण्याचे आदेश काढण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी आरोपाचे स्वरुप, चौकंशी अहवालातील तपशिल इत्यादी विचारात घेता आरोप क्र. ०१ मधील संगणक खरेदी प्रकारणी पुरवठादारास अंतिम देयक प्रदान करणे व संभाव्य नुकसान वसुलीस अधिन राहून श्रीमती सिमा मिश्रा, यांना सेवेत पुर्नस्थापित करण्यास हरकत नाही.

आणि ज्याअर्थी श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांची मूळ वेतनश्रेणी रु. ९३००-३४८००, ग्रेड वेतन रु. ४४००, द्वितीय गटातील म्हणजे सहा. आयुक्त समकक्ष श्रेणीतील किंवा त्यापेक्षा जास्त श्रेणीतील असल्यामुळे अशा श्रेणीतील निलंबीत अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत पुर्नस्थापित करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण म्हणून महानगरपालिका सभेस आहेत.

तरी अपचारीक तथा निलंबीत श्रीमती सिमा मिश्रा, सिस्टीम मॅनेजर यांना दोषारोप क्र. ०२ बाबत दोषमुक्त करुन आरोप क्र. ०१ मधील संगणक खरेदी प्रकरणी पुरवठादारास अंतिम देयक प्रदान करणे व संभाव्य नुकसान वसूलीस अधिन राहून महानगरपालिका सेवेत पुर्नस्थापित करणेबाबत ही सभा मान्यता देत आहे. परंतू असे करताना त्यांचा मूळ पदावर (सिस्टीम मॅनेजर) आता आणि यापूढे कधीही नेमणूक करण्यात येऊ नये. त्यांना महापालिकेच्या इतर कोणत्याही पदावर रुजू करण्यांत यावे, असा मी ठराव मांडत आहे.

सूचक :
श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :
श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजूर
**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**महापौर**
**सौ. कॅटलीन परेरा**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०४/२०१३

**अभिनंदन ठराव क्र. ०८ :-**

हिंदी चित्रपट सृष्टीतील आपले सर्वांचे आवडते खलनायक श्री. प्राण किशन सिकंद यांना यावर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार बहाल झालेला आहे. त्याबद्दल ही मा. महासभा त्यांचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १८/०४/२०१३

**दु:खवठा ठराव क्र. ०९ :-**

पत्रकार श्री. राजा मयाल यांचे वडील श्री. महिपाल सिंह मयाल यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी दु:खद निधन झाले आहे. म्हणून शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(14)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १६/०५/२०१३

प्रकरण क्र. १० :- दि. २०/०३/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

(सदरचा विषय मागे घेण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १६/०५/२०१३

**प्रकरण क्र. ११ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत रहिवास वापराकरिता लागणारे आवश्यक वाहनतळ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्र. १० :-**

मंजूर विकास नियंत्रण नियमावली विनियम ३५ तक्ता क्र. १२ नुसार रहिवासी बांधकामास प्रशासनाने गोषवाऱ्यात दर्शविल्याप्रमाणे वाहनतळाबाबत तरतुद दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात तसेच महानगरपालिका क्षेत्रात इमारतीचे होत असलेले विकास व वाढती लोकसंख्या तद्अनुषंगाने शहरातील वाढती वाहने याचा विचार करता महानगरपालिकेस प्राप्त असलेले विकास प्रस्तावामध्ये वाहनतळामध्ये वाढ होणे गरजेचे आहे. मात्र प्रशासनाने गोषवाऱ्या मधील शहरामध्ये राज्य शासनाने ठरविलेल्या धोरणाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याचा उल्लेख केलेला नाही. शहरामध्ये सद्यस्थितीत एम.एम.आर.डी.ए., म्हाडाच्या माध्यमातून रहिवासी संकुल उभारण्यात येत आहेत व प्रस्तावित आहेत. तसेच क्लस्टर डेव्हलपमेंट व शासनाकडे मंजूरीकरीता पाठविण्यात आलेल्या जुन्या इमारतींचा पुर्नविकास करण्याची मान्यता प्राप्त झाल्यास सर्व बाबीकरीता लागणारे निकष स्पष्ट होत नाही. तथापी प्रशासनाने रहिवासी क्षेत्रामध्ये वाहनतळ बनविण्याचा विषय या सर्व बाबीचा आढावा तसेच सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचना घेऊन फेरप्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेकरीता सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(16)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १६/०५/२०१३

अभिनंदन ठराव क्र. ११ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. सदस्य श्री. लियाकत शेख यांची एम.एम.आर.डी.ए वर निवड झाल्याबद्दल मी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १६/०५/२०१३

(17)

**दुःखवटा ठराव क्र. १२ :-**

मिरा भाईंदर शहरातील एक प्रतिष्ठित नागरीक, अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे माजी कार्यवाहक, आणि मराठी चित्रपट सृष्टीशी संबंधित असलेले एक कलाकार ज्यांचा आपण याच सभागृहामध्ये कलावंत म्हणून दोन वेळा सत्कार केला, ते खारीगावचे सुपूत्र श्री. जगतकुमार आत्माराम पाटील यांचे नुकतेच अपघाती निधन झाले आहे. त्यांच्या दुःखवट्याचा ठराव मी इथे मांडत आहे. त्याचबरोबर १९९१ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीतील पहिल्या नगरसेविका सौ. वर्षा पाटील यांचेदेखील निधन झालेले आहे, त्यांचा देखील दुःखवट्याचा ठराव मी इथे मांडत आहे. तसेच महाराष्ट्र विधानसभेचे मा. विरोधी पक्षनेते श्री. एकनाथ खडसेजी यांचे चिरंजीव श्री. निखील खडसेजी यांचे आकस्मिक निधन दि. १ मे रोजी झाले. त्यांचाही शोकप्रस्ताव आम्ही या ठिकाणी मांडत आहोत.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि.०५/०६/२०१३

## ।। अभिनंदन ठराव ।।

ठराव क्र. १३

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सरचिटणीस व मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जेष्ठ नगरसेवक माजी विरोधी पक्ष नेते डॉ.आसिफ गुलाब शेख, यांची **महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार महामंडळ अध्यक्ष पदी (राज्य मंत्री दर्जा) नियुक्ती** करून त्यांचा बहुमान केलेला आहे. तसेच मिरा भाईंदर शहराचा देखील हा सन्मान व गौरव आहे.

डॉ.आसिफ गुलाब शेख हे मिरा भाईंदरचे सुपुत्र असून भाईंदर सेकंडरी स्कूल व वसई वर्तक कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. ते एम्.कॉम. बी.एड्. पी.एच्.डी. उच्चशिक्षित असून ते चार वेळा नगरसेवक निवडून आलेले आहेत. त्यांनी यापूर्वी २० वर्षे मुंबईतील दै.नवाकाळ, दै.सांज लोकसत्ता, दै.सांज जनसत्ता (एक्सप्रेस ग्रुप), दै.नवभारत टाइम्स (टाइम्स ग्रुप) आदी नामांकित व लोकप्रिय दैनिकांमध्ये यशस्वीरित्या पत्रकारिता केलेली आहे. तसेच त्यांनी पत्रकारितेपासून आपल्या सामाजिक कार्याची कारकिर्द सुरू करून अनेक सामाजिक व लोकोपयोगी कामे जनतेसाठी केलेली आहेत. डॉ.आसिफ शेख यांनी मिरा भाईंदर शहराचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष पद, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रभाग समितीचे सभापती व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारीही यशस्वीरित्या सांभाळलेली आहे. सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व अध्यात्मिक क्षेत्रात देखील त्यांचा नेहमीच सक्रीय सहभाग व सहकार्य असतो. तसेच जनहिताच्या कामात देखील अग्रेसर असतात. डॉ.आसिफ शेख हे अजातशत्रू व मितभाषी असून त्यांचा समाजातील सर्व जात, पात, धर्म, पक्ष, संप्रदाय व घटकांबरोबर सदैव प्रेम, आपुलकी, माणुसकीचे संबंध असून त्यांचा जनसंपर्क देखील दांडगा असल्याने ते समाजातील सर्व घटकांत लोकप्रिय आहेत.

डॉ.आसिफ शेख यांना **महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार महामंडळ अध्यक्ष पदी (राज्य मंत्री दर्जा) नियुक्ती** करून मिरा भाईंदर शहराचा सन्मान व गौरव केल्याबद्दल ही महासभा डॉ.आसिफ शेख यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करीत आहे. तसेच त्यांच्या भावी कार्यास मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

सूचक — श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन — श्री. नरेंद्र मेहता

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०५/०६/२०१३

**प्रकरण क्र. १४ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांतर्गत श्री गणेश विसर्जन, कार्तिक पौर्णिमा, छटपूजा, वेलंकनी उत्सव, गणगौर, रमजान ईद, बकरी ईद, दुर्गा विसर्जन, माघी गणपती, दशमादेवी विर्सजन कार्यक्रमाकरीता विविध व्यवस्था करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. ७६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण लोकसंख्या सुमारे ८ लक्ष एवढी असून शहरात सर्वधर्मिय नागरीक एकसंघपणे राहत आहेत. सदर विविध धर्मिय नागरिकांमार्फत विविध सण एकत्रितपणे मोठया उत्साहाने साजरे केले जातात. सदर सणांमध्ये प्रामुख्याने श्रीगणेशोत्सव, नवरात्र, रमजान ईद, बकरी ईद, गणगौर, कार्तिक पौर्णिमा, छटपूजा, दशमादेवी उत्सव, वेलंकनी उत्सव, माघी गणेशोत्सव इत्यादी सणांचा समावेश असतो. सदर सण / उत्सव सुरळितपणे व सुरक्षितपणे साजरे केले जावे म्हणून संबंधित तलाव / चौपाटी येथे विद्युत व्यवस्था करणे, प्रखर रोषणाईचे दिवे लावणे, लाकडी कठडे बांधणे, सभा मंडप उभारणे, व्दार, जनरेटर, टेबल, खूर्च्या, ध्वनीक्षेपण यंत्रणा, बोटी, लाकडी तराफे, निर्माल्य कलश, क्रेन, फोर्क लिफ्ट् इत्यादी व्यवस्था करावी लागते,.त्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | सणाचे / उत्सवाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | गणेशोत्सव विसर्जन व्यवस्था | रु. ५०.०० लक्ष |
| २ | रमजान ईद | रु. ३.०० लक्ष |
| ३ | छटपुजा / दशमादेवी उत्सव | रु. ५.०० लक्ष |
| ४ | कार्तिक पौर्णिमा | रु. ३.०० लक्ष |
| ५ | बकरी ईद | रु. ३.०० लक्ष |
| ६ | गणगौर | रु. ५.०० लक्ष |
| ७ | वेलकंनी उत्सव | रू. ३०.०० लक्ष |
| ८ | नवरात्र विसर्जन | रु. ५.०० लक्ष |
| ९ | माघी गणपती/ साखर चौथ विसर्जन व्यवस्था | रु. ३.०० लक्ष |
| १० | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे तसेच जनता दरबार व्यवस्था | रु. ३.०० लक्ष |
| ११ | श्रीगणेश विसर्जन,माघी गणपती विसर्जन, नवरात्र विसर्जन, छटपूजा, दशमादेवी उत्सव प्रसंगी करावयाच्या अतिरिक्त उपाययोजना | |
| | अ) लाकडी तराफे व्यवस्था | रु. १४.०० लक्ष |
| | ब) फोर्क लिफ्ट् व्यवस्था | रु. २.०० लक्ष |
| | क) हायड्रॉलिक क्रेन व्यवस्था | रु. २.०० लक्ष |
| | ड) बोटीची व्यवस्था | रु. १२.०० लक्ष |

उपरोक्त उपाययोजना करण्यासाठी दरवर्षी वार्षिक दराच्या निविदा मागवून सदर खर्च करण्यात येतो. त्याच धर्तीवर चालू वर्षातील उपरोक्त सणांकरीता विविध व्यवस्था करणे कामी अनुभवी कंत्राटदाराकडुन वार्षिक निविदा मागविण्यास तसेच खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. बर्नड डिमेलो यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगर क्षेत्रातील सर्व धर्मिय उत्सवांतर्गत करण्यात येणाऱ्या व्यवस्थेमध्ये उत्तन, पाली व डोंगरी, चौक येथील मे महिन्यात होणाऱ्या फातीमा मातेच्या उत्सवाचा समावेश करावा.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. मोहम्मद फरिद सिंद्धीक कुरेशी व अनुमोदक श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांतर्गत श्री गणेश विसर्जन, कार्तिक पौर्णिमा, छटपूजा, वेलंकनी उत्सव, गणगौर, रमजान ईद, बकरी ईद, दुर्गा विसर्जन, माघी गणपती, दशमादेवी विसर्जन कार्यक्रमाकरीता विविध व्यवस्था करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरीबाबतचा विषय पटलावर आलेला आहे. तसेच शिवजयंती, आंबेडकर जयंती व भाईंदर, डोंगरी, उत्तन, काशिमिरा येथील दर्गावरील उरुससाठी प्रत्येकी तीन लाखांची तरतुद करावी. याबाबत माझी अशी सुचना आहे की, निविदा काढताना प्रभागनिहाय निविदा काढण्यात याव्यात. जेणेकरुन स्थानिक नागरीकांना सोयीस्कर होईल व प्रशासनामार्फत संबंधीत ठेकेदारावर नियंत्रण ठेवणे सोपे जाईल.

**ठराव सुचनेसह सर्वानूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

पालिका

## मा. महासभा दि. ०५/०६/२०13

**प्रकरण क्र. १४ :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांतर्गत श्री गणेश विसर्जन, कार्तिक पौर्णिमा, छटपूजा, वेलंकनी उत्सव, गणगौर, रमजान ईद, बकरी ईद, दुर्गा विसर्जन, माघी गणपती, दशमादेवी विर्सजन कार्यक्रमाकरीता विविध व्यवस्था करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. १६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण लोकसंख्या सुमारे ८ लक्ष एवढी असून शहरात सर्वधर्मिय नागरीक एकसंघपणे राहत आहेत. सदर विविध धर्मिय नागरिकांमार्फत विविध सण एकत्रितपणे मोठया उत्साहाने साजरे केले जातात. सदर सणांमध्ये प्रामुख्याने श्रीगणेशोत्सव, नवरात्र, रमजान ईद, बकरी ईद, गणगौर, कार्तिक पौर्णिमा, छटपूजा, दशमादेवी उत्सव, वेलंकनी उत्सव, माघी गणेशोत्सव इत्यादी सणांचा समावेश असतो. सदर सण / उत्सव सुरळितपणे व सुरक्षितपणे साजरे केले जावे म्हणून संबंधित तलाव / चौपाटी येथे विद्युत व्यवस्था करणे, प्रखर रोषणाईचे दिवे लावणे, लाकडी कठडे बांधणे, सभा मंडप उभारणे, व्दार, जनरेटर, टेबल, खूर्च्या, ध्वनीक्षेपण यंत्रणा, बोटी, लाकडी तराफे, निर्माल्य कलश, क्रेन, फोर्क लिफ्ट इत्यादी व्यवस्था करावी लागते, त्यास खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | सणाचे / उत्सवाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | गणेशोत्सव विसर्जन व्यवस्था | रु. ५०.०० लक्ष |
| २ | रमजान ईद | रु. ३.०० लक्ष |
| ३ | छटपुजा / दशमादेवी उत्सव | रु. ५.०० लक्ष |
| ४ | कार्तिक पौर्णिमा | रु. ३.०० लक्ष |
| ५ | बकरी ईद | रु. ३.०० लक्ष |
| ६ | गणगौर | रु. ५.०० लक्ष |
| ७ | वेलकंनी उत्सव | रू. ३०.०० लक्ष |
| ८ | नवरात्र विसर्जन | रु. ५.०० लक्ष |
| ९ | माघी गणपती/ साखर चौथ विसर्जन व्यवस्था | रु. ३.०० लक्ष |
| १० | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे तसेच जनता दरबार व्यवस्था | रु. ३.०० लक्ष |
| ११ | श्रीगणेश विसर्जन,माघी गणपती विसर्जन, नवरात्र विसर्जन, छटपूजा, दशमादेवी उत्सव प्रसंगी करावयाच्या अतिरिक्त उपाययोजना | |
| | अ) लाकडी तराफे व्यवस्था | रु. १४.०० लक्ष |
| | ब) फोर्क लिफ्ट व्यवस्था | रु. २.०० लक्ष |
| | क) हायड्रॉलिक क्रेन व्यवस्था | रु. २.०० लक्ष |
| | ड) बोटीची व्यवस्था | रु. १२.०० लक्ष |

उपरोक्त उपाययोजना करण्यासाठी दरवर्षी वार्षिक दराच्या निविदा मागवून सदर खर्च करण्यात येतो. त्याच धर्तीवर चालू वर्षातील उपरोक्त सणांकरीता विविध व्यवस्था करणे कामी अनुभवी कंत्राटदाराकडुन वार्षिक निविदा मागविण्यास तसेच खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगर क्षेत्रातील सर्व धर्मिय उत्सवांतर्गत करण्यात येणाऱ्या व्यवस्थेमध्ये उत्तन, पाली व डोंगरी, चौक येथील मे महिन्यात होणाऱ्या फातीमा मातेच्या उत्सवाचा समावेश करावा.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांतर्गत श्री गणेश विसर्जन, कार्तिक पौर्णिमा, छटपूजा, वेलंकनी उत्सव, गणगौर, रमजान ईद, बकरी ईद, दुर्गा विसर्जन, माघी गणपती, दशमादेवी विसर्जन कार्यक्रमाकरीता विविध व्यवस्था करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजूरीबाबतचा विषय पटलावर आलेला आहे. तसेच शिवजयंती, आंबेडकर जयंती व भाईंदर, डोंगरी, उत्तन, काशिमिरा येथील दर्गावरील उरुससाठी प्रत्येकी तीन लाखांची तरतुद करावी. याबाबत माझी अशी सुचना आहे की, निविदा काढताना प्रभागनिहाय निविदा काढण्यात याव्यात. जेणेकरुन स्थानिक नागरीकांना सोयीस्कर होईल व प्रशासनामार्फत संबंधीत ठेकेदारावर नियंत्रण ठेवणे सोपे जाईल.

शिवजयंतीसाठी रु. १० लक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साठी १० लक्ष, महावीर जयंतीसाठी ३० लक्ष, गुरु गोविंदसिंग जयंतीसाठी ५ लक्ष ठेवावे अशी माझी सुचना आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०५/०६/२०१३

**प्रकरण क्र. १५ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त २० द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**ठराव क्र.१७३ :-**

२० द.ल.ली. पाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या साकेत येथील (ठाणे) जलवाहिनीवरून जलजोडणी करून प्रायोगिक तत्वावर पाणी उचलणेकरीता दि.०४/१२/२०१२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मंजूरी दिलेली आहे.

मिरा-भाईदर शहरास सद्यस्थितीत होत असलेल्या पाणी पुरवठा जलवाहिनीची अतिरिक्त २० द.ल.ली. पाणी वाहून नेण्याची क्षमता नाही. त्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त २० द.ल.ली. होणारा पाणी पुरवठा मिरा-भाईदर शहरात आणणेकरीता पुढीलप्रमाणे जलवाहिनी टाकावी लागणार आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | गायमुख ते चेणा दरम्यान सध्याच्या जलवाहिनीस समांतर १३५० मि.मी व्यासाची एम.एस. पाईपलाईन टाकणे. | रू.१७,८०,५४,६७५/- |
| २ | हटकेश ते शामराव विठ्ठल बँकेपर्यंत १०६७ मि.मी व्यासाची एम.एस. पाईपलाईन टाकणे. | रू.६,०३,६७,२१६/- |
| ३ | साकेत संकुल, ठाणे येथे मिरा-भाईदर महानगरपालिकेकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनीवरून पाणी घेणेकरीता पंपगृहात ४२५ एच.पी. क्षमतेचा व्हि.एफ.डी. प्रणालीवर आधारीत इनलाईन बुस्टर पंपाचा पुरवठा करणे, बसविणे, कार्यान्वित करणे. | रू.२,६६,०४,६००/- |

सन २०१३-१४ च्या वार्षिक अंदाजपत्रकात "नविन अतिरिक्त पाणी पुरवठा योजना" या लेखाशिर्षकाखाली रू. ३० कोटी एवढी तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी सदर काम करून घेण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी ही सभा देत आहे.

**सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. राजेश वेतोसकर व अनुमोदक श्रीम. वंदना चक्रे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

जे.एन.एन.यु.आर.एम. अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच सुर्या पाणी पुरवठा योजना व २० द.ल.ली. पाणी पुरवठ्याची कामे हाती घेयावयाची आहेत. त्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे पुरेसा अभियंता वर्ग नाही. भुयारी गटार योजना / पाणी पुरवठा कामांचा अनुभव असणारे ०४ अभियंते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातून प्रतिनियुक्तीवर घेण्यात आलेले आहेत. सदर कामे पूर्ण करण्यासाठी त्यांची आवश्यकता लागणार आहे. तरी सदर अभियंत्यांना १ वर्षाची मुतदवाढ देण्यात यावी अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०५/०६/२०१३

प्रकरण क्र. १६ :- मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या सुर्या धरण उद्भव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सहभागाबाबत.

ठराव क्र. ५८ :- ६६

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या व त्यानुसार लागणारा पाणी पुरवठा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | लोकसंख्या (लाखात) | प्रति दिन आवश्यक पाणी पुरवठा (द.ल.लि.) | प्रत्यक्ष होणारा पाणी पुरवठा |
|---|---|---|---|---|
| १. | २०११ | ८.१४ | १५० | ११६.०० |
| २. | २०४१ (अंदाजित) | २८.८५ | ४३२.७५ | - |

शहरातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी मा. मंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली दि.११/०८/२०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या मा. उच्चाधिकार समितीच्या बैठकीत सुर्या धरणामधून मिरा-भाईंदर महानगरपालिकेसाठी जलसंपदा विभागाकडून १०० द.ल.लि. पाणी कोटा मंजूर केलेला आहे. तसेच पाणी पुरवठा स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.१५/०६/२००९ च्या शासन निर्णयानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सुर्या धरणातून प्रति दिन ३०३ द.ल.लि पाणी आरक्षित करण्यात आलेले आहे. त्यामधून मिरा-भाईंदर महानगरपालिकेस ११८ द.ल.लि. व उर्वरित पाणी वसई-विरार महानगरपालिकेस मिळणार आहे. याप्रकारे मिरा-भाईंदर महानगरपालिकेसाठी सुर्या धरणातून एकूण २१८ द.ल.लि. प्रति दिन पाणी आरक्षित आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मिरा-भाईदर महानगरपालिका व वसई-विरार महानगरपालिका या दोन्ही महानगरपालिकेसाठी त्यांच्या वाट्यास आलेले ३०३ द.ल.लि. प्रति दिन पाणी उचलणेसाठी सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत निधी उपलब्ध होणेकरीता सादर केलेला आहे. या प्रकल्पाचा खर्च रू.९३३.८८ कोटी असल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नमूद केले आहे. केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत सदर प्रकल्पास मान्यता मिळाल्यास, केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा वगळता उर्वरित खर्च मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे केला जाणार आहे. मिरा-भाईंदर व वसई-विरार शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी सुर्या धरणातून संयुक्त जलवाहिनी टाकण्यात येणार असून त्यामुळे प्रकल्पाचा खर्च कमी होऊन भविष्यात देखभाल दुरूस्तीसुद्धा खर्च कमी होणार आहे. या प्रकल्पाव्दारे मिरा-भाईंदर शहराच्या सिमेपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

महानगरपालिकेमार्फत मिरा-भाईदर शहरातील वितरण व्यवस्था बळकटीकरणाचा रू.४४९.७७ कोटीचा प्रकल्प अहवाल केंद्र शासनास जेएनएनयुआरएम अंतर्गत सादर केलेला आहे. उपरोक्त पाण्याचे योग्य प्रकारे वापर/वितरण व्हावे यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबवित असलेल्या योजनेत सहभाग घेणेकरीता मा. महासभेचा ठराव व सामंजस्य कराराची पुर्तता करणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कळविले आहे. त्या अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत खालील कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे सुर्या धरणातून ३०३ द.ल.लि. प्रति दिन पाणी पुरवठा योजना राबविणेसाठी, मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या वाटयास आलेल्या पाण्यासह सहभागी होण्यासाठी व त्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा सोबत सामंजस्य करार करणे.

२) मिरा-भाईदर महानगरपालिकेस सुर्या धरणातून १०० द.ल.लि. प्रति दिन पाणी मा. उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मंजूर झालेले असून सदरचा कोटासुद्धा मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करून त्यांचेतर्फे तयार करण्यात येत असलेल्या ३०३ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेच्या पाणी पुरवठा योजनेऐवजी ४०३ द.ल.लि. प्रति दिन पाणी पुरवठा योजना तयार करण्यास विनंती करण्यात यावी व मिरा-भाईदर महानगरपालिकेस एकुण २१८ द.ल.ली प्रतिदिन पाणी पुरवठा प्रस्तावित करण्यासाठी निर्णय घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त दोन्ही मुद्दयांबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत संबंधित प्राधिकरण/ विभाग, राज्य शासन, केंद्र शासन इत्यादींकडे संमतीदर्शक पत्रव्यवहार करणे, आवश्यकतेप्रमाणे सामंजस्य करार करणे इत्यादी प्रकारची कार्यवाही करण्यासाठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास व वितरण व्यवस्था बळकटी करणाच्या कामी मिरा-भाईदर महानगरपालिकेमार्फत जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत सादर केलेल्या रू.४४९.७७ कोटी खर्चाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्री. दिनेश जैन यांनी खालील प्रामणे सुचना मांडली.**

मिरा-भाईदर महानगरपालिकेची लोकसंख्या व त्यानुसार लागणारा पाणी पुरवठा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | लोकसंख्या (लाखात) | प्रति दिन आवश्यक पाणी पुरवठा (द.ल.लि.) | प्रत्यक्ष होणारा पाणी पुरवठा |
|---|---|---|---|---|
| १. | २०११ | ८.१४ | १५० | ११६.०० |
| २. | २०४१ (अंदाजित) | २८.८५ | ४३२.७५ | - |

मिरा-भाईदर महानगरपालिकेची लोकसंख्या व त्यानुसार लागणारा पाणी पुरवठा एम.एम.आर.डी.ए. कडून मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत पोच केला जाणार आहे.

एम.एम.आर.डी.ए. कडून मिरा भाईदर महानगरपालिकेस ११८ एम.एल.डी. पाणी सुर्या धरणाकडून आपल्या हद्दीत पोच करण्यासाठी १२ रू. ६० पैसै प्रति हजार लि. दर निश्चित केलेले आहे.

तसेच १०० एम.एल.डी. पाणी महाराष्ट्र शासनाने महानगरपालिकेला अतिरिक्त कोटा मंजूर केलेला आहे. सदर १०० एम.एल.डी पाणी महानगरपालिकेच्या मालकीचे एम.एम.आर.डी.ए. यांनी सूर्या धरणातून मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीपर्यंत पोचविण्याची विनंती एम.एम.आर.डी.ए यांना करत असताना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाण्याच्या १०० एम.एल.डी. करीता एम.एम.आर.डी.ए.ने वेगळे दर मिरा-भाईंदर महानगरपालिकेस द्यावे यासाठी मा. आयुक्तांनी एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणाचे आयुक्त यांचेबरोबर चर्चा करून दर निश्चित करण्यात यावे यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे अशी मी सुचना मांडीत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०५/०६/२०१३

**प्रकरण क्र. १७ :-** **मिरारोड (पूर्व) रेल्वे समांतर नयानगरकडे जाणाऱ्या डी.पी. रस्त्यावर आर.सी.सी. दुभाजक बसविणे व उर्वरीत रस्ता डांबरीकरण करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र.१९ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) रेल्वे समांतर नयानगरकडे जाणारा डी.पी. रस्त्याचे छेडा कॉम्पलेक्स ते साहील फराज पर्यंत खडीकरण व मजबुतीकरण करण्याचे काम पूर्ण झालेले असून त्या रस्त्यावर डांबरीकरण करण्याचे काम शिल्लक आहे. भाईदर (पूर्व) उड्डाणपुला पासून ते नयानगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या साहिल फराज व नुरजहॉ इमारतीपर्यंत रस्त्याच्या मध्ये आर.सी.सी. दुभाजक बसविणे आवश्यक आहे. वरील कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून या कामासाठी रु. १,९०,८१,७००/- इतका अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे. सदरचा रस्ता हा विकास योजनेतील ३०.०० मीटर रुंदीचा रस्ता आहे. सद्यस्थितीत ११०० मीटर लांबीचा दुभाजक बसवावयाचे असून सरासरी ६०० मीटर लांब व २३.३० मीटर रुंदीच्या रस्त्याचे डांबरीकरण करावयाचे आहे.

सदरच्या कामाच्या खर्चाची तरतुद सन २०१३-१४ च्या वार्षिक अर्थसंकल्पात "डी.पी. रोड / मिरारोड रेल्वे समांतर बांधकाम" (तरतुद २५०.०० लक्ष) या लेखाशिर्षकात करण्यात आलेली आहे. तरी सदर कामास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** . **अनुमोदक :- श्री. नरेश पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कांगणे यशवंत बगाजी | |
| २ | अशोक तिवारी | २ | मयेकर सरस्वती रजनीकांत | |
| ३ | ॲड. रवि व्यास | ३ | सिंग मदन उदितनारायण | |
| ४ | पाटील वंदना विकास | ४ | पाटील रोहिदास शंकर | |
| ५ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ५ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ७ | मेन्डोन्सा स्टिवन जॉन | ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ८ | मेहता डिंपल विनोद | |
| ९ | डॉ. आसिफ गुलाब शेख | ९ | भानुशाली वर्षा गिरीधर | निरंक |
| १० | गोविंद हेलन जॉर्जी | १० | रावल भगवती जयशंकर | |
| ११ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | ११ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १२ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | १२ | शरद केशव पाटील | |
| १३ | खण्डेलवाल सुरेश | १३ | जैन गिता भरत | |
| १४ | नरेश तुकाराम पाटील | १४ | जैन रमेश धरमचंद | |
| १५ | अनिता जयवंत पाटील | १५ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १६ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| १७ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | १७ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | |
| १८ | भावसार शिल्पा कमलेश | १८ | सुजाता रविकांत शिंदे | |
| १९ | वंदना रामदास चक्रे | १९ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २० | भोईर कमलेश यशवंत | २० | कासोदरिया अश्विन श्यामजी | |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २३ | अरोरा दिपिका पंकज |
| २४ | पिसाळ मनिषा नामदेव | २४ | मीरादेवी रामलाल यादव |
| २५ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २५ | अनिल बाबुराव भोसले |
| २६ | वेतोसकर राजेश शंकर | २६ | निलम हरिश्चंद्र ढवण |
| २७ | बगाजी शर्मिला विल्सन | २७ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील |
| २८ | रकवी सुहास माधवराव | २८ | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील |
| २९ | झिनत रऊफ कुरेशी | २९ | प्रविण मोरेश्वर पाटील |
| ३० | मोहम्मद फरिद सिंद्धीक कुरेशी | ३० | तारा विनायक घरत |
| ३१ | पुजारी कांचना शेखर | ३१ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर |
| ३२ | काझी रशीदा जमील | ३२ | शुभांगी महिन कोटियन |
| ३३ | इनामदार जुबेर | ३३ | जयमाला किशोर पाटील |
| ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३४ | संदिप मोहन पाटील |
| ३५ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | ३५ | परमार अनिता भरत |
| ३६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३६ | पाटील प्रणाली संदिप |
| ३७ | डिसा मर्लिन मर्विन | ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव |
| ३८ | भट दिप्ती शेखर | ३८ | गावंड मंदाकिनी आत्माराम |
| ३९ | सामंत प्रमोद जयराम | ३९ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर |
| ४० | जाधव मोहन महादेव | ४० | ठाकुर अरविंद दत्ताराम |
| ४१ | भोईर भावना राजू | | |
| ४२ | भोईर राजू यशवंत | | |
| ४३ | मुन्ना सिंग | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०५/०६/२०१३

प्रकरण क्र. १८ :- सन्मा. सदस्य सुरेश जे. खंडेलवाल यांचा दिनांक २८/०५/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देणेबाबत.

(सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०५/०६/२०१३

प्रकरण क्र. १९ :- सन्मा. सदस्या प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक ३०/०५/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. काशिमिरा नाक्यावरील शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्याची उंची वाढवणे बाबतचा प्रस्ताव.

(सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०५/०६/२०१३

**प्रकरण क्र. २० :-** **सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा दिनांक ३०/०५/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव --- मिरा भाईंदर महानगरपालिका रामनगर येथील ॲमिनिटी स्पेसमधील इमारतीतील वापरात बदल करणेबाबत प्रस्ताव.**

**ठराव क्र.२० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ॲमिनिटी ओपन स्पेसच्या तरतूदी अंतर्गत मे. काउंटडाऊन लँड डेव्हलोपर्स प्रा. लि. यांनी विकसीत केल्यानंतर त्यात महानगरपालिकेसाठी १५ टक्के जागा एकूण महानगरपालिका शिफारस करेल अशासाठी दिलेली आहे.

सदर इमारतीतील तळ मजला वरिष्ठ नागरीकांसाठी, आभ्यासिका हॉल, पहिला मजला लग्न कार्यासाठी व इतर कामासाठी भाड्याने देण्यासाठी, दुसरा मजला महानगरपालिकेतील विविध विभागांसाठी वापरणेबाबत ठराव दि. ०१/१२/२०१२, ठराव क्र. २१ ने ठरविण्यात आलेला आहे. सदर इमारतीचे नाव राष्ट्रसंत आचार्य श्री मद्मासागर सुरवरजी यांचे नाव देण्यात आले आहे. श्री पद्मासागर सुरवरजी हे जैन धर्माचे राष्ट्रीय संत असल्याने तसेच जैन धर्माच्या शिकवणीप्रमाणे जीव हत्या रक्षण करणे, जीवाचे रक्षण करणे इ. अनेक कार्य केली जात असतात. या इमारतीचे वापरावयाचे धोरण ठरवण्यात आलेले आहे. सदर इमारतीमध्ये तळ मजला वरिष्ठ नागरीकांकरीता व इतर कामासाठी राखीव केलेले आहे. पहिला मजला लग्न व सार्वजनिक कार्यक्रमासाठी राखीव करण्यात आले आहे. व तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता दुसरा मजला वापरण्यात येणार आहे. अश्या वापरामुळे कार्यालयीन कर्मचारी व इतर कार्यक्रमामध्ये मांसाहार होणार आहे.

तरी राष्ट्रीय संत आचार्य श्री पद्मासागर सुरवरजी यांचे नाव इमारतीस सर्व संमतीने दिले असल्याने या इमारतीमध्ये मांसाहार करणे व लग्न कार्यक्रमासाठी वापर करणे योग्य ठरणार नाही. याकरीता सदर इमारतीच्या वापरामध्ये बदल करुन सदर इमारतीचा वापर हा धार्मिक कार्यक्रमाकरीता, वरिष्ठ नागरीकांसाठी व आभ्यासिका हॉल करीता करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र एल. मेहता** **अनुमोदक :- श्रीम. गिता जैन**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर ठरावामध्ये माझी सुचना आहे की, लग्न कार्यासाठी हॉल द्या. परंतु, लग्न कार्यात मांसाहार वर्ज्य करण्यात यावा.

**मा. महापौर यांनी दिलेले रुलिंग**

सदर हॉल बुकींग करताना, प्रशासनाने हॉल बुक करणाऱ्याला निर्देश द्यावे की, लग्न कार्यात हॉलमध्ये शाकाहाराचा वापर करावा. मांसाहारास परवानगी देण्यात येणार नाही.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(३५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०६/०७/२०१३

प्रकरण क्र. २१ :- दि. १८/०४/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. २१ :-

दि. १८/०४/२०१३ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०६/०७/२०१३

प्रकरण क्र.२२ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २, कलम ५(२)(ब) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे.

ठराव क्र.२२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेवर नेमावयाच्या पाच स्वीकृत सदस्यांबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका क्र. ३७४८/२०१३, दि. ०४/०७/२०१३ रोजी सुनावणीला आली असता मा. उच्च न्यायालयाने पाचव्या नामनिर्देशित सदस्याची नियुक्ती करण्यास स्थगिती दिलेली आहे. करिता उर्वरित चार स्वीकृत सदस्य पदी नेमणूक करणेकरीता मा. आयुक्त ह्यांनी शिफारस केलेल्या गोषवाऱ्यातील नावानुसार खालील नावांची नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती करण्यांत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| अ.क्र. | पक्षाचे नाव | पात्र उमेदवाराचे नाव |
|---|---|---|
| १ | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | श्री. भगवती तुगनचंद शर्मा |
| २. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | श्री. दिनेश दगडु नलावडे |
| ३. | शिवसेना | श्री. धनेश परशुराम पाटील |
| ४. | भारतीय जनता पक्ष | डॉ. सुशील गोपीकिसन अग्रवाल |

वरील चारही नामनिर्देशित सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करण्यांत यावीत.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ०६/०७/२०१३



**प्रकरण क्र. २३ :-** रस्ते, चौक, वास्तु यांचे नामकरण करण्याच्या प्रस्तावांना मान्यता देणे.

**ठराव क्र. २३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तूना नामकरण करण्याबाबत नागरीक व नगरसेवकाकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्ताव खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | ठिकाण | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| १ | मोर्वा गांव बंदर आळी मधुकर धनाजी पाटील घराजवळील चौक | स्व. तुकाराम दाजी पाटील चौक |
| २ | मोर्वा स्मशान भूमी | स्व. काशिनाथ गोविंद पाटील वैकुंठधाम |
| ३ | मोर्वा गांव, शार्गिद शॉप ते गोडावून रस्ता | स्व. श्री. भाऊराव नारायण पाटील मार्ग |
| ४ | १. सुखसारग/नुरजहॉ इमारत/इब्राहिम मस्जिद समोरचा चौक<br>२. नागोरी जनता डेरी/रोहीत इमारत समोरच्या चौकाला<br>३. तय्यब कासल इमारत ते गुलिस्तान पर्यंत रस्ता<br>४. हिना एव्हेन्यू/जैन कॉटेज ते १०० फुटी रोड पर्यंतचा रस्ता<br>५. नुरजहॉ इमारत ते पंचरत्न अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता<br>६. अस्मिता समिर ते दातार अपार्ट./रिलायन्स व्ह्यू इमारतीपर्यंतचा रस्ता<br>७. अंजूमन शाळेचा रस्ता<br>८. शांतीनगर सेक्टर क्र. ०७ मधील उदयान व मैदान. | हजरत इब्राहिम अल्य सलाम चौक<br>हजरत अबूबक्कर सिध्दीक रजिअल्लाताला अनहू चौक<br>हजरत मोईनुद्दीन चीश्ती (ख्वाजा गरीब नवाज मार्ग)<br>हजरत दादा ह्यात कलंदर मार्ग<br>गौसूल आजम दस्तगीर मार्ग<br>हजरत बिलाल रजिअल्लाताला अनहू मार्ग<br>बीबी फातीमा रजिअल्लाह ताला अनहु मार्ग<br>श्री. पं.पू यशोवर्मा महाराज साहेबजी उदयान व मैदान |
| ५ | १.अस्मिता होराइजन ते अस्मिता हेरीटेज (बेक हाऊस) पर्यंत<br>२. मिरा नर्सिंग होम लेन | सर सय्यद अहमद मार्ग<br>हजरत उस्मान गनी रजिअल्लाताला अनहू मार्ग |
| ६ | १. शांतीपार्क हर्ष प्लाझा ते आर.एन.पर्यंत रस्ता<br>२. शांतीनगर बिल्डींग क्र.७८/८०,२७/२८, ७५/७६ व बी/२९ चौक<br>३. शांतीनगर सेक्टर २, जॉगर्स पार्क | जय गोपाल लाल मार्ग<br>जय गोपाल चौक<br>योगिजी महाराज उद्यान |
| ७ | मिरारोड (पूर्व) स्व. बी.के. भगत मार्ग व मंगल नगर क्रॉस रोड वरील चौक | हटकेश्वर महादेव चौक |
| ८ | मोर्वा गांवदेवी मंदीर ते रमेश पाटील घरापर्यंतचा रस्ता | श्री एकविरा आई मार्ग |
| ९ | मोर्वा गाव राधाकृष्ण मंदीर जवळील नाट्यमंच | कै. द्वारकाबाई नामदेव म्हात्रे नाट्यमंच |
| १० | मोर्वा गाव येथे श्री. ओमकारेशवर मंदिर ते पाड्या आळी पर्यंतचा रस्ता | स्व.श्री. जगन शेठ पाटील मार्ग |
| ११ | मोर्वा गाव पोलिस पाटील ते पांडुरंग म्हात्रे घर चौक | गावदेवी मंदिर चौक |
| १२ | भाईंदर (पू.) खारीगावातील नाट्यमंच | कै. परशुराम दामोदर पाटील नाट्यमंच |
| १३ | भाईंदर (पू.) बी.पी.रोड़ काशिनाथ अपार्टमेंट ते बजरंग बली हॉटेल रस्ता | स्व. दौलतसिंग भाटी मार्ग |
| १४ | मिरारोड (पूर्व) निदा पार्क ते गीतानगर अंतर्गत रस्ता व चौक | अश्रफुल उलेमा चौक व अश्रफुल उलेमा मार्ग |
| १५ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २२१ (बगीचा) | हिंन्दू हृदय सम्राट स्व. श्री. बाळासाहेब ठाकरे उद्यान |
| १६ | भाईंदर (पूर्व) बंदरवाडी चौक | नाना केरकर चौक |

| | | |
|---|---|---|
| १७ | जैसलपार्क एस.टी.पी. समोरील मैदान | प्रा. राम कापसे, फुटबॉल मैदान |
| १८ | श्री. साफल्य सोसायटी ते गणपती मंदिर पर्यंतचा अंतर्गत रस्ता | श्री गणपती मंदिर मार्ग |
| १९ | शितल दर्शन सोसायटी ते कॉस्मोपॉलिटन शाळेपर्यंतचा अंतर्गत रस्ता | सेंट लॉरेन्स मार्ग |
| २० | शितल स्वर सोसायटी ते आलाप झंकार सोसायटी पर्यंतचा अंतर्गत रस्ता | रहनुमा मदरसा मार्ग |
| २१ | शितल किरण सोसायटी ते शितल सरगम सोसायटी पर्यंतचा अंतर्गत रस्ता | सेंट गेब्रीयल मार्ग |
| २२ | श्री मिरा साफल्य सोसायटी ते मुकूंद पार्क सोसायटी पर्यंता अंतर्गत रस्ता | सावित्रीबाई फुले मार्ग |
| २३ | शितल आर्केड सोसायटी ते नवजीवन शितल आशिष सोसायटी पर्यंतचा अंतर्गत रस्ता | मदर टेरेसा मार्ग |
| २४ | ग्रीन मॅडोज सोसायटी ते सेंट जोसेफ चर्च पर्यंतचा अंतर्गत रस्ता | होली क्रॉस कॉन्व्हेंन्ट स्कुल मार्ग |
| २५ | मिरारोड शांतीनगर से.२ उद्यान | जय सच्चिदानंद उद्यान |
| २६ | रामदेव पार्क रस्त्याकडून आयमाता मंदिराकडून आयडीयल पार्क कडे जाणारा रस्ता | मर्सी जॉन मेमोरीयल रस्ता |
| २७ | सरदार वल्लभाई शाळा केनवुड पार्ककडून रामदेव पार्क ते वागडनगर पर्यंतचा रस्ता | हटकेश्वर महादेव मंदीर मार्ग |
| २८ | वॉर्ड क्र. ३ जैसलपार्क चौपाटी बाल उद्यान | चाचा नेहरू बाल उद्यान |
| २९ | मिरारोड शांतीनगर सेक्टर .३ नाना - नानी पार्क | प्रमूख स्वामी महाराज पार्क |
| ३० | भाईंदर (प.) वेलकंनी माता चर्चकडे जाणारा रस्ता | माता वेलंकनी चर्च शिरे मार्ग |
| ३१ | मुर्धा खाडी पूल | जिजाऊमाता पुल |
| ३२ | काशिमिरा नीलकमल हॉटेल समोरील चौक | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक |
| ३३ | मिरारोड मनपा हॉस्पीटल व अलहाबाद बँकेसमोरील चौक | महात्मा गांधी चौक |
| ३४ | नवघर आरक्षण क्र. ११७ उद्यान | केसरीनाथ पाटील उर्फ बादशाहा उदयान |
| ३५ | भाईंदर (पुर्व) इंद्रलोक फेस - ४ व फेस - ५ समोरील रस्ता | जैन संत गच्छाधिपती प.पु.आचार्य विजय नित्यानंद सुरीश्रवरजी म.सा.मार्ग |
| ३६ | आर.एन.पी. पार्क गार्डन | आर.एन.पी. पार्क उदयान |
| ३७ | श्रीजी पार्क ते सरोवर अपार्टमेंट आर.एन.पी. पार्क रस्ता | काशि विश्वनाथ मंदीर मार्ग |
| ३८ | जैसल पार्क चौपाटी (धार्मिक कार्यक्रम ठिकाण) | सिध्दी विनायक घाट |
| ३९ | कोठार गल्ली ६० फुटी वरून | स्व. टेरेसा जॉन मेंडोन्सा मार्ग (लेपोरा स्ट्रीट) |
| ४० | भाईंदर (प) स्काय वॉक | स्व. संघवी रिकबचंद ताराजी स्कायवॉक |
| ४१ | मोअर डीपार्टमेंट स्टोर ते गौरव संकल्प रस्ता | शहिद हेंमत करकरे मार्ग |
| ४२ | शांती विदयानगरी ते गौरव संकल्प फेज - ४ रस्ता | शहिद विजय सालसकर मार्ग |
| ४३ | गौरव संकल्प फेज - ४ ते चिचबा देवी पावर हाउस रस्ता | चिचबादेवी मार्ग |
| ४४ | हरीयस ड्रीम पार्क ते सालासर गार्डन रस्ता | कै. संगितकार श्रीकांत ठाकरे मार्ग |
| ४५ | सग्नाय देवी मंदिर ते गोवला देव मंदिर रस्ता | कै. यशवंत शंकर म्हात्रे मार्ग |
| ४६ | शांती विदयानगरी ते गौरव संकल्प फेज - ४ जॉगर्स पार्क | कै. बाबा आमटे उदयान |
| ४७ | मिरारोड शांतीस्टार कार्यालय समोरील रस्ता | श्री. शामलजी अजमेरा मार्ग |
| ४८ | इंद्रलोक फेज.३ येथील चौक | ओम शांती ओम चौक |
| ४९ | शांतीनगर सेक्टर १० उद्यान | लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल उद्यान |
| ५० | जैसल पार्क जैन मंदिर चौक | महाविर चौक |
| ५१ | नवघर शाळेमागील रस्ता (उद्याना शेजारी) | स्वातंत्र्य सैनिक कै.श्री. गोपाळ दामोदर पाटील मार्ग |
| ५२ | मिरा-रोड कनकीया सरोगी अपार्टमेंट, बेव्हर्ली पार्क चौक | शहीद विजय साळसकर चौक |

(२६)

| | | |
|---|---|---|
| ५३ | भाईंदर (प) स्टेशन रोड ॲनी अपार्टमेंट समोरील चौक | स्व.श्रीमती. ॲनी जोसेफ रॉड्रीक्स चौक |
| ५४ | भाईंदर (पूर्व) चौपाटी विधिवत कार्य इमारत मागील धक्का | सावित्री घाट |
| ५५ | मिरारोड सृष्टी शॉपिंग सेंटर येथील चौक | सृष्टी चौक |
| ५६ | आर.एन.पी. पार्क चिंतामणी ते कोळी नगर रस्ता | कोळीनगर मार्ग |
| ५७ | मिरारोड (पूर्व) चंदन ॲव्हेन्यू ते सनटॉक इमारतीपर्यंतचा रस्ता | बालाजी मार्ग |
| ५८ | मिरारोड (पूर्व) प्रियंका इमारत समोर बालाजी मठच्या बाजूचा चौक | बालाजी चौक |
| ५९ | मिरारोड शांती गार्डन सेक्टर २,६,३ चौक | जय माती दि चौक |
| ६० | भाईंदर (प.)जलाराम नगर व सेकंडरी शाळे मधून भानुशाली समाज मंदिरा पर्यंतचा रस्ता | स्व. हसाबेन मनोहरजी सोनावाला मार्ग |
| ६१ | भाईंदर (प.) भानुशाली समाज हॉल ते अमृतवाणी सत्संग रस्ता | स्व. सुलोचना माधवराव रकवी मार्ग |
| ६२ | मिरारोड (पू.) कनकिया येथील महानगरपालिका इमारत | स्वामी विवेकानंद प्रशासकीय भवन |
| ६३ | भाईंदर (पू.) आरक्षण क्र. १११ मधील उद्यान | रामलिला उद्यान |
| ६४ | भाईंदर (प.) जे.एच.पोद्दार स्कूल मार्गास जोडणारा अंतर्गत रस्ता | श्री नरसिम्हा देव मार्ग |
| ६५ | वॉर्ड क्र. ३१ ऑरेंज हॉस्पीटल ते न्यू आयडीयल पार्क महादेव कॉम्प्लेक्स पासून ते गॅलेक्सी हॉस्पीटल रस्ता | जैनाचार्य अजरामर मार्ग |
| ६६ | मिरागाव रंगमंच | हनुमान मंदिर रंगमंच |
| ६७ | प्लीझंट पार्क ते एम.आय.डी.सी राष्ट्रीय महामार्ग पर्यंतचा रस्ता | कै. केशव हरी भोईर मार्ग |
| ६८ | सिल्व्हर पार्क अग्निशमन केंद्र | सिल्व्हर पार्क अग्निशमन केंद्र |
| ६९ | भाईंदर (प.) मॅक्सेस मॉल समोरील जॉगर्सपार्क | श्रीम. मायरा गिल्बर्ट मेंडोन्सा जॉगर्स पार्क |
| ७० | भाईदंर (पू.) हनुमान नगर मधील वाचनालय | राजा छत्रपती महाराज वाचनालय |
| ७१ | भाईदर (पू.) हनुमान नगर मधील अभ्यासिका | स्वामी विवेकानंद अभ्यासिका |
| ७२ | न्यू गोल्डन नेस्ट चौक ते सेव्हन इलेव्हन हॉस्पीटल रस्ता | श्री. आदेश्वर जैन मंदिर मार्ग |
| ७३ | भाईंदर (पू.) तलाव रोड वरील शाळेतील वाचनालय व अभ्यासिका | स्व. आमदार वसंत बापट अभ्यासिका व वाचनालय |
| ७४ | प्लीझंट पार्क, संघवी नगर ते वसुंधरा पर्यंतचा रस्ता | बाप्पा सिताराम मार्ग |
| ७५ | भाईंदर (प.) आरक्षण क्र .१०० मधील विरंगुळा केंद्र | विसावा, विरंगुळा केंद्र |
| ७६ | आरक्षण क्र. ३०० मधील मैदान, मिरारोड | नामदार गोखले मैदान |
| ७७ | आरक्षण क्र. ३५५ मधील मैदान, मिरागाव | श्री.यशवंत भोईर मैदान |
| ७८ | आरक्षण क्र. ३२९ उदयान, प्लीझंट पार्क | स्व. जॉन मेंडोन्सा उद्यान |
| ७९ | मिरारोड (पूर्व) रामनगर येथील विरंगुळा केंद्र | मन:शांती विरंगुळा केंद्र |
| ८० | भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) जोडणार रेल्वे खालील फाटका जवळील सबवे | स्वातंत्र्यसैनिक भालचंद्र आनंदराव रकवी सब वे |
| ८१ | भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) जोडणारा जैसल पार्क येथील सबवे | लोकमान्य टिळक सबवे |
| ८२ | मिरारोड रसाझ येथील महानगरपालिका प्रभाग कार्यालय इमारत | सय्यद नजर हुसेन भवन |
| ८३ | नवघर विरंगुळा केंद्र | सावली विरंगुळा केंद्र |
| ८४ | मोर्वा गाव तलाव व उद्यान | गजानन सोन्या पाटील उद्यान |
| ८५ | राई मैदानातील स्टेज | स्व.जयेंद्र जयराम म्हात्रे (मायकल स्टॅन्ड) |
| ८६ | नवघर पोलिस स्टेशन ते देवकी किरण मधील रस्ता | प्रभात पाटील मार्ग |
| ८७ | नवघर नविन तलाव | स्वातंत्र्य सैनिक उदयान |
| ८८ | नवघर स्मशानभुमी | मोक्ष मुक्ती धाम |
| ८९ | माशाचा पाडा येथील शाळा | छत्रपती शाहु महाराजभवन |
| ९० | गोडदेव फाटक रोड वरील साईसागर व गुप्ता भवन मधील रस्ता | संत तुकाराम मार्ग |

| | | |
|---|---|---|
| ९१ | आरक्षण क्र. ३६५ मैदान (काशिमिरा) | हिंदु हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान |
| ९२ | जनता नगर येथे निलकमल अपार्टमेंट ते वेस्टर्न पार्क कडे जाणारा रस्ता | समाजसेवक हाजी गुलाम रसुल पठाण वेस्टर्न पार्क मार्ग |
| ९३ | जनता नगर मनाली व्हीलेज समोरील चौक | मनाली चौक |
| ९४ | ग्रीन व्हीलेज समोरील चौक | स्वामी समर्थ चौक |
| ९५ | निलकमल अपार्टमेंट (जरीमरी मंदीर मार्ग) चौक | शहिद तुकाराम ओंबले चौक |
| ९६ | भाईंदर (पूर्व) चौपाटी जवळील लहान मुलांचे उदयान | चाचा नेहरु बाल उदयान |
| ९७ | जैसलपार्क जैनमंदिर ते कपुर टॉवर व चौपाटी पर्यंतचा रस्ता | राणी लक्ष्मीबाई मार्ग |
| ९८ | सेव्हन इलेव्हन हॉस्पीटल ते रामदेव पार्क रस्ता | विर माता मार्ग |
| ९९ | प्लीझंट पार्क (नविन व जुना) मुख्य रस्त्यावरील चौक | कै. रघुनाथ शामजी गायकवाड चौक |
| १०० | नटवर हाऊसच्या बाजूची गल्ली | गणेश गल्ली |
| १०१ | मिरारोड येथील युनिक ब्रीझ ते सेंट झेवियर्स शाळेला जाणारा रस्ता | श्री नारायण गुरु मार्ग |
| १०२ | मिरारोड येथील विजय पार्क, निल वसुंधरा समोरील चौक | लोकमाता, पुण्यश्लोक देवी अहिल्याबाई होळकर मार्ग |
| १०३ | भाईंदर (प.) उड्डाणपूल ते रेल्वे समांतर दहिसरकडे जाणारा ३०.०० मी. रस्ता | श्री महेश्वरी भवन मार्ग |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण ११ (२) (१) (अ) अन्वये नावे सदर नामकरणास अंतिम मान्यता देण्यात येत आहे. सदर नामकरण प्रस्ताव बाबत जाहीर वृत्तपत्रात नावे प्रसिध्द करुन पोलिस खाते, पोष्ट खाते व महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागाना नविन नावानूसारच पत्रव्यवहार करण्याबाबत कळविण्यात यावे. सदर नामफलक तयार करुन बसविण्यास येणाऱ्या खर्चास सभा मान्यता देत आहे.

**दि. १९/१०/२०१३ रोजीच्या मा. महासभेमध्ये, दि. २१/०९/२०१३ (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा) या महासभांचे इतिवृत्तांत कायम करतेवेळी अनु. क्र. १००, १०१, १०२ व १०३ ही नावे सुचविल्याने मुळ ठरावामध्ये अनु. क्र. १००, १०१, १०२ व १०३ ही नावे समाविष्ठ करण्यात आलेली आहेत.**

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(३४)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०६/०७/२०१३

**प्रकरण क्रमांक ( २४ )** :- भाईदर (प.) प्रभाग समिती क्र. ०१ (जुने नगरपरिषद कार्यालय) समोर भाडेकरुं करीता बांधलेल्या इमारतीधील गाळयांचे जुने भाडे माफ करणे बाबत....

**ठराव क्रमांक** ( २४ ) :-

मिरा भाईदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ०१ कार्यालयासमोरील (जुने नगरपरिषद कार्यालय) भाडेकरुं करीता बांधलेल्या इमारती मधील गाळयांबाबत मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र.३३ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. सदर गाळयातील भाडेकरुंची आर्थिक परिस्थिती चांगली नसून सदर गाळेधारक हे सन १९७८ पासून (ग्रामपंचायत काळापासून) भाडेकरु आहेत. मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र. ३३ मध्ये अंशतः बदल करण्यात येत आहे, त्यानुसार सदर गाळयांचे सन २००२ पासून ते ३१ मार्च २०१३ पर्यंत चे भाडे माफ करण्यात येत आहे. सदर गाळेधारकांकडून दि. ०१ एप्रिल २०१३ पासून ठरविण्यात आलेल्या दरानुसार भाडयाची वसुली करावी.

**सुचक** :- श्री. सुरेश खंडेलवाल

**अनुमोदन** :- श्री. सुहास रकवी

**ठराव सर्वानूमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PC-5/13-14/DK/MG/-4

(३९)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०६/०७/२०१३

प्रकरण क्रमांक ( २५ ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड , बंदरवाडी व काशिमिरा या तीन स्मशानभुमीत महानगरपालिकेमार्फत जळाऊ लाकडे पुरवठा करणे.

ठराव क्रमांक ( २५ )

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या १४ स्मशानभुमीपैकी मिरारोड, बंदरवाडी काशिमिरा येथील स्मशानभुमी वगळता ११ स्मशान भुमीत महानगरपालिकेमार्फत ठेकेदार नियुक्त करुन जळाऊ लाकडे पुरवठा करण्यात येतात. जळाऊ लाकडे मोफत पुरवठा करण्याचे महानगरपालिकेचे धोरण असुन मा.महासभा दि.२१/१०/२००८ ठराव क्रमांक ५५ अन्वये ज्यांना जळाऊ लाकडाचे पैसे दयावयाचे आहेत त्यांच्याकडुन रु. १०००/- रक्कम महानगरपालिका जमा करुन घेते. तथापी मिरारोड, बंदरवाडी व काशिमिरा स्मशानभुमीत ज्या खाजगी संस्थामार्फत जळाऊ लाकडे पुरविण्यात येतात त्यांच्याकडुन रु. १,०००/- पेक्षा जादा रक्कम संबधिताकडुन घेण्यात येत असल्याच्या तसेच लाकडे ओली असणे, लाकडाचा साठा नसणे अशा तक्रारी येत आहेत. त्यामुळे सदर तीन स्मशानभुमीत देखिल महानगरपालिकेमार्फतच जळाऊ लाकडे पुरवठा करण्यात यावीत.

सुचकः- श्री. प्रमोद सामंत

अनुमोदन :- श्री. सुहास रकवी

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

PC-/DK/2013-14/MT-4

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०६/०७/२०१३

**प्रकरण क्रमांक ( २६ ) :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या धोकादायक इमारतीमधील रहीवाशांना एम.एम.आर.डी.ए.च्या रेन्टल हाऊसिंग प्रकल्पात तात्पुरते अल्पदरात भाडयांनी घरे उपलब्ध करुन देण्याबाबत चा प्रस्ताव

**ठराव क्रमांक ( २६ ) :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणावर धोकादायक इमारती असून सदर इमारतीत गरीब लोक राहतात. सदर रहीवाशांकडे पर्यायी व्यवस्था तसेच भाडयाने घर घेण्याची परिस्थिती नसल्याने धोकादायक इमारतीत जीवावर उदार होऊन राहतात. पावसाळी दिवसात धोकादायक इमारतीचे भाग कोसळून जिवित हानी सुध्दा होत असते, अशा घटना वारंवार घडत आहेत. महानगरपालिकेकडे संक्रमण शिबिराची देखिल व्यवस्था नाही. विदयमान इमारतीचे चटईक्षेत्र व संस्थाच्या नियमामधील तरतूद यांचा मेळ घालून नविन पुर्नविकास करणे इमारत धारकांना तसेच गृहनिर्माण संस्थाना, विकासकांना करणे शक्य होत नाही. वाढीव चटई क्षेत्राचा प्रस्ताव देखिल शासनाकडे प्रलंबित असल्याने पुर्नबांधणीस अडथळे निर्माण होत आहेत, त्यामुळे धोकादायक इमारतीमधील रहीवाशी जीव मुठीत धरुन राहत आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए कडील रेन्टल हाऊसिंग चे प्रकल्प सुरु असून त्यामधून एम.एम.आर.डी.ए.कडे मोठया प्रमाणावर भाडयाची घरे उपलब्ध होणार आहेत. सदर भाडयाची घरे उपलब्ध करून देण्याबाबत मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांच्याकडे आमदार मा. श्री. गिल्बर्ट मेंडोन्सा व महापौर मा. सौ.कॅटलिन परेरा यांनी पत्र पाठवून मागणी केलेली आहे. तसेच सदर कामाकरीता खासदार मा. श्री. संजीव नाईक व आमदार मा. श्री. मुझफ्फर हुसेन देखिल शासन स्तरावर पाठपुरावा करीत आहेत. [illegible]

तरी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतीमधील रहीवाशांना एम.एम.आर.डी.ए. च्या रेन्टल हाऊसिंग प्रकल्पात भाडे तत्वावर तयार झालेली व होणारी घरे अल्पशा भाडयाने उपलब्ध करुन देण्याकरीता महानगरपालिकेचा प्रस्ताव शासनाकडे पाठवून व पाठपुरावा करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. आयुक्त यांनी व्यक्तीशः पाठपुरावा करुन प्रस्ताव शासनाकडून मंजूर करुन घ्यावा.

सुचक:- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PC-3/13-14/DK/MT-4

(41)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०६/०७/२०१३

प्रकरण क्र. : २७

ठराव क्र : २७

विषय : आर.सी.एच. अंतर्गत कार्यरत लिंक वर्कर्सच्या मानधनात वाढ करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेत आर. सी. एच. कार्यक्रम २००६-०७ या वर्षापासून राबविण्यात येतो. सदर कार्यक्रमांतर्गत १३० लिंक वर्कस नेमण्यासाठी मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयाप्रमाणे सदयस्थितीत लिंक वर्कर्सना मासिक ५०० रु. मानधन दिले जाते. तसेच महानगरपालिकेतर्फे त्यांना सन २००९ पासून मासिक २०० रु. अतिरिक्त मानधन दिले जाते. अशाप्रकारे लिंक वर्कर्सना सदयस्थितीत मासिक ७०० रु. मानधन देण्यात येते. सदर लिंक वर्कर्सच्या मानधनात वाढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनाने अर्थसंकल्पामध्ये तरतूदही केलेली आहे. तरी सदर लिंक वर्कर्सना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करुन मासिक ३००० रु. देण्यास ही महासभा मंजुरी देत आहे. शासन निर्णयाचे मासिक ५०० रु. मानधन निर्णयानुसार अदा करण्यात यावे. एकूण ३५०० रु. इतकी रक्कम असेल.

तसेच शासन निर्देशान्वये सदर लिंक वर्कर्सची नेमणूक व मानधन देण्यात येत असल्यामुळे, शासनाने लिंक वर्कर्सच्या नेमणुकीच्या अटी-शर्तीत काही बदल केल्यास वा त्यांच्या मानधन देण्याबाबत काही निर्देश दिल्यास त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करण्यास, ही महासभा मंजुरी देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सूचक :- सौ. प्रभात पाटील

अनुमोदक :- सौ. अनिता पाटील

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

(४७)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०९/२०१३

**तहकुबी ठराव क्र.२८ :-**

आज दि. ११/०९/२०१३ रोजीची सभा गणपती सणानिमित्त तहकुब करुन दि. ३ ऑक्टोबर २०१३ रोजी लावण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद केशव पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर**

**सदर ठरावामध्ये मा. महापौर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

तहकुब सभा लावण्यासाठी दिनांक व वेळ मी देईन व त्याप्रमाणे तहकुब सभा लावण्यात यावी.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(५४)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/०९/२०१३
## (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. २८ :- दि. १६/०५/२०१३ व दि. ०५/०६/२०१३ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.२९ :-

दि. १६/०५/२०१३ व दि. ०५/०६/२०१३ रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. बर्नाड डिमेलो.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(८५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. २१/०९/२०१३
# (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. २९ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रुग्णालय हस्तांतरण शासनास करण्यासाठी वाढीव खर्चास संमती दर्शविणे बाबत.**

**ठराव क्र. ३०:-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दाखल जनहित याचिका क्र. ३८/२००६ च्या निर्णयाच्या अनुषंगाने मा. मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे भाईंदर (प.) येथे २०० खाटांचे रुग्णालय बांधण्यात आले आहे. सदर रुग्णालय स्थापित करुन ते चालविण्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग नेमणे व उपकरणे, यंत्र सामुग्री, फर्निचर व इतर आवश्यक बाबी पाहता महानगरपालिकेवर खूप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार आहे.

सदर बाब लक्षात घेऊन मा. महासभेने दि. १४/१२/२०१२ रोजी ठराव क्र. १२ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे महानगरपालिकेच्या वतीने जनहित याचिका क्र. ३८/२००६ यात Civil Application No. १६६/२०१३ दाखल करून टेंबा रूग्णालय महानगरपालिका ऐवजी राज्य शासन अथवा सेवाभावी संस्था, धर्मादाय संस्था यांना चालविण्यासाठी परवानगी अपेक्षिलेली आहे. सदरचा अर्ज मा. उच्च न्यायालया समोर सुनावणीसाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, सदर ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनास टेंबा रुग्णालय हस्तांतरणाबाबत विनंती केली होती. त्या विनंतीच्या अनुषंगाने मा. अप्पर मुख्य सचिव यांच्या निर्देशानुसार उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांच्यासह भाईंदर येथे येऊन रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी केली व शासनाकडे अहवाल पाठविला आहे.

मा. उपमुख्यमंत्री, श्री. अजितदादा पवार यांच्याकडे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, आरोग्य विभाग, मा. पालकमंत्री, श्री. गणेश नाईक, मा. राज्यमंत्री श्री. उदय सावंत, मा. खासदार श्री. संजीव नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा, मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन, मा. महापौर श्रीम. कॅटलिन परेरा, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ हुसेन व इतर पदाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त व इतर अधिकारी यांच्या उपस्थितीत टेंबा रुग्णालय हस्तांतरणाबाबत दि. २०/०८/२०१३ रोजी बैठक झाली होती. त्यानुसार व राज्य शासनाच्या क्रमांक मिभारु२०१३/प्र.क्र.२३५/आरोग्य-३अ/नवि-२८ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ दि. १०.०९.२०१३ च्या पत्रानुसार ही महासभा खालील प्रमाणे ठराव करत आहे.

१. टेंबा रूग्णालय इमारत कोणत्याही मोबदल्याशिवाय महानगरपालिका शासनाकडे हस्तांतरित करण्यास तयार आहे.

२. सदर इमारतीत शासकीय यंत्रणेने काही फेरफार सुचविल्यास अंतर्गत सजावट करण्यास रु. २ ते ३ कोटी खर्च महानगरपालिका देण्यास तयार आहे.

३. रूग्णालयासाठी लागणारी यंत्रसामुग्री/साधनसामुग्री ही शासनाने त्यांच्या यंत्रणेमार्फत खरेदी करावी. यासाठी येणारा खर्च रु. ५ कोटी महानगरपालिका देण्यास तयार आहे.

४. सदर २०० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित झाल्यानंतर भविष्यात शासनाने येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कार्यरत करावयाचे ठरविल्यास सदर जागेत अस्तित्वात असलेल्या तळमजला अधिक चार मजले येथे अधिक तीन मजले बांधण्याचा खर्च महानगरपालिका उचलण्यास तयार आहे.

(६५)

तसेच टेंबा रुग्णालय शासनास हस्तांतरण करण्यासंदर्भात भविष्यात शासनाशी बोलणी करतेवेळी आवश्यकतेनुसार काही निर्णय घ्यावयाचे झाल्यास, मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्याशी चर्चा करुन असे निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास, ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. सुहास रकवी**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार व अनुमोदक श्री. बर्नड डिमेलो ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रूग्णालय शासनास हस्तांतरणाचा प्रस्ताव दि. १०/९/२०१३ जा.क्र.मिभारु/२०१३/प्र.क्र./२३५/आरोग्य-३अ/नवि-२८, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई ह्यांनी सुचविल्याप्रमाणे हस्तांतर बाबींचा ठराव शासनास सादर केल्यानंतर राज्य शासनाच्या माध्यमातून रुग्णालय सुरु होईपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने मिरारोडमध्ये महापालिकेचे सद्यस्थितीत कार्यान्वित असलेले स्व. इंदिरा गांधी रुग्णालयाच्या धर्तीवर टेंभा रुग्णालय इमारतीमध्ये ओ.पी.डी., डायलॅसीस केंद्र व शक्य तेवढे वैद्यकिय विभाग सुरु करावे आणि लागणारे वैद्यकिय कर्मचारी ठोक मानधनावर घ्यावेत व सदर विषयी आर्थिक व प्रशासकीय कामाची पुर्तता करणेकामी मा. आयुक्त साहेबांना आधिकार देण्यात यावेत अशी मी मुळ ठरावात सुचना मांडत आहे. मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्यासोबत चर्चा करुन मा. आयुक्तांनी अधिकार वापरावेत.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

महापौर

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(46)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२१/०९/२०१३

(दि. ११/१०/२०१३ रोजीची तहकुब सभा)

ठराव क्र. 39

प्रकरण क्र. ३०

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्मशानभूमीत सीएनजी शवदाहीनी बसविणे कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण १४ स्मशान भूमी आहेत. त्यापैकी भाईंदर (प.) स्मशानभूमीत सीएनजी शवदाहीनी बसविण्यात आलेली असून कार्यान्वीत केलेली आहे. पर्यावरणाच्या तसेच दहन प्रक्रिया जलदगतीने व्हावे या दृष्टीने शहरात सीएनजी शवदाहीन्या बसविणयाची मागणी होत असते. खालील उल्लेखल्याप्रमाणे स्मशानभूमीत सीएनजी शवदाहीनी बसविण्याची प्रस्तावित आहे.

१) भाईंदर(पुर्व) बंदरवाडी येथील स्मशानभूमी
२) काशिमिरा येथील स्मशानभूमी
३) पेणकर पाडा येथील स्मशानभूमी
४) मिरा रोड येथील स्मशानभूमी

वरील चारही स्मशान भूमीत दहन संख्या जास्त प्रमाणात आहे. तरी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पीय तरतुदी प्रमाणे व भविष्यात दरवर्षी टप्याटप्याने सीएनजी शवदाहीन्या बसवाव्यात असा मी ठराव मांडत आहे.

सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक श्री. कुबेर इनामदार

मा. महापौर

# मिरा भाईदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. २१/०९/२०१३
# (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. २९ :-** **मिरा भाईदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रुग्णालय हस्तांतरण शासनास करण्यासाठी वाढीव खर्चास संमती दर्शविणे बाबत.**

**ठराव क्र.30:-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दाखल जनहित याचिका क्र. ३८/२००६ च्या निर्णयाच्या अनुषंगाने मा. मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे भाईंदर (प.) येथे २०० खाटांचे रुग्णालय बांधण्यात आले आहे. सदर रुग्णालय स्थापित करुन ते चालविण्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग नेमणे व उपकरणे, यंत्र सामुग्री, फर्निचर व इतर आवश्यक बाबी पाहता महानगरपालिकेवर खूप मोठा आर्थिक व प्रशासकीय भार पडणार आहे.

सदर बाब लक्षात घेऊन मा. महासभेने दि. १४/१२/२०१२ रोजी ठराव क्र. १२ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे महानगरपालिकेच्या वतीने जनहित याचिका क्र. ३८/२००६ यात Civil Application No. १६६/२०१३ दाखल करून टेंबा रूग्णालय महानगरपालिका ऐवजी राज्य शासन अथवा सेवाभावी संस्था, धर्मादाय संस्था यांना चालविण्यासाठी परवानगी अपेक्षिलेली आहे. सदरचा अर्ज मा. उच्च न्यायालया समोर सुनावणीसाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून, सदर ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनास टेंबा रुग्णालय हस्तांतरणाबाबत विनंती केली होती. त्या विनंतीच्या अनुषंगाने मा. अप्पर मुख्य सचिव यांच्या निर्देशानुसार उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे यांच्यासह भाईंदर येथे येऊन रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी केली व शासनाकडे अहवाल पाठविला आहे.

मा. उपमुख्यमंत्री, श्री. अजितदादा पवार यांच्याकडे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, आरोग्य विभाग, मा. पालकमंत्री, श्री. गणेश नाईक, मा. राज्यमंत्री श्री. उदय सावंत, मा. खासदार श्री. संजीव नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा, मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसेन, मा. महापौर श्रीम. कॅटलिन परेरा, मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ हुसेन व इतर पदाधिकारी तसेच महानगरपालिका आयुक्त व इतर अधिकारी यांच्या उपस्थितीत टेंबा रुग्णालय हस्तांतरणाबाबत दि. २०/०८/२०१३ रोजी बैठक झाली होती. त्यानुसार व राज्य शासनाच्या क्रमांक मिभारु२०१३/प्र.क्र.२३५/आरोग्य-३अ/नवि-२८ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ दि. १०.०९.२०१३ च्या पत्रानुसार ही महासभा खालील प्रमाणे ठराव करत आहे.

१. टेंबा रूग्णालय इमारत कोणत्याही मोबदल्याशिवाय महानगरपालिका शासनाकडे हस्तांतरित करण्यास तयार आहे.
२. सदर इमारतीत शासकीय यंत्रणेने काही फेरफार सुचविल्यास अंतर्गत सजावट करण्यास रु. २ ते ३ कोटी खर्च महानगरपालिका देण्यास तयार आहे.
३. रूग्णालयासाठी लागणारी यंत्रसामुग्री/साधनसामुग्री ही शासनाने त्यांच्या यंत्रणेमार्फत खरेदी करावी. यासाठी येणारा खर्च रु. ५ कोटी महानगरपालिका देण्यास तयार आहे.
४. सदर २०० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित झाल्यानंतर भविष्यात शासनाने येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कार्यरत करावयाचे ठरविल्यास सदर जागेत अस्तित्वात असलेल्या तळमजला अधिक चार मजले येथे अधिक तीन मजले बांधण्याचा खर्च महानगरपालिका उचलण्यास तयार आहे.

तसेच टेंबा रुग्णालय शासनास हस्तांतरण करण्यासंदर्भात भविष्यात शासनाशी बोलणी करतेवेळी आवश्यकतेनुसार काही निर्णय घ्यावयाचे झाल्यास, मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्याशी चर्चा करुन असे निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास, ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. सुहास रकवी**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार व अनुमोदक श्री. बर्नड डिमेलो ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रुग्णालय शासनास हस्तांतरणाचा प्रस्ताव दि. १०/९/२०१३ जा.क्र.मिभारु/२०१३/प्र.क्र./२३५/आरोग्य-३अ/नवि-२८, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई ह्यांनी सुचविल्याप्रमाणे हस्तांतर बाबींचा ठराव शासनास सादर केल्यानंतर राज्य शासनाच्या माध्यमातून रुग्णालय सुरु होईपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने मिरारोडमध्ये महापालिकेचे सद्यस्थितीत कार्यन्वित असलेले स्व. इंदिरा गांधी रुग्णालयाच्या धर्तीवर टेंभा रुग्णालय इमारतीमध्ये ओ.पी.डी., डायलॅसीस केंद्र व शक्य तेवढे वैद्यकिय विभाग सुरु करावे आणि लागणारे वैद्यकिय कर्मचारी ठोक मानधनावर घ्यावेत व सदर विषयी आर्थिक व प्रशासकीय कामाची पुर्तता करणेकामी मा. आयुक्त साहेबांना आधिकार देण्यात यावेत अशी मी मुळ ठरावात सुचना मांडत आहे. मा. महापौर व मा. उपमहापौर यांच्यासोबत चर्चा करुन मा. आयुक्तांनी अधिकार वापरावेत.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(६७)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २१/०९/२०१३

ऐवजी दि. १९/८/२०१३ रोजीची तहकुब सभा

प्रकरण क्र. ३९ :- मानधनावरील संगणक चालक/लघुलेखक यांच्या मुदतवाढी बाबत.

ठराव क्र. :- ३२

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागास आवश्यकतेनुसार संगणक पुरविण्यात आलेले आहेत. या विभागापैकी बऱ्याच विभागासाठी संगणकीय आज्ञावल्या तयार करण्यात आलेल्या आहेत. या संगणकांचा व आज्ञावल्यांचा परिणामकारक उपयोग व्हावा म्हणून आवश्यक असलेले संगणक चालक, या सोबत मा. महासभा, स्थायी समितीसभा व अन्य समित्यांची इतिवृत्तांते तयार करणेकामी लघुलेखकांची आवश्यकता असल्याने, मा. महासभा दि. २०/०६/२००६ ठराव क्र. २९, नुसार संगणक चालक व लघुलेखक महानगरपालिका आस्थापनेवर ठोक मानधनावर प्रथम नेमणुकी करण्यात आलेल्या असून त्यांना वेळोवेळी मा. महासभेच्या मान्यतेने मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. मा. महासभा दि. २०/०३/२०१० ठराव क्र. ६५, अन्वये संगणक चालक व लघुलेखक यांचे नियुक्ती मुदतवाढीस मंजुरी देताना संगणक चालकाच्या पदनिर्मितीचा फेर प्रस्ताव शासनास पाठविण्यात मान्यता दिली. शासनाकडे प्रस्ताव मंजुरी करीता पाठविला असता दि. २९/०९/२००६ चे शासनाकडील पत्रानुसार सदर प्रस्ताव अमान्य केला व संगणक चालकांचे काम मंजूर पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यामार्फत किंवा बाह्यमार्गाने (Through Out sourcing) करुन घेणे अपेक्षीत आहे असे कळविले आहे.

मा. महासभा दि. १४/१२/२०१२, दि. ०१/१२/२०१२ ची तहकुब सभा ठराव क्र. २२ अन्वये दि. ०१/१०/२०१२ पासुन ७५ संगणक चालक व ०३ लघुलेखक यांना पुढे ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली असुन मार्च-२०१३ पर्यंत संगणक चालक यांना रु. ६,५००/- व लघुलेखक यांना रु.७,५००/- इतके मासिक मानधन देण्यात येत होते. माहे एप्रिल-२०१३ पासून संगणक चालक यांना रु. ९,५००/- व लघुलेखक यांना रु. १०,५००/- इतके वाढीव मासिक मानधन देणेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. सदरच्या नेमणूकींची मुदत दि. ३०/०८/२०१३ रोजी संपत आहे.

सद्यस्थितीत महापालिकेच्या विविध विभागात ७५ संगणक चालक कार्यरत असून ०३ लघुलेखक सचिव विभागात कार्यरत आहेत. यापैकी जे संगणक चालक नियमितपणे उपस्थित राहुन आवश्यक सेवा बजावतात, त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेस सेवा देतांना कर्तव्यपरायणता व शिस्त न पाळणाऱ्या संगणक चालकांना मुदतवाढ न देता त्यांच्या सेवा खंडीत करणे उचीत ठरेल.

(८८)

महानगरपालिका अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षामध्ये रु. ९५.०० लाख इतकी तरतुद करणेत आलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत अपुरा कर्मचारी वर्ग व वाढत्या कामाचा बोजा पाहता संगणक चालक तसेच लघुलेखक यांची मुदत दि. ३०/०८/२०१३ रोजी संपत असल्याने संगणक चालक व लघुलेखक यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सध्याच्या मानधनावर एक वर्षाची मुदतवाढ देणेस ही महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम केला आहे.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(49)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २१/०९/२०१३

(दि. १२/८/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्रमांक ( ३२ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मोर्वा, उत्तन, पाली, चौक व काजूपाडा येथील शाळा इमारतीची पुर्नबांधणी करणे कामाबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक ( 33 ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मोर्वा, उत्तन, पाली, चौक व काजूपाडा येथील कोलारू शाळा इमारती सन १९९३ मध्ये जिल्हापरिषदेच्या ताब्यातून तत्कालिन नगरपरिषदेच्या ताब्यात आल्या आहेत. सदर शाळा इमारती कौलारू असून मोडकळीस आलेल्या आहेत. शहरातील इतर सर्व शाळा इमारती ह्या महानगरपालिकेने टप्याटप्याने आर.सी.सी. स्वरूपात बांधलेल्या आहेत. वरील शाळा इमारती पैकी काजूपाडा येथील शाळा इमारती वगळता सी.आर.झेड. ने बाधित होत आहेत. सदर शाळा इमारतीची पुर्नबांधणी करण्याची आवश्यक असल्याने सी.आर.झेड. च्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र सागरी क्षेत्र नियंत्रण प्राधिकरण (MCZMA) यांनी सदर प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविलेले आहेत. सदर शाळा इमारतींची तळ अधिक चार मजल्यापर्यंत पूर्नबांधणी करण्याकरीता खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| १) मोर्वा येथे शाळा इमारत बांधणे | रू. २,३३,४६,३१५/- |
| २) उत्तन येथे शाळा इमारत बांधणे | रू. १,०८,६४,३२३/- |
| ३) पाली येथे शाळा इमारत बांधणे | रू. १,३६,०२,४६२/- |
| ४) चौक येथे शाळा इमारत बांधणे | रू. २,८३,५३,५४७/- |
| ५) काजुपाडा येथे शाळा इमारत बांधणे | रु. २,२२,९४,१४९/- |

वरील शाळागृह इमारतीच्या पुर्नबांधणीसाठी येणारा खर्च महानगरपालिका करण्यास तयार असल्याबाबतचा निर्णय केंद्र शासनास कळविण्यात यावे. सदर शाळेच्या पुर्नबांधणी करण्याच्या अंदाजपत्रकाना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात यावी. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

सुचक:- (सही)
श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- (सही)
श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PC-3/13-14/DK/MT 7

(50)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २१/०९/२०१३

(दि. १९/९/२०१३ रोजीची तहकूब सभा)

**प्रकरण क्रमांक ( ३३ )** :- भाईदर (पूर्व) जैसलपार्क खाडी किनारी बंद किऑस्क (स्टॉल) भाड्याने चालविण्यास देण्यास मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ( ३४ )** :-

मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रात भाईदर (पूर्व) येथे आरक्षण क्र. १२२ चौपाटी करीता राखीव असून सदर आरक्षणातील जागेपैकी १४.०० हेक्टर जागा जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांच्याकडून संरक्षणासाठी मिरा-भाईदर महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत श्रीगणेश विसर्जन व्यवस्थेसाठी विविध सोयी करण्यात आलेल्या आहेत. सदर ठिकाणी नागरीक, रहिवांशी मोठ्या प्रमाणावर फिरावयास येत असतात. सदर ठिकाणी हातगाड्यावाले उभे राहून खाद्यविक्रि करत असतात. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत नॉन मेटॅलिक किऑस्क (स्टॉल) स्वखर्चाने उभारण्यास परवानगी दिल्यास त्यांच्यामार्फत खाद्यविक्रि होऊन नागरीकांना चांगल्या प्रतीचे खाद्य उपलब्ध होऊ शकेल व हातगाडीवाल्यांना मज्जाव करता येईल. सदर किऑस्क ६ फुट X ६ फुट मोजमापाचे स्वखर्चाने संबंधितानी बसवावयाचे आहे. मा. स्थायी समिती सभा दि. २१/०१/२०१३ ठराव क्र. १८ अन्वये सदर ठिकाणी १० नग किऑस्क ५ वर्ष मुदतीने बसविण्यासाठी मान्यता दिल्यानूसार निविदा प्रक्रिया करून दर मागविण्यात आलेले होते. चालू बाजारभावानुसार (रेडी रेकनरनुसार) सदर १० किऑस्कच्या जागेचे भाडे रु. ४२,५००/- एवढे होत होते. तथापी निविदा मागविल्यानंतर मे. एकता कंन्स्ट्रक्शन यांनी १० नग किऑस्क करीता रु. ६०,२००/- वार्षिक भाडे देण्याचे दर सादर केलेले आहेत. तरी रु. ६०,२००/- वार्षिक भाडे आकारून ५ वर्ष मुदतीसाठी किऑस्क (स्टॉल) भाड्याने देण्यास ही सभा मंजमरी देत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकार

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २१/०९/२०१३

(दि. ११/९/२०१३ रोजीच्या तहकुब सभा)

(51)

ठराव क्र. ३५

प्रकरण क्र. ३४

विषय :- भाईंदर (पु) मौजे गोडदेव आरक्षण क्र.२१८ ( कम्युनिटी हॉल) विकसीत करणे कामास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे गोडदेव येथील स.क्र. ३१२ (जुना) ३६ (नविन) हि.क्र. व स.क्र. ३२२ (जुना), ३४ (नविन) हि.क्र.१७ ही जागा आरक्षण क्रमांक २१८ कम्युनिटी हॉल करीता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र २६००.०० चौ.मीटर एवढे असुन पूर्ण जागा ताब्यात आली आहे. सदर कम्युनिटी हॉल बांधण्याकरीता रु.४,८२,५८,६००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. महापालिका प्रशासनाला सदरची जागा पुर्णपणे ताब्यात घेण्यात यश मिळविले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाने आरक्षित जागा विकसित करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये किती तरतुद करण्यात आलेली आहे व त्या लेखाशिर्षकाखाली किती शिल्लक आहे त्याची माहिती दिलेली नाही. तसेच महापालिका क्षेत्रात आणखी किती आरक्षित कम्युनिटी हॉल ची जागा ताब्यात घेणे बाकी आहे व त्यांची आजची परिस्थिती हयांची माहिती दिलेली नाही. तरी सदरची माहिती परिपुर्ण पद्धतीने घोषवाऱ्या मध्ये नमुद करून विषय महासभेच्या मान्यतेसाठी फेरसादर करावा.

सुचक — श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक — श्री. दुबेर इनामदार

मा. महापौर

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/०९/२०१३
## (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ३५ :- आरक्षण क्र. २३१, मार्केट विकसित करणेस प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र.३६:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे नवघर सर्व्हे क्र. ३००/१ बी, २अे४५/१ बी, २अे, ३००/१ बी, २अे४५/१ बी, २अे आरक्षण क्र. २३१ मार्केट करिता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र २५००.०० चौ.मीटर असून बहुतांशी जागा ताब्यात आहे. सदर जागेत मार्केट इमारत बांधण्याकरीता रु. ३,७१,२२,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. मात्र प्रशासनाने आरक्षित जागा विकसित करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये किती तरतुद करण्यात आलेली आहे व त्या लेखाशिर्षाखाली किती शिल्लक आहे त्याची माहिती दिलेली नाही. तसेच महापालिका क्षेत्रात आणखी आरक्षित मार्केटची जागा ताब्यात घेणे बाकी आहे व त्यांची आजची परिस्थितीची माहिती दिलेली नाही. तरी सदरची माहिती परिपूर्ण पध्दतीने गोषवाऱ्यामध्ये नमुद करुन विषय मा. महासभेच्या मान्यतेसाठी फेरसादर करावा.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार पांडे व अनुमोदक श्री. राजेश वेतोसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयाप्रमाणे आरक्षण क्रमांक १०८ मार्केटसाठी आरक्षीत आहे. सदर मार्केटचे ४००० चौ.मी. इतके क्षेत्रफळ आहे. यापैकी काही जागा महापालिकेच्या ताब्यात आलेली असून सदर जागेवर मार्केट विकसीत करण्याचे काम तातडीने हाती घ्यावे तसेच शिल्लक असलेली जागा लवकरात लवकर ताब्यात घेण्याकरीता पुढील कार्यवाही करावी, अशी सुचना मी मुळ ठरावात सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(53)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २१/०९/२०१३**

(दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ३६ :-** **राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरिता पोलिस पथक निर्माण करणे व पोलिस स्टेशन स्थापन करणेबाबत....**

**ठराव क्र. ३७ :-**

राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे नियंत्रण व निर्मूलनासाठी उपाययोजना करण्याकरिता नागरि पोलिस ठाणे व यंत्रणा निर्माण करणेबाबत शासनाने दि.०२ मार्च २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. सदरच्या धोरणात्मक निर्णयानुसार पोलिस अधिकारी/कर्मचारी निर्माण करावयाच्या ७० पदास मा. महासभा ठराव क्र. १८ दि.०१/०७/२००९ अन्वये मंजुरी दिलेली आहे व त्यानुसार दि.०४/०७/२००९ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागास सादर करण्यात आला होता. परंतु, शासनाचे दि. १७/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेने ठरावाद्वारे मंजुर केलेल्या प्रस्तावामध्ये अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्त्याची रक्कम आगाउ तिमाही हप्त्याच्या स्वरूपात शासनाकडे जमा करणे बाबत अट घालून नव्याने मंजूरीचा ठराव शासनास पाठविण्यास कळविले आहे.

त्यानुसार दि.२०/०२/२०१३ रोजीच्या महासभेसाठी नागरि पोलिस ठाणे व यंत्रणा अंतर्गत नियुक्त करण्यात येणाऱ्या पोलिस अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते मंजूरीसाठी प्रस्ताव व गोषवारा दि.०७/०२/२०१३ रोजी सादर करण्यात आला होता.

मा. महासभा ठराव क्र. ५९ दि. २०/०२/२०१३ अन्वये वेतन/भत्ते यावर दरमहा अपेक्षित खर्च परिगणना करून आणि तसेच पोलिस अधिकारी/कर्मचारी यांचे कामकाजावरील प्रशासकिय नियंत्रणाबाबत शासनाचे मार्गदर्शन मागवून फेर सादर करण्याबाबत निर्णय झालेला आहे.

नागरि पालिस ठाणे व यंत्रणेसाठी नियुक्त करावयाच्या एकूण ७० अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी मासिक वेतन रक्कम रू. ०१ कोटी व वार्षिक वेतन रक्कम रू. १२ कोटी वेतन व भत्त्यावर खर्च अपेक्षित आहे.

पोलिस अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रशासकिय नियंत्रण हे संबंधित जिल्ह्यातील पोलिस आयुक्त/जिल्हा पोलिस अधिक्षक यांचे राहिल असे नगरविकास विभागाने दि.२७/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस कळविले आहे.

मा. उच्च न्यायालयातील प्रलंबित जनहित याचिका क्र. १,३५ व ३६/२००७ मधील आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या पूर्ततेबाबत शासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत विकासाच्या विविध योजना कार्यन्वित आहेत. जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत भुयारी गटार योजना, नगरोत्थान अंतर्गत एकात्मिक नाले योजना तसेच जवळच्या भविष्यात शहराकरिता अतिरिक्त पाणी पुरवठा योजना राबविल्या जात आहेत. महापालिकेला उत्पनाचे स्त्रोत्र विषेशतः जास्त नसल्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती बिकट आहे. एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून घेतलेल्या कर्जाची परतफेडही करणे गरजेचे आहे. तरी शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेउन राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात

(५४)

अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्राकरिता पोलिस पथक निर्माण करणे व पोलिस स्टेशन स्थापन करणेकरिता अनुदानाच्या स्वरूपातच सदर विषयाबाबत आर्थिक मदत करावी.

महानगरपालिकेने वर्तमान पद्धतीनेच अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे निष्कासन करण्यासाठी पोलिस बंदोबस्त घेत आहे ही कार्यपद्धत तशीच राबवावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** सौ. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदन :-** श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**पिठासिन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

55

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २१/०९/२०१३.

(दि. १७/८/२०१३ रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. :- ३७ :- इमारती बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डास प्रतिबंधक उपाययोजना उपविधीस अंतीम मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. :- ३८

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे केल्या जाणाऱ्या डास प्रतिबधंक उपाययोजना संदर्भात तयार करण्यात आलेल्या “इमारतीचे बांधकाम करताना किंवा त्यानंतर करावयाची डासप्रतिबंधक उपाययोजना उपविधी-२०१२” स ही महासभा अंतिम मंजुरी देत आहे.

सूचक :-
श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :-
श्री. जुबेर इनामदार

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(५०)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २१/०९/२०१३.

(दि. ११/९/२०१३ रोजीची तहकुब सभा)

अभिनंदन ठराव

प्रकरण क्र. :- —

ठराव क्र. :- ३९

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे प्रस्तावित २०० खाटांचे रुग्णालय हस्तांतरित करुन घेण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. सदर रुग्णालय शासनाने चालविण्यास घ्यावे यासाठी प्रयत्न केल्याबद्दल मा. उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार, मा. आरोग्यमंत्री श्री. सुरेशजी शेट्टी, मा. नगरविकास राज्यमंत्री श्री. उदयजी सावंत, मा. पालकमंत्री श्री गणेशजी नाईक, मा. खासदार श्री. संजीवजी नाईक, मा. आमदार श्री. गिल्बर्टजी मेंडोसा, मा. आमदार श्री मुझफ्फरजी हुसेन, मा. महापौर श्रीम. कॅटलिन परेरा व मा. उपमहापौर श्रीम. सय्यद नुरजहाँ नजर हुसेन यांच्या अभिनंदनाचा ठराव ही महासभा करत आहे.

सूचक :-

श्री. बर्नाड डिमेलो

अनुमोदक :-

श्री. जुबेर इनामदार

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/०९/२०१३

प्रकरण क्र. ३८ :- सन्मा. सदस्य श्री. प्रशांत केळूसकर यांचा दिनांक ०५/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मिरा भाईंदर शहरामध्ये रस्त्यांच्या दुर्दशेबाबत.

(सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. २१/०९/२०१३

प्रकरण क्र. ३९ :- सन्मा. सदस्य श्री. प्रशांत केळूसकर यांचा दिनांक ०५/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. नविन नाट्यगृह बांधणेबाबत

(सदरचा प्रस्ताव फेटाळण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

**प्रकरण क्र. ४० :- दि. ०६/०७/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ४० :-**

दि. ०६/०७/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. धृवकिशोर पाटिल

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

**प्रकरण क्र. ४१ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.**

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे

१) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
२) श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
३) श्री. प्रमोद जयराम सामंत
४) श्री. राजेश शंकर वेतोसकर
५) डॉ. राजेंद्र जैन
६) डॉ. रमेश जैन
७) श्री. संदिप मोहन पाटील
८) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील

**ठराव क्र. ४१ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदस्यांपैकी निम्मे आठ सदस्य माहे नोव्हेंबर २०१३ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना भारतीय जनता पार्टी २, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी २, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस २ व शिवसेना २ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची नेमणूक दोन वर्षाकरीता करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | सौ. वंदना मंगेश पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| २. | श्री. परशुराम म्हात्रे | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ३. | डॉ. राजेंद्र जैन | भारतीय जनता पार्टी |
| ४. | श्री. कासोदरीया अश्विन श्यामजी | भारतीय जनता पार्टी |
| ५. | सौ. मंदाकिनी गावंड | शिवसेना |
| ६. | श्री. हरिश्चंद्र आमगावकर | शिवसेना |
| ७. | श्री. पांडे हंसुकुमार कमलकुमार | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ८. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

61

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

**प्रकरण क्र. ४२ :-** **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.**

**ठराव क्र. ४२ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीवर ९ पालिका सदस्यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा. विभागीय आयुक्त सो. कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून गट/आघाडी/फ्रंट तयार केल्याप्रमाणे तौलनिक पद्धतीनुसार गटनिहाय वृक्षप्राधिकरण समितीवर खालीलप्रमाणे सदस्य संख्या प्रस्तावित होती.

१. भारतीय जनता पार्टी - ०३
२. राष्ट्रवादी काँग्रेस - ०३
३. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस - ०२
४. शिवसेना - ०१
५. बहुजन विकास आघाडी - ००

याप्रमाणे वृक्षप्राधिकरण समितीवर खालील ०९ सदस्यांची एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. सुरेश खंडेलवाल | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| २. | श्रीम. बाब्रा रॉड्रीक्स | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ३. | श्री. कमलेश भोईर | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४. | श्री. राकेश शाह | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्रीम. गिता जैन | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्री. यशवंत कांगणे | भारतीय जनता पार्टी |
| ७. | सौ. शुभांगी कोटीयन | शिवसेना |
| ८. | श्री. रकवी सुहास माधवराव | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ९. | श्री. मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

**प्रकरण क्र. ४३ :-** **महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे. सर्व गटनेत्यांनी आपली नावे द्यायची आहेत.**

**ठराव क्र. ४३ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(१)१(अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठित करण्याची तरतूद आहे. महिला व बालकल्याण समिती ९ सदस्यांची नेमणूक करणेकरिता खालीलप्रमाणे आजमितीस असलेल्या सदस्य संख्येवरुन तौलानिक संख्या निश्चित करण्यात आलेली आहे.

१. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी - ०३
२. भारतीय जनता पक्ष - ०३
३. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस - ०२
४. शिवसेना - ०१

वरील तौलानिक संख्येप्रमाणे गटनेत्यांकडून प्राप्त झालेल्या नावांनुसार खालील प्रमाणे ०९ सदस्यांची महिला व बालकल्याण समितीवर एक वर्षाच्या मुदतीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | सदस्याचे नांव | पक्षाचे नांव |
|---|---|---|
| १ | सौ. वंदना विकास पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| २ | श्रीम. शिल्पा भावसार | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ३ | श्रीम. सॅन्ड्रा रॉड्रीक्स | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४ | श्रीम. सुमन कोठारी | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. सुनिला शर्मा | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. सुजाता शिंदे | भारतीय जनता पार्टी |
| ७ | सौ. अनिता परमार | शिवसेना |
| ८ | सौ. सुनिता कैलास पाटील | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ९ | श्रीम. काझी रशीदा जमील | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(63)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

## मा. महासभा, दि२०/०९/२०१३

प्रकरण क्र.- ४४ निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य देण्याबाबत.

ठराव क्र. - ४४

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निराधार/विधवा महिलांना कोणताही कौटुंबिक आधार नसलेल्या विधवा माहिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य केल्यास सदर महिलांना आर्थिकदृष्टया मदत होईल. त्या अनुषंगाने प्रत्येकी महिला मुलीच्या विवाहासाठी प्रत्येकी २००० प्रमाणे अर्थसहाय्य केल्यास महिलांना त्यांच्यावरील आर्थिक बोजा कमी करण्यास व मानसिक मनोबल वाढविण्याकरीता मदत होईल असे २५/५/२०११ च्या शासन निर्णयामध्ये नमुद आहे. त्या अन्वये सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात दि.२१/१/२०१३ रोजीच्या महिला व बालकल्याण समितीच्या ठराव क्र.४ अन्वये विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता रु.५०००/- प्रमाणे दोन महिलांना अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. तरी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण समितीच्या अंदाजपत्रकात निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली १५ लाख तरतुद शिल्लक आहे. तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाह करीता अनुदान देण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) अर्जदार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये रहिवासी असावी.
२) मुलीचे विवाहाचे वेळेचे वय १८ वर्षापेक्षा कमी असु नये यासाठी मुलीच्या जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला जोडावा.
३) कुटूंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
४) या योजनेखालील अनुदान फक्त दोन मुलीच्या विवाहासाठी अनुज्ञेय राहील.
५) अर्जदाराच्या मुलीचा विवाह निश्चीत झाल्यानंतर अथवा विवाहानंतर ३० दिवसापर्यंत करण्यात आलेले अर्ज ग्राहय समजण्यात येतील.
६) अर्जदार महिलेने पतीच्या निधनाबाबतचा दाखला अर्जासोबत जोडण्यात यावा.
७) मुलीचा विवाह नोंदणी झाल्याबाबतचा विवाह नोंदणी दाखला किंवा लग्नपत्रिका अर्जासोबत जोडावी.
८) सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरीता देण्यात येणार नाही.

तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता सन २०१३ पासून पुढे रु. 12000/- इतके अनुदान देण्यासाठी हि सभा आर्थिक व प्रशाकीय मंजूरी देत आहे.

सुचक — श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन — श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

**प्रकरण क्र. ४५ :-** **निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना आर्थिक मदत प्रदान करणेबाबत. (दि. २०/०९/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. ११)**

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना **आर्थिक मदत** दिल्यास सदर महिलेला आर्थिक दृष्टया मदत होईल तसेच मुलांमुलींना पुढील शिक्षण देण्यास **निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांना** सोयीचे होईल. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण योजने अंतर्गत १५ लाख तरतुद शिल्लक आहे. तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना प्रस्तावित आर्थिक मदत खालीलप्रमाणे.

**आर्थिक मदत :-**

| शैक्षणिक वर्ग | वार्षिक मदत रुपये |
|---|---|
| १ ते ५ | ३००० रु. |
| ६ ते ८ | ४००० रु. |
| ९ ते १२ | ५००० रु. |
| १२ ते पदवी | ६००० रु. |

**आर्थिक मदत देणेसाठी योजनेच्या अटीशर्ती :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामधील ५ वर्षाचा रहिवासी असावा.
२) बोनाफाईड सर्टिफिकेट
३) शिधापत्रकाची सत्यप्रत.
४) निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेचे वय १८ ते ५० पर्यंत असावे.
५) अर्जासोबत वडीलांचा मृत्युदाखला व घटस्फोटीत असल्यास त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६) कुटूंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
७) कुटुंबातील दोन मुलानांच या योजनेचा लाभ घेता येईल.
८) या वर्षाची शैक्षणिक फी संबधी शैक्षणिक शुल्क मागणी पत्र/शुल्क भरणा केलेला असल्यास पावती जोडणे आवश्यक आहे.
९) सदर योजनेचा लाभ दोन वर्षातुन एकदाच देण्यात येईल.
१०) अर्जा सोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.
११) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक मदत मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेंच्या मुलामुलींना सन २०१३ पासुन पुढे **वरीलप्रमाणे आर्थिक मदत प्रदान करणेबाबत** हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(65)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

**प्रकरण क्र. ४६ :- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.**
**ठराव क्र.४८:-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दरवर्षी दिवाळी सणा कालावधीत सानुग्रह अनुदान देण्याची मागणी करण्यात येते.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१२ मध्ये महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. २०, दि. १४/१२/२०१२ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४४८ | ७८०० | ११२९४४०० |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ७५०० | १४४७५०० |
| ३ | संगणक चालक/लघुलेखक (अस्थायी) | ७७ | ५००० | ३८५००० |
| ४ | बालवाडी शिक्षिका | ०५ | ४००० | २०००० |
| ५ | आर.सी.एच. कर्मचारी (अस्थायी) | २९ | ५००० | १४५००० |
| ६ | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी | २७ | ४००० | १०८००० |
| ७ | लिंक वर्कर | १०६ | ७०० | ७४२०० |

वरील ठरावाच्या अनुषंगे इतर अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान दिलेला तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ३६०० | ७२०० |
| | एकुण | १८८७ | | १३४८१३०० |

अशा प्रकारे १८८७ अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रु. १,३४,८१,३००/- एवढे सानुग्रह अनुदान देण्यात आले होते.

चालू वर्षासाठी विविध कर्मचारी व कामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१३ रोजी कार्यरत स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्यानुसार पुढील प्रमाणे यावर्षी दिवाळी सणा कालावधीत सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशील | कार्यरत अधिकारी/कर्मचारी सन २०१२-१३ | प्रती कर्मचारी सानुग्रह अनुदानाची रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते ०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४५२ | ११,००० | १,५९,७२,००० |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ११,००० | २१,२३,००० |
| ३ | संगणक चालक, लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७७ | ८,५०० | ६,५४,५०० |
| ४ | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ५,००० | २५,००० |
| ५ | आर. सी. एच. विभाग (ठोक मानधनावरील कर्मचारी) | २९ | ८,५०० | २,४६,५०० |
| ६ | क्षयरोग व कुष्ठरोग नियंत्रण कर्मचारी | ३३ | ५,००० | १,६५,००० |
| ७ | लिंक वर्कर | १२७ | २,००० | २,५४,००० |
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,५०० | ९,००० |
| ९ | स्व. इंदिरा गांधी रुग्णालय मधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १७ | ८,५०० | १,४४,५०० |
| १० | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०६ | ४,००० | २४,००० |
| | एकुण | १९४१ | | १,९६,१७,५०० |

अशा महानगरपालिकेतील आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सन-२०१३१४ च्या मंजुर अंदाजपत्रकात रक्कम रु. २.०० तरतुद आहे. तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. १६.५० लक्ष एवढी तरतुद आहे. या तरतुदीतून वरील प्रमाणे सानुग्रह अनुदान वाटप करणेस एकुण रु. १,९६,१७,५०० रक्कम देय होत आहे.

वरील प्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी/अस्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील　　अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | निरंक |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | सिंग मदन उदितनारायण | |
| ४ | ॲड. रवि व्यास | ४ | पाटील रोहिदास शंकर | |
| ५ | पाटील वंदना विकास | ५ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | मेहता डिंपल विनोद | |
| ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ८ | केळुसकर प्रशांत नारायण | |
| ९ | गोविंद हेलन जॉर्जी | ९ | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | १० | रावल भगवती जयशंकर | |
| ११ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | ११ | शाह राकेश रतिशचंद्र | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | खण्डेलवाल सुरेश | १२ | शरद केशव पाटील | |
| १३ | नरेश तुकाराम पाटील | १३ | मेघना दिपक रावल | |
| १४ | अनिता ज़यवंत पाटील | १४ | जैन गिता भरत | |
| १५ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १५ | जैन रमेश धरमचंद | |
| १६ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | १६ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १७ | भावसार शिल्पा कमलेश | १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| १८ | वंदना रामदास चक्रे | १८ | सुजाता रविकांत शिंदे | |
| १९ | भोईर कमलेश यशवंत | १९ | सिमा कमलेश शहा | |
| २० | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | २० | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २१ | रविंद्र भिमदेव माळी | २१ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २२ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २२ | जैन दिनेश तेजराज | |
| २३ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २३ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २४ | पाटील सुनिता कैलास | २४ | अनिल बाबुराव भोसले | |
| २५ | वेतोसकर राजेश शंकर | २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| २६ | प्रभात प्रकाश पाटील | २६ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| २७ | बगाजी शर्मिला विल्सन | २७ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| २८ | रकवी सुहास माधवराव | २८ | तारा विनायक घरत | |
| २९ | झिनत रऊफ कुरेशी | २९ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३० | मोहम्मद फरिद सिंद्धीक कुरेशी | ३० | शुभांगी महिन कोटियन | |
| ३१ | पुजारी कांचना शेखर | ३१ | जयमाला किशोर पाटील | |
| ३२ | काझी रशीदा जमील | ३२ | परमार अनिता भरत | |
| ३३ | इनामदार जुबेर | ३३ | पाटील प्रणाली संदिप | |
| ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ३५ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | ३५ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ३६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३६ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | |
| ३७ | डिसा मर्लिन मर्विन | ३७ | ठाकूर अरविंद दत्ताराम | |
| ३८ | भट दिप्ती शेखर | | | |
| ३९ | विराणी रेखा अनिल | | | |
| ४० | सामंत प्रमोद जयराम | | | |
| ४१ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४२ | भोईर भावना राजू | | | |
| ४३ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४४ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

68

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

प्रकरण क्र. ४७ :- सन्मा. सदस्या सौ. निलम हरिश्चंद्र ढवण यांचा दिनांक १०/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. अपुऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासंदर्भात.

(प्रस्तावावर चर्चा करण्यात आली.)

सही/-
महापौर
मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

**प्रकरण क्र. ४८ :- सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक १४/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- नवघर शाळेच्या मैदानाबाबत.**

**ठराव क्र. ४७ :-**

नवघर शाळेचे मैदान हे मनपाचे आरक्षण नाही. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद पासून ते शाळेचे मैदान आहे. आणि शाळेच्या मैदानावर पहिला हक्क हा त्या शाळेच्या विद्यार्थ्यांचा आहे. शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना खेळ आणि इतर उपक्रमांपासुन वंचित ठेवून इतर कार्यक्रमांना मैदान देऊन खोदुन / बुजवुन / उखडून त्याच्या बकालपणात भर पडत आहे.

शिवाय कार्यक्रमांदरम्यान लागणाऱ्या स्पिकर्स आणि डी.जे. सारख्या इतर वाद्यांमुळे शांततेचा भंग होत असतो. कारण नवघरचे मैदान हे मध्यवर्ती ठिकाण आहे. आजुबाजुला नागरी वस्ती आहे. तसेच तेथे मनपाची शाळा आहे. पालिकेचे आरोग्य केंद्र आहे. जेष्ठ नागरीकांचे विरंगुळा केंद्र आहे. मॉर्निंग वॉकसाठीचा जॉगिंग ट्रॅक आहे. ह्या सर्व बाबी ध्यान्यात घेऊन हे मैदान यापुढे कोणत्याही खाजगी / वैयक्तीक / सार्वजनिक कार्यक्रमांसाठी भाड्याने देऊ नये तसेच मनपाच्याही इतर कोणत्याही स्थायी कामासाठी वा योजनेसाठी त्याचा वापर केला जाऊ नये. त्याचे आजचे स्वरुप व स्वातंत्र्य आहे तसे जोपासले जावे. तसेच मिभामनपाच्या दि. ३०/१२/२०११, ठराव क्र. ८७ व दि. २०/०३/२०१३ रोजीच्या ठरावातून नवघर मनपा शाळेचे मैदान भाड्याने देण्याची बाब काढून टाकण्यात यावी. तसेच ह्यापुढे कोणत्याही शाळेचे मैदान सार्वजनिक कामासाठी देण्यात येऊ नये. शाळेच्या मैदानात फायर फायटर ठेवण्याची सोय करण्यात येऊ नये. मनपा शाळेच्या पाठीमागे असलेल्या पाण्याच्या टाकीजवळ फायर फायटर ठेवण्याची सोय करण्यात यावी.

**सुचक :- सौ. प्रभात प्रकाश पाटील** **अनुमोदक :- सौ. वंदना विकास पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

**प्रकरण क्र. ४९ :-** **सन्मा. सदस्य श्री. अशरफ मेहमुद शेख यांचा दिनांक १४/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या दोन्ही बाजुचा परिसर "ना फेरीवाला क्षेत्र" घोषीत करणेबाबत.**

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि.१९/०७/२००८ प्रकरणक्र.२७ ठराव क्र. २९ मिरा भाईंदर महानगरपालिका शहराकरीता ना-फेरीवाला व फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले. त्यात मिरा रोड पुर्व नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या समोरील दोन्ही बाजुचा परिसर फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषीत करण्यांत आले होते. सदर ठिकाणी फेरीवाले, फळ विक्रेते, भाजी विक्रेते आपल्या हातगाड्या दुकानांच्या समोर लावतात आणि त्यामुळे शाळांच्या बसेस व महापालिका परिवहन सेवेच्या बसेसच्या रहदारीस अडथळा निर्माण होतो व मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होते. याचा परिणाम सदर रस्त्यावरुन ये-जा करणा-या नागरीकांना, शालेय विद्यार्थ्यांना, वृध्द नागरीकांना ये-जा करण्यास फार अडचण होते व प्रसंगी विलंब सहन करावा लागतो. क्षेत्रातील रहिवाशांच्या वारंवार येणा-या तक्रारीच्या अधिन राहून **नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या दोन्ही बाजुचा परिसर "ना फेरीवाला क्षेत्र"** घोषीत करण्यांत येत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अशरफ मेहमुद शेख** **अनुमोदक :- श्रीम. वंदना चक्रे**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. जुबेर इनामदार व अनुमोदक श्री. राजेश वेतोसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

केंद्र शासनाने सन २००९ मध्ये जाहीर केलेल्या राष्ट्रीय फेरीवाल्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आदेश मा. सर्वोच्य न्यायालयाने दिलेले आहेत. शहरामध्ये फेरीवाल्यांसाठी स्ट्रीट व्हेण्डर्स (प्रोटेक्शन ऑफ लायव्हीलीहूड अँण्ड रेग्युलेशन ऑफ स्ट्रीट व्हेंडींग) बिल-२०१२ हे प्रस्तावित कायद्याचे विधेयक लोकसभेने मंजूर केले आहे.

त्या अनुषंगाने मिरा-भाईदर शहरामध्ये फेरीवाल्यांचे नियोजन करण्यासाठी धोरणाच्या माध्यमातुन आवश्यक उपाययोजना करावी, अशी मी मुळ ठरावात सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(८१)

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

**दु:खवटा ठराव क्र. ४९ :-**

आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांचे पिताश्री कै. गजानन पाटील ह्यांचे काल निधन झालेले आहे. तसेच खारीगावचे रहिवासी कै. चंद्रकात पाटील ह्यांचा शोकप्रस्ताव आहे. तसेच कै. दामोदर काशिनाथ पाटील राहणार नवघर ह्यांचा शोकप्रस्ताव आहे. महापालिकेमधील पाणी पुरवठा विभागात काम करणारे कनिष्ठ अभियंता कै. अझर यांचे निधन झाले आहे. तसेच राष्ट्रवादीचे कार्यकर्ते कै. केतन जांगीड ह्यांचा मालाडमध्ये खुन झालेला आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रविण पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/११/२०१३

प्रकरण क्र. ५० :- दि. ११/०९/२०१३ व दि. २१/०९/२०१३ (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ५० :-

दि. ११/०९/२०१३ व दि. २१/०९/२०१३ (दि. ११/०९/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | निरंक |
| २ | ॲड. रवि व्यास | २ | कांगणे यशवंत बगाजी | |
| ३ | पाटील वंदना विकास | ३ | सिंग मदन उदितनारायण | |
| ४ | वंदना मंगेश पाटील | ४ | पाटील रोहिदास शंकर | |
| ५ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ५ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ७ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ८ | डॉ. आसिफ गुलाब शेख | ८ | मेहता डिंपल विनोद | |
| ९ | गोविंद हेलन जॉर्जी | ९ | केळुसकर प्रशांत नारायण | |
| १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | १० | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| ११ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | ११ | रावल भगवती जयशंकर | |
| १२ | खण्डेलवाल सुरेश | १२ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १३ | नरेश तुकाराम पाटील | १३ | शरद केशव पाटील | |
| १४ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | १४ | जैन गिता भरत | |
| १५ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | १५ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १६ | भावसार शिल्पा कमलेश | १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| १७ | वंदना रामदास चक्रे | १७ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | |
| १८ | भोईर कमलेश यशवंत | १८ | सुजाता रविकांत शिंदे | |
| १९ | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | १९ | महेता नरेंद्र लालचंद | |
| २० | रविंद्र भिमदेव माळी | २० | सिमा कमलेश शहा | |
| २१ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २१ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २२ | पिसाळ मनिषा नामदेव | २२ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २३ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २३ | जैन दिनेश तेजराज | |
| २४ | पाटील सुनिता कैलास | २४ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २५ | वेतोसकर राजेश शंकर | २५ | अनिल बाबुराव भोसले | |
| २६ | प्रभात प्रकाश पाटील | २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| २७ | बगाजी शर्मिला विल्सन | २७ | संध्या प्रफुल्ल पाटील | |
| २८ | रकवी सुहास माधवराव | २८ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| २९ | झिनत रऊफ कुरेशी | २९ | तारा विनायक घरत | |
| ३० | मोहम्मद फरिद सिद्धीक कुरेशी | ३० | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | |
| ३१ | पुजारी कांचना शेखर | ३१ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३२ | काझी रशीदा जमील | ३२ | जयमाला किशोर पाटील | |
| ३३ | इनामदार जुबेर | ३३ | परमार अनिता भरत | |
| ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३४ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ३५ | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | ३५ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| ३६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३७ | डिसा मर्लिन मर्विन | | | |
| ३८ | भट दिप्ती शेखर | | | |
| ३९ | विराणी रेखा अनिल | | | |
| ४० | जाधव मोहन महादेव | | | |
| ४१ | भोईर भावना राजू | | | |
| ४२ | भोईर राजू यशवंत | | | |
| ४३ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/११/२०१३

**प्रकरण क्र. ५१ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. रेन्टल हाऊसिंग स्कीम भागातील सोयी पुरविणे या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र.५१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. कडील रेन्टल हाऊसिंग स्कीम अंतर्गत खालील प्रकल्पाच्या नकाशांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | मौजे | सर्व्हे क्र./हिस्सा क्र. | भूखंडाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | महाजनवाडी<br><br>सुधारीत | सि.स.क्र. ४५०९ ते ४५१३, ४५१७, ४५४७, ४५४८, ४५७२ ते ४५७५, ४६०४, ४६०९, ४६१०, ४६११, ४६५२, ४६९१, ४६९२, ४७०२ ,४७१०, ते ४७२१, ४७२४ ते ४७३२, स.क्र. ९५/१० ते १२, ९५/१४, १५, ९७/३पै. ९७/५पै, सि.स.क्र. ४६३८,४६३९, ४६४७, ४६८६, ते ४६९०, ४७०४ ते ४७०९, ४७२२, स.क्र. ९४/१, ९४/२, २६० पै. सि.स.क्र. ४३६२, ४४५५, ४४५६, ४३६३, ४४५४, ४६१४, ४५१५, ४५१६, ४५१८, ४५१९, ४५२०, ४५४९, ४१००पै. ९६/१, ९६/४ | ५०२०२.७६ चौ.मी |
| २ | नवघर | ४२/१, ४१/६<br>२५६/१, २५४/६<br>सुधारीत | ३३००.०० चौ.मी. |
| ३ | नवघर | १२९, १३०/३ ४४५,<br>४४६/३<br>सुधारीत | ८९०५.०० चौ.मी |
| ४ | महाजनवाडी | १०७/१ पै., १पै., १०८/१,२,३ १०९/१ ते ७,८ पै., ९ अ, १० ते २८, ११०/१पै. ते ५ पै.<br>सुधारीत | ९७००.०० चौ.मी<br><br>११४५२ चौ.मी |
| ५ | मिरा (महाजनवाडी) | सि.टी. एस. क्रं. ४४३६ ते ४४५१, ४४८१, ४४८२, ४४८६ ते ४५०८, ४५४० ते ४५४६, ४५६५ ते ४५७१, ४५९९ ते ४६०३, ४६९९, ४३९८ ते ४४०३<br>सुधारीत | ६५४२.९५ चौ.मी. |

वरील प्रकल्पाच्या ठिकाणी सोयी सुविधा पुरविण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. ने मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रु. ७.९७ कोटी रक्कम वर्ग केलेली आहे. सदर रक्कम मिरा-भाईंदर महानगरपालिकेने "एम.एम.आर.डी.ए. रेन्टल हाऊसिंग स्कीम भागातील सोयी पुरविणे" या लेखाशिर्षाखाली सन २०१३-१४ या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे.

वरील तक्त्यामधील प्रकल्पाच्या ठिकाणी बांधण्यात येत असलेल्या इमारतीकडे जाणारे रस्ते, गटारे यांची कामे करावी लागणार असून त्यांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) रामदेव पार्क रस्ता श्वेता रेसीडेन्सी ते के.डी. एम्पायर पर्यंत रस्ता तयार करणे व एका बाजूस गटार बांधणे. | रु. २,३६,९८,४५०/- |
| २ | मिरारोड (पूर्व) एस.के.स्टोन ते सिंगापूर प्लाझा व पुढे रेल्वे स्टेशन पर्यंतचा रस्ता मजबुतीकरणासह तयार करणे. | रु. २,८९,०७,२००/- |
| ३ | मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन शांतीसागर हॉटेल ते पोस्ट ऑफिस पर्यंतचा रेल्वे समांतर रस्ता तयार करणे. | रु. ७४,४८,५००/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) जया अपार्टमेंट बी विंग ते हरी ओम टॉवर/एम आय डी सी-प्लेझंट पार्क रस्ता जोडणारा डी.पी. रस्ता व उर्वरीत गटार बांधणे. | रु. १,५६,२०,५५०/- |

वरील कामे करण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. मार्फत रु. ७.९७ कोटी रक्कम महानगरपालिकेकडे जमा केलेली असून सदर रक्कमेची तरतूद सन २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. तरी सदर कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक सौ. प्रभात प्रकाश पाटील व अनुमोदक श्री. राजेश वेतोसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट मधील ज्योती पार्क ते चाळघर नाल्यापर्यंत चा रस्ता मजबुतीकरणासह तयार करणे रु. २,३०,०९,१००/- या कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे ही सुचना मुळ ठरावात समाविष्ट करुन घेण्यात यावी.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य मदन उदितनारायण सिंह ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

उपरोक्त विषय चांगल्याप्रकारे राबविण्यात यावा व त्वरीत पूर्ण व्हावा, ह्याकरीता संबंधित विषय आपल्या महानगरपालिकेतील असलेल्या कायमस्वरुपी (परमनन्ट) कर्मचाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात यावे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. सुरेश खंडेलवाल व अनुमोदक श्री. वेंचर मेन्डोंसा ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर (पूर्व) रामदेव पार्क रोडवरील सुर्या ऑर्चिड ते आ.क्र. २४८ पर्यंतचा डी. पी. रोड तयार करुन गटारे बांधणे, अंदाजित खर्च रु. १,०१,६८,२००/- या कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे अशी सुचना मुळ ठरावात समाविष्ठ करण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(76)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा**

**दि. १९/११/२०१३**

**प्रकरण क्र. ५२ :-** भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११९ येथे क्रिडा संकुल विकसित करणे कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास व महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देणे.

**ठराव क्र.** ५२ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सदर विषयाबाबत दिलेल्या गोषवाऱ्यामध्ये शिल्लक असलेल्या वास्तु बांधकामासाठी आर्थिक तरतुदी बाबत स्पष्टीकरण दिलेले नाही. तथापि सदरचा विषयाची परिपुर्ण माहिति पूढच्या मा. महासभेत मान्यते करिता सादर करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :-** श्री. बर्नाड डिमेलो.

**अनुमोदन :-** श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**पिठासिन अधिकारी**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/११/२०१३

प्रकरण क्र. ५३ :- भाईंदर (पूर्व) जैसल पार्क चौपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नुतनीकरण करणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

(सदरचा विषय मा. महापौरांच्या आदेशाने तहकुब करण्यात आला)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १९/११/२०१३

**प्रकरण क्र. ५४ :- राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे निष्कासन करण्यासाठी महानरगपालिका क्षेत्राकरीता पोलीस पथक निर्माण करणे व पोलीस स्टेशन स्थापन करणेबाबत...**

**ठराव क्र.** :- ५३

राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी उपाय योजना करण्याकरीता शासन निर्णय दि. ०२ मार्च २००९ अन्वये निर्णय घेतला आहे. नागरी गुन्ह्यांची नोंदणी, तपासणी व खटला भरण्यासाठी स्थापन करावयाच्या विशेष कक्षासाठी खालील संवर्गातील पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण करणे प्रस्तावित आहे.

परिशिष्ट-अ नागरी पोलीस यंत्रणेसाठीचा आकृतीबंध
(महानगरपालिका क्षेत्रासाठी)

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारीत) | ड-वर्ग मनपासाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक | ८०००-२७५-१३५०० | ०१ |
| २. | पोलीस निरीक्षक | ७४५०-२२५-११५०० | ०१ |
| ३. | सहा. पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | - |
| ४. | पोलीस उप- निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ०४ |
| ५. | सहा. पोलीस उप- निरीक्षक | ४५००-१२५-७००० | ०० |
| ६. | पोलीस हवालदार | ४०००-१००-६००० | ०४ |
| ७. | सशस्त्र पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | २४ |
| ८. | महिला पोलीस शिपाई | ३०५०-७५-४५९० | १६ |
| ९. | पोलीस नाईक | ४०००-१००-६००० | ०३ |
| एकुण | | | ५३ |

परिशिष्ट -ब नागरीगुन्ह्यांच्या नोंदणी, तपास व खटला भरणेकामी स्थापन करावयाच्या विशेष पोलीस स्टेशनसाठीचा आकृतीबंध

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | ड-वर्ग मनपासाठी पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | सहा. पोलीस निरीक्षक | ६५००-२००-१०५०० | ०१ |
| २. | पोलीस उप- निरीक्षक | ५५००-१७५-९००० | ०१ |
| ३. | सहा.पोलीस उप- निरीक्षक | ४५००-१२५-७००० | ०१ |
| ४. | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००-१००-६००० | ०४ |
| ५. | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | ०८ |
| ६. | कनिष्ठ लिपीक | ३०५०-७५-३९५०/८०/४५९० | ०१ |
| ७. | वाहन चालक | ४०००-१००-६००० | ०१ |
| | | एकुण | १७ |

उक्त पदे राज्य शासनाच्या आस्थापनेवर निर्माण केली जाणार आहेत. तथापी त्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती आगांवू (Advance Payment) च्या स्वरुपात महानगरपालिकेने करावयाची आहे. ही बाब विचारात घेऊन ही सभा

अ) उक्त शासन निर्णयात नमुद केलेल्या आणि महानगरपालिकेसाठी अनुज्ञेय असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते, निवृत्तीवेतन अंशदान होणाऱ्या खर्चास व सदर खर्चाची रक्कम आगावू तिमाही हप्त्याच्या स्वरुपात राज्य शासनाकडे/संबंधित पोलीस आयुक्तालयाकडे भरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच

ब) सदर अधिकारी व कर्मचारी यांना पुरविण्यात येणाऱ्या वाहन, कार्यालय व इतर सुविधांवर येणाऱ्या खर्चास व तो शासनाकडे/संबंधित विभागाच्या पोलीस आयुक्तांकडे आगावू स्वरुपात भरण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच

क) सदर कक्षाच्या निर्मितीमुळे होणाऱ्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात नविन लेखाशिर्ष निर्माण करुन त्याखाली आवश्यक तरतुद प्रतिवर्षी करण्यासाठी ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील **अनुमोदन :-** श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम केला आहे.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/११/२०१३

**प्रकरण क्र. ५५ :-** **महानगरपालिकेच्या विविध प्रयोजनासाठी शासकीय जागा मागणी प्रस्ताव करणे व आर्थिक खर्चासाठी प्रशासकीय मंजूरी देणे**

**ठराव क्र.** ५३ :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये एकूण ३८६ आरक्षणे विविध प्रयोजनाकरिता दर्शविण्यात आलेली आहेत. सदर आरक्षणापैकी शासकीय जागेवर दर्शविण्यात आलेल्या आरक्षणांची संख्या २८ आहेत. सदर पैकी हस्तांतरीत झालेल्या आरक्षणांची संख्या २७ आहेत. यापैकी मिरा भाईंदर महानगरपालिका समूचित प्राधिकरण असलेल्या आरक्षणाखालील जागा २१ आहेत व इतर संस्थांनी विकसीत करावयाच्या आरक्षणांची संख्या ७ आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजना आरक्षणाखाली असलेल्या शासकीय जागा अतिक्रमणापासून संरक्षण होणेकरिता मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील आदेश क्र. महसूल/क-१/टे-१/एलबीपी/अति.संरक्षण/एसआर-०३/१०, दि.०७/१०/२०१० अन्वये एकूण ०८ जागा व क्र. महसूल/क-१/टे-१/एलबीपी/अति.संरक्षण/एसआर-०४/१०, दि.०७/१०/२०१० अन्वये एकुण १७ जागा अशा एकूण २५ जागांचा महानगरपालिकेस आदेशात नमुद अटी व शर्तीस अधिन राहुन आगाऊ ताबा देण्यात आलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस आरक्षणा व्यतिरिक्त विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी शासकीय जागेची आवश्यकता असते. आरक्षणा व्यतिरिक्त इतर शासकीय जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेतल्यानंतर सार्वजनिक सोईसुविधा / प्रयोजनासाठी वापर करता येवू शकतो, म्हणून प्रथमतः अशा शासकीय जागा हस्तांतरीत करुन घेण्यासाठी शासनास / विविध प्राधिकरणास प्रस्ताव सादर करणे, तसेच पाठपुरावा करुन जागा ताब्यात घेणे आवश्यक आहे. म्हणून महानगरपालिकेच्या विविध प्रयोजनासाठी शासकीय जागा मागणी प्रस्ताव तयार करणे, सादर करणे व पाठपुरावा करुन हस्तांतरीत करुन घेण्यासाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्राधिकृत करुन उक्त शासकीय जागा संपादनासाठी होणा-या खर्चास ही आर्थिक व प्रशासकीय मंजूरीसह जागा हस्तांतर करुन घेण्यासाठीचे सर्व अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना देणेसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सही/-
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(81)

# मिरा -भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

ठराव क्र.:- ५४

## <u>अभिनंदनाचा ठराव</u>

पाच राज्यामध्ये झालेल्या निवडणूकीमध्ये भारतीय जनता पार्टीला राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ या राज्यामध्ये सर्वाधिक जागा व स्पष्ट बहुमत मिळालेले आहे. तसेच दिल्ली राज्यामध्ये सगळ्यात जास्त जागा भारतीय जनता पार्टीने जिंकलेले आहेत. देशातील जनतेला खंबीर नेतृत्व भारतीय जनता पार्टीकडून मिळणार असल्याचे या निवडणूकीच्या माध्यमातून दिसून येत आहे. याकरीता भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. राजनाथ सिंगजी व एनडीएचे घोषीत झालेले पंतप्रधान पदाचे उमेदवार मा. श्री. नरेंद्र मोदीजी यांचे अभिनंदन करण्याचा ठराव मांडण्यात येत आहे.

सुचक :- (सही) श्री. रोहिदास पाटील

अनुमोदक :- (सही) श्री. शरद पाटील

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

84

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

अभिनंदन ठराव क्र. ५५ :- मिझोराम विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टीस स्पष्ट बहुमत मिळून सरकार स्थापन झालेले आहे. याकरिता अभिनंदनाचा ठराव मांडण्यात येत आहे.

सुचक :- श्री. जुबेर इनामदार — अनुमोदन :- डॉ. आसिफ शेख

सही /-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(85)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/११/२०१३

प्रकरण क्र. ५६ :- सन्मा. सदस्या डॉ. नयना मनोज वसाणी यांचा दिनांक १३/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. विना परवानगी लावण्यात आलेले बोर्ड, बॅनर्स, कटआऊट कमानमुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान व नागरीकांना होणाऱ्या गैरसोयी बाबत.

(सदर विषयावर सभागृहात चर्चा करण्यात आली.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

84

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा सभा दि. ११/१२/२०१३

**अभिनंदन ठराव क्र. ५५ :-**

मिझोराम विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टीस स्पष्ट बहुमत मिळून सरकार स्थापन झालेले आहे. याकरिता अभिनंदनाचा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदन :- डॉ. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(85)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ५७ :-** दि. १९/१०/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ५६ :-

दि. १९/१०/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- 

अनुमोदन :- 

ध्रुवकिशोर पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

श्री. जुबेर इनामदार

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**ठराव क्र. ५७ :-**

आजची सभा चालू ठेवावी असा ठराव मांडत आहे. तहकुब करु नये.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोकन :- श्री. शरद पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत बगाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | पाटील वंदना विकास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | वंदना मंगेश पाटील | |
| ६ | प्रेमनाथ गजानन पाटील | ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | डॉ. आसिफ शेख | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | हेलन गोविंद | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | लियाकत शेख | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | खण्डेलवाल सुरेश | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | नरेश तुकाराम पाटील | |
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | शबनम लियाकत शेख | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | अनिता जयवंत पाटील | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २१ | नरेंद्र एल. मेहता | २१ | भावसार शिल्पा कमलेश | |
| २२ | सिमा कमलेश शहा | २२ | वंदना रामदास चक्रे | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | भोईर कमलेश यशवंत | |
| २४ | डॉ. नयना मनोज वसानी | २४ | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | |
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २६ | दिपीका पंकज अरोरा | २६ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| २७ | मीरादेवी रामलाल यादव | २७ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २८ | अनिल बाबुराव भोसले | २८ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | २९ | पाटील सुनिता कैलास | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३० | वेतोसकर राजेश शंकर | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३२ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| ३३ | तारा विनायक घरत | ३३ | रकवी सुहास माधवराव | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३४ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ३५ | शुभांगी महिन कोटियन | ३५ | पुजारी कांचना शेखर | |
| ३६ | जयमाला किशोर पाटील | ३६ | काझी रशीदा जमील | |
| ३७ | संदिप मोहन पाटील | ३७ | इनामदार जुबेर | |
| ३८ | परमार अनिता भरत | ३८ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३९ | पाटील प्रणाली संदिप | ३९ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ४० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | ४१ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | ४२ | भट दिप्ती शेखर | |
| ४३ | ठाकूर अरविंद दत्ताराम | ४३ | विराणी रेखा अनिल | |
| ४४ | भोईर भावना राजू | ४४ | सामंत प्रमोद जयराम | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

महापौर

मिरा भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. ०२/१२/२०१३ मा. महासभा सुचना क्र. ०८ यानुसार

## मा. महासभा बुधवार दि. ११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ५८ :-** मिरा भाईदर शहरातील रहदारीच्या आणि मोकळ्याय ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजनेकामी सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसविणेबाबत....

ठराव क्र. :- ( ५८ )

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सुरक्षिततेची उपाययोजना करणेकामी सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसविणेबाबतचा विषय मान्यतेसाठी प्रशासनाने महासभेमध्ये सादर केलेले आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी व वाहतुक शाखा ह्यांनी केलेल्या माणणी अनुसार सदरकामी सन-२०१३-१४ या अर्थसंकल्पात रु. ५० लाख इतकी तरतूद करण्यांत आलेली आहे. पोलीस अधिक्षक ठाणे ग्रामीण ह्यांच्या सुचनेनुसार ४६ ठिकाणी सी.सी.टिव्ही यंत्रणा कार्यान्वित करणे निकडीचे आहे. मात्र प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यामध्ये ठिकाण हे नमूद करण्यांत आलेले नाही व कोणत्या क्षमतेचे कॅमेरे बसविण्यात येणार आहेत त्याचा उल्लेख नाही व त्याच्या तांत्रीक देखरेखीची, सुरक्षिततेची जबाबदारी कशी आणि कोणाची राहील ह्याचाही उल्लेख करण्यांत आलेला नाही.

तथापि सी.सी.टि.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी सर्व पक्षीय गटनेत्यांची [handwritten insertion: व पदाधिकाऱ्यांची] समिती गठीत करुन त्यांचे सुचनेनुसार निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्तांना देण्यात येत आहेत, असा मी ठराव मांडत आहे.

सुचक : [signature] श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन : [signature] श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचुन कायम करण्यात आला

[signature]
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ५९ :-** **मिरा भाईंदर महानगर पालिका शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये प्रायोगिक स्वरुपावर सेमी इंग्रजी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१४-१५ सुरु करणेबाबत.**

**ठराव क्र. ५९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या माध्यमातुन ३५ शाळा असून सर्व शाळांची पटसंख्या ९६९८ इतकी आहे. शिक्षण मंडळ आस्थापनेवर २०२ शिक्षक पदे मंजूर आहेत त्यापैकी १९२ शिक्षक कर्मचारी कार्यरत आहेत. महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी व जागतिक प्रगतीच्या दृष्टीने इंग्रजी आवश्यक असून इंग्रजी भाषा शिकण्याकडे सगळ्यांचा कल वाढतो आहे.

महानगरपालिकेने शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शाळेत कसे शिक्षण दिले जाईल या दृष्टीने सेमी इंग्रजी अभ्यासक्रम प्रायोगिक तत्वावर मनपा शाळेत सुरु करावे. जेणेकरुन ज्या विद्यार्थ्यांना खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आर्थिक परिस्थितीमुळे प्रवेश घेता येत नाही अशा गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची उत्तम सोय होईल. या सर्व बाबींचा विचार करता, मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर ड. १ ली ते इ. ५ वी च्या वर्गांना सन-२०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून सेमी इंग्रजी अभ्यासक्रम सुरु करण्यास ही महासभा मंजूरी देत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध माध्यमांच्या महापालिकेच्या शाळांमध्ये गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यात हिंदी ०४, ऊर्दु ०५, गुजराती ०५ व मराठी २१ अशा ३५ शाळा आहेत. ज्यामध्ये एकुण **९६८९** विद्यार्थी विद्येचा लाभ घेतात. मात्र सदरच्या शाळा काही ठिकाणी दोन ते चार वर्गामध्ये कार्यान्वीत असल्यामुळे त्यांना एक पुर्ण शाळेच्या सोयींचा आनंद विद्यार्थ्यांना मिळत नाही.

तरी महानगरपालिका प्रशासनाने शहराच्या सहा प्रभाग क्षेत्रामध्ये सहा शाळा इमारतींची योजना (मॉडल स्कुलिंग पध्दत) प्रस्तावित करावी जेणेकरुन एकाच इमारतीमध्ये विविध माध्यमाचे शिक्षण, क्रिडा, संगणक व इतर सोयीसुविधा विद्यार्थ्यांना देता येतील. तसेच नेहमीच कमी पडणा-या शिक्षकांच्या कमतरतेची अडचणही सुटेल. महापालिकेलाही डागडुजी, देखरेख सोयीस्कर होईल व या शहराला एक उत्तम शैक्षणिक दर्जा प्राप्त होईल. प्रशासनाने तातडीने सदर विषयाबाबत पाठपुरावा करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे खाजगी इंग्रजी शाळांमध्ये जाण्याचे प्रमाण वाढल्यामुळे मराठी व इतर भाषिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण वाढले आहे. ह्याकरीता आपण महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सेमी इंग्रजी चालू करण्याचा विषय घेतला आहे त्यात पुढील सुचना करीत आहे.

१) ह्या शाळांमध्ये सेमी इंग्रजी अभ्यासक्रम शिकवण्यासाठी त्याच शाळेतील मराठी वा इतर भाषिक शिक्षकांचा उपयोग करु नये. म्हणजेच सेमी इंग्रजी अभ्यासक्रम शिकवण्यासाठी त्याच शिक्षकांकडून ते काम करुन घेऊ नये.

२) सेमी इंग्रजी शिकवण्यासाठी इंग्रजी माध्यमातून डी.एड केलेलेच शिक्षकांची नेमणूक करावी.

**सदर ठरावामध्ये सुचक डॉ. आसिफ शेख अनुमोदक श्री. अशरफ शेख ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ७ वी इयत्तेपर्यंत शिक्षण गोरगरीब व मध्यमवर्गीय परिवारातील विद्यार्थी घेत आहेत. परंतु ७ वी उत्तीर्ण / पास झाल्यानंतर खासगी शाळेत महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना ८ वी मध्ये प्रवेश दिला जात नाही. गोरगरीब व मध्यमवर्गीय मुलांच्या पालकांना खासगी शाळेची भरमसाठ फी परवडणारी नसल्यामुळे तसेच महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या ८ वी ते १० वी चे वर्ग व शाळा नसल्याने हजारो विद्यार्थी माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहतात

व ८ वी पासूनचे पुढील शिक्षण मिळत नसल्यामुळे ती मुले बालकामगार म्हणून अन्य कुठेतरी मोलमजदूरी व नोकरी करीत असल्याचे दिसून येते. हे शहरासाठी भुषणावह नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली असून महासभा पालिकेच्या गोरगरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत वर्ग व शाळा सुरु करणेस आर्थिक तरतूद करणेस योग्य त्या सर्व सुविधा शिक्षक व कर्मचारी वर्ग नेमणुक (मानधनावर / कायमस्वरुपी) करणेस सक्षम आहे. तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहरातील गोरगरीब व मध्यमवर्गीय पालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता आगामी वर्ष (शैक्षणिक वर्ष) जून २०१४ पासून ८ वी ते १० वी पर्यंत माध्यमिक शाळा मराठी, हिंदी, उर्दु व गुजराती माध्यमाचे शाळा / वर्ग तातडीने सुरु करण्यांत यावी. शैक्षणिक वर्ष जून २०१४ पासून सर्वप्रथम ८ वी चे मराठी, हिंदी, उर्दु व गुजराती माध्यमाच्या शाळा / वर्ग सुरु करावी व त्यानंतर दरवर्षी नैसर्गिकरित्या म्हणजेच अनुक्रमे २०१५ व २०१६ सालापर्यंत ९ वी व १० वी चे वर्ग / शाळा टप्प्याटप्प्याने सुरु करावी. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने ८ वी ते १० वी च्या माध्यमिक शाळा (मराठी, हिंदी, उर्दु व गुजराती) वा वर्ग सुरु करणेसाठी महानगरपालिका अर्थसंकल्पात आवश्यक तेवढी भरीव आर्थिक तरतूद म्हणजेच किमान रु. १०० कोटी (अक्षरी-शंभर कोटी) रुपयांची तरतूद "नवीन माध्यमिक शाळा व त्यासाठी सर्व प्रकारच्या सोयी सुविधा, शिक्षक व कर्मचारी वर्ग भरती (मानधनासह / कायमस्वरुपी)" या पध्दतीने नवीन हेड तयार करुन करण्यांत यावी.

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनातील मुख्य लेखाधिकारी, अंतर्गत लेखापरिक्षक, मुख्य लेखापरिक्षक, सर्व संबंधित विभागप्रमुख तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी व संबंधितांनी या ठराव अधिसूचनेची आज दि. ११/१२/२०१३ पासूनच म्हणजेच ठराव झाल्यापासूनच तातडीने सर्व प्रकारची प्रशासकीय व आर्थिक तरतूदीची कार्यवाही सुरु करावी. तसेच आगामी शैक्षणिक वर्ष २०१४ जून पासून ८ वी ते १० वी पर्यंतचे मराठी, हिंदी, उर्दु व गुजरातींचे वर्ग व शाळा कोणत्याही परिस्थितीत सुरु झाल्याच पाहिजे तरी सर्व संबंधित महापालिका व शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एक दुसऱ्यांशी व संबंधित विभाग प्रमुखांशी सुसंवाद साधून या ठरावाची तंतोतंत व काटेकोरपणे विनाविलंब पालन करावे. सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यास कसूर झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यांत यावी अशी सदर ठरावात माझी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(91)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ( ६० ) : विविध स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करणेबाबत.**

**ठराव क्र. ६०**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करणे प्रस्तावित आहे. सदरच्या प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाकरीता संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. या केंद्रात बँकींग सेवा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रिय लोकसेवा आयोग, व्यवसायिक प्रशिक्षण मार्गदर्शन व इतर विविध स्पर्धात्मक परिक्षेकरीता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन घेता येईल. सदर केंद्रासाठी फर्निचर, स्टेशनरी, सुविधा व त्याचबरोबर विविध प्रकाशकांच्या विविध विषयाची पुस्तके, दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक (नियतकालिक) इ.इ. बाबींची आवश्यकता असणार आहे.

उक्त सादर प्रमाणे स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्रात विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाकरीता अनुभवी संस्थेची नेमणूक करणे व केंद्र चालू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यांस तसेच स्पर्धा परीक्षा केंद्र चालू करण्यास येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास ही मा. महासभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. ध्रुवकिशोर पाटिल

अनुमोदक : श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ६१ :-** **मिरारोड व भाईंदर रेल्वे परिसर सुशोभिकरण करणे कामाबाबत निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६१ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून पश्चिम रेल्वे जात असून शहरात भाईंदर व मिरारोड ही दोन स्थानके आहेत. भाईंदर (पूर्व), भाईंदर (पश्चिम) व मिरारोड (पूर्व) येथून प्रवाशांची ये-जा असते. सदर स्टेशन बाहेरील परिसर वाहतुकीच्या व रहदारीच्या दृष्टीने योग्य नियोजन करून सुशोभित केल्यास प्रवाशांना सोयीचे होईल. सन २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात भाईंदर (पू.), मिरारोड स्टेशन बाहेर सुशोभिकरण कामे करीता रू. १.५० कोटी रकमेची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर काम करण्याकरीता मे. एच.एम.राजे कंन्सलंट प्रा.लि. या सल्लागारामार्फत नकाशे, आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्यात आलेला आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) रेल्वे स्टेशन बाहेरील परिसर सुशोभिकरण करणे. | रू. ७,१०,१९,६००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) रेल्वे स्टेशन बाहेरील परिसर सुशोभिकरण करणे. | रू. ३,१०,३८,०४०/- |

वरील प्रमाणे तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रशांत दळवी व अनुमोदक श्री. नरेंद्र मेहता ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरारोड येथे शांतीनगर सेक्टर १ ते शांती शॉपींग सेंटर (स्टेशन) पर्यंत, शांती शॉपींग सेंटर ते पोस्ट ऑफीस पर्यंत, पोस्ट ऑफीस ते सरयु माता चौक पर्यंतच्या रस्त्यांवरील प्रथम अतिक्रमणे हटवावीत, तसेच पाण्याच्या पाईपलाईन एम.टी.एन.एल. व रिलायन्सच्या केबल्स आवश्यक व गरजेप्रमाणे हटविण्यात यावीत. त्यानंतर सी.सी.रोड व सुशोभिकरणाचे काम हाती घ्यावे.

भाईंदर (पूर्व) स्टेशन ते जैसलपार्क, जैन मंदीर ते स्टेशन, बंदरवाडी ते प्रशांत हॉटेल पर्यंत रस्त्यांचे क्रॉक्रिटीकरण करावे. सुशोभिकरण करण्यापूर्वी या रस्त्यांवरील पाण्याच्या पाईपलाईन एम.टी.एन.एल. व रिलायन्सच्या केबल्स् आवश्यक व गरजेप्रमाणे हटविण्यात यावीत. त्यानंतर सी.सी. रोड व सुशोभिकरणाचे काम हाती घ्यावे अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ६२ :-   मिरारोड येथील पार्कींग आरक्षण क्र. १८४ विकसित करणेबाबत निर्णय घेणे.**
**ठराव क्र. ६२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १८४ वाहन तळासाठी राखीव आहे. सदर जागेचे क्षेत्र ३२००.०० चौ.मीटर असून सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर आरक्षण बी.ओ.टी तत्वावर विकसित करणेबाबत मा. महासभा दि.२०/११/२००९ ठराव क्र. ३९ अन्वये निर्णय घेतलेला आहे. त्याअनुशंगाने कार्यवाही करुन कंत्राटदार नियुक्त करण्यात आला होता. सदर बी.ओ.टी तत्वावरील कंत्राट रद्द करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सदर जागेवर वाहनतळ चालविण्याचे कंत्राट देण्यात आलेले आहे. सदर वाहनतळाची जागा विकसित करण्याकरीता या क्षेत्रातील अनुभवी सल्लागार नेमल्यास त्यांच्यामार्फत आरक्षणाच्या जागेवर विकसित करावयाच्या वाहनतळाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्याची अंमलबजावणी केल्यास मिरारोड स्टेशन बाहेरील रहदारी व वाहतूकीचे नियत्रण करता येऊ शकेल. तसेच महानगरपालिकेस कायमस्वरुपी उत्पन्न मिळेल. तरी सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन अंमलबजावणी साठी अनुभवी तांत्रिक सल्लागार नेमण्यास त्याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर तांत्रिक सल्लागाराची फी देण्यासाठी होणारा खर्च व प्रकल्पाच्या देयकासाठी सन २०१३-१४ अर्थ संकल्पात पुर्नविनियोजनाव्दारे व सन २०१४-१५ या नविन अर्थ संकल्पात तरतूदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर मा. महासभेपुढे सादर करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रशांत दळवी अनुमोदक श्री. प्रशांत केळूसकर ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर आरक्षणातील काही क्षेत्र सी.आर.झेड. बाधीत असल्याने हे आरक्षण विकसित करण्यापूर्वी सी.आर.झेड तरतूदीच्या विभागाकडून प्रशासनास पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. तरी प्रशासनाने सदर परवानगी घ्यावी तोपर्यंत आरक्षण क्र. १८४ विकसित करणेकरीता तांत्रिक सल्लागार नेमावा अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ६३ :-** **राजीव आवास योजनेतंर्गत संक्रमण शिबिर बांधणे कामाच्या (पथदर्शी प्रकल्प) सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.**

**ठराव क्र. ६३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत मौजे घोडबंदर येथील आरक्षण क्र. ३२६ ब संक्रमण शिबिरासाठी आरक्षित असून सदर जागेचे क्षेत्र १२१४५.०० चौमीटर एवढे आहे. सदर संक्रमण शिबिराच्या जागेवर राजीव आवास योजनेतून संक्रमण शिबिराचा पथदर्शी प्रकल्प राबविण्याच्या प्रस्तावास राज्य शासनाने तत्वतः मंजूरी दिलेली असून राजीव आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानूसार सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याबाबत महानगपालिकेस कळविलेले आहे. त्याअनुशंगाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मे. सुभाष पाटील ॲण्ड असोसिएट्स, ठाणे यांची सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे. सदर सल्लागारानी सदर संक्रमण शिबिराच्या पथदर्शी प्रकल्प म्हणून रु.१०८,९६,८०,२९४/- रकमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत असून पुढील मान्यतेस्तव शासनाकडे सादर करण्यात यावा. सदर कामी महानगरपालिकेस करावा लागणारा खर्च करण्यासाठी आवश्यक निधि उभारण्याची कार्यवाही करणे शासनाकडून कर्ज घेण्यासाठी तसेच वाणिज्य वापरकरुन देखिल आवश्यक निधि उभारण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पातंर्गत केंद्र व राज्यशासनाकडून जास्तीतं जास्त रक्कम अनुदानापोटी प्राप्त करुन घेण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत तसेच खर्चासाठी अर्थ संकल्पात पुरेशी तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्रीम. मिरादेवी यादव ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे. तसेच यामध्ये सर्व्हे नं. १६ व १७ मौजे घोडबंदर येथे डि.पी. आराखड्यामध्ये १५ मीटरचा रस्ता दाखविण्यात आलेला आहे. हा रस्ता विकसित करण्यात यावा. तसेच गरज पडल्यास रस्ता विकास करण्याकरीता मनपा निधीतून खर्च करण्यात यावा अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ६४ :-** **राज्य शासनाचे आदिवासी विभागासाठी वसतीगृह बांधून देण्याबाबतचे आदिवासी विभागाच्या प्रस्तावावर निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत आदिवासी मुलांसाठी वसतीगृहाचे (Tribal Hostel) आरक्षण आहे. सदर आरक्षण सर्व्हे क्र. ७० हिस्सा क्र. ०१ भागशः असे असून आरक्षण क्र. ३८१ ब आहे. सदर आरक्षित खाजगी जागा शासन घेण्यास तयार आहे. सदर आरक्षण तसेच इतर खाजगी जागेमध्ये १००० आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, तसेच गृहप्रमुखाचे (वर्ग - २) कार्यालय, ४ गृहपालांची कार्यालये, भोजनगृह, संगणक कक्ष, वाचनालय, व्यायाम शाळा, करमणूक सभागृह, गृहप्रमूख निवासस्थान १, गृहपाल निवासस्थान ४, रक्षक निवासस्थाने इ. चा समावेश करुन सदर काम महानगरपालिकेमार्फत करुन देण्याबाबत कळविलेले आहे. सदर विषयाबाबत अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी या कार्यालयात येऊन प्रत्यक्ष चर्चा केली व त्या अनुशंगाने दि. २२/०८/२०१३ रोजीच्या पत्राने देखिल या कार्यालयास कळविलेले आहे.

सदर वसतीगृहाकरीता लागणारी जागा संपादनासाठी येणारा खर्च व वसतीगृह व इतर बांधकामासाठी येणारा सर्व खर्च राज्य शासन मिरा भाईंदर महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणार आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सदर एक चांगली वास्तू उभी राहील. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सदर काम करण्याकरीता महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार मे. एच.एम.राजे कन्सल्टंट यांच्या कडून सदर कामाचे नकाशे, अंदाजपत्रके तयार करुन घ्यावीत. सदर इमारती करीता लागणारा खर्च, तांत्रिक सल्लागार व महानगरपालिकेच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांवर होणारा खर्च ईटीपी चार्जेस आदिवासी विकास विभागाकडून घेण्यात यावा. सदर आदिवासी विभागासाठी वसतीगृह व इतर बांधकामे बांधून देण्याची प्रक्रीया महानगरपालिकेमार्फत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ६५ :- मिरारोड व दहीसर स्टेशन दरम्यान नविन कल्वर्ट बांधणे कामाबाबत निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६५ :-**

मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील काशि, महाजनवाडी डोंगर, तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी मिरारोड पूर्वेकडे सृष्टी, शांतीनगर इ. भागात येत असते. सदरील भागातील पाणी मिरारोड पूर्वेकडून जाफरी खाडीच्या रेल्वे पूलाखालून पश्चिमेस खाडीकडे जाते. तसेच मिरारोड (पूर्व) शांतीनगर येथील नयानगर, शांतीपार्क, पूनमसागर, सृष्टी, जांगीड, आर.एन.ए. इ. भागातील पाण्यास जाण्याचा मार्ग हा जाफरी खाडी आहे. त्यामुळे सदरील भागात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी जमा झाल्यास व जाफरी खाडीतून सदरील पाण्याचा निचरा न झाल्यास मिरारोड (पूर्व) भागात पाण्याची पातळी वाढून पूरजन्य परीस्थिती निर्माण होत असते. सदरील जाफरी खाडीकडे जाणारा पाण्याचा निचरा नियंत्रीत करणेस, दहिसर चेकनाका पासुन पेणकरपाडयाकडून येणारी खाडी रेल्वे लगत असल्याने Km ३८/९ या ठिकाणी नविन कल्वर्ट बांधल्यास पाण्याचा निचरा जलद गतिने होण्यास मदत होईल, सदर बाब तदनंतर रेल्वे प्रशासनास कल्वर्ट कळविण्यात आली होती. त्यावर रेल्वे प्रशासनाने त्या ठिकाणी Feasibility तपासुन व आवश्यक आकारमानाचे अतिरीक्त कल्वर्ट बांधण्यास हरकत नसल्याचे व सदरील काम Deposit Work करण्याबाबत कळविले तसेच सदरील कामी येणारा खर्च महानगरपालिकेस करावा लागेल.

सदरील कल्वर्ट बांधणे कामामध्ये १८०० मी मी आकारमानाचे, ७० मीटर लांबीचे ९ Row पाईप Micro Tunneling पध्दतीने Pushing करणे, **Approach रस्ता तयार करणे** व जाफरी खाडीवर तात्पुरता पुल (Temporary Bridge) बांधणे कामाचा समावेश आहे. सदरील ठिकाणी mangroves असल्याने सी.आर.झेड प्राधिकरणाची परवानगी प्राप्त करावी लागणार आहे. तसेच मुख्यतः प्रस्तावित जागेवर जाण्यास रस्ता नसल्याने जाफरी खाडीवर (Temporary Bridge) बांधावा लागणार असुन रेल्वे लाईन लगत Approach रोड तयार करावा लागणार आहे.

सदरचे काम करावयाचे असल्यास कामाचा एकुण खर्च, सदर कामाची feasibility study व Detail Survey करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी Detail feasibility study व Detail Survey करीता रेल्वे अंगीकृत कामाचा अनुभव असलेल्या तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करावी लागणार आहे.

सदर गोषवारा पाहता मिरारोड व दहिसर स्टेशन दरम्यान प्रस्तावित ठिकाणी (Km ३८/९) कल्वर्ट बांधणे करीता मे. राईटस लि. या रेल्वेच्या अंगीकृत यंत्रणेची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक

करण्यास व त्याकामी होणा-या खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे. सदर कामाच्या खर्चासाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद प्राधान्याने करण्यात यावी. तसेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन मा. महासभेपुढे सादर करण्यात यावा.

**सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ६६ :-  भाईंदर (प.) आरक्षण क्र. ९१ स्टेडीयम विकसित करणेबाबत निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६६ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. ९१, स्टेडीयम करीता आरक्षित आहे. सदर आरक्षणाचे क्षेत्र १८.०० हेक्टर असून सदर जागा मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून क्र.महसूल/क-१/टे-१/एल बी पी/अति-संरक्षण व एस आर ०४/२०१० दि. ०७/१०/२०१० रोजीच्या आदेशान्वये संरक्षणासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरण केलेली आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत कचरा माती भरावावर मुरूम व लाल माती टाकून परिसरातल्या मुलांना खेळण्यासाठी मैदान विकसीत करण्यात आलेले आहे. सदर स्टेडीअमची जागा महानगरपालिकेकडे कायमस्वरूपी हस्तांतर करण्याची व सीआरझेडच्या दृष्टीकोनातून आवश्यक मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदर स्टेडीयमची एकूण जागा १८.०० हेक्टर असून संपूर्ण जागेचा विकास करणे आवश्यक आहे. सदर जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचा क्रिडा संकुल होण्यासाठी खालील सुविधाचा समावेश असणे आवश्यक आहे.

१) क्रिकेट, हॉकी, फुटबॉल, मैदान

२) बॅडमिंटन, स्कॅश कोर्ट

३) टेबल टेनिस

४) ऑलिम्पीक साईज, स्विमिंगपुल

५) व्यायामशाळा, योगा, एरोबिक्स

६) इनडोअर क्रिकेट

७) ट्रॅक ॲण्ड फिल्ड

८) मिनि थिएटर, मिटींग हॉल, वाचनालय, संग्रहालय

९) कार्ड रूम/गेम रूम

१०) इनडोअर स्केटींग

११) हॉल, ड्राम थिएटर

१२) ओपन लॉन, पार्किंग एरिया

तसेच इतर अनुनेय असलेल्या सुविधा देखिल उपलब्ध करून देता येतील. त्याकरीता अशाप्रकारे कामाचा अनुभव असलेल्या वास्तुविशारद, सल्लागारामार्फत नकाशे व आवश्यक सुविधाबाबतचा अहवाल तयार करून घेतल्यास मा. महासभेस सदर स्टेडीयम विकसीत करण्याबाबत पुढील निर्णय घेणे सुलभ होईल. सदर आरक्षण हे सी.आर.झेड बाधीत असल्याने हे आरक्षण विकसीत करण्यापूर्वी सी.आर.झेड तरतुदीच्या माध्यमातून प्रशासनाने पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. तरी प्रशासनाने तशी परवानगी घ्यावी. तसेच सदर जागा महानगरपालिकेच्या नावे करण्याची कार्यवाही करावी. आरक्षण क्र. ९१ विकसीत करणेकरीता तांत्रिक सल्लागार नेमावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सूचक :- श्री. नरेंद्र मेहता          अनुमोदक :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील व अनुमोदक श्री. जुबेर इनामदार ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

आरक्षण विकसित करताना बाधित होणारी जमीन शिलोत्री किंवा खाजगी जमीन मालकांची असल्यास त्यांना मोबदला द्यावा तसेच कोर्टात केस प्रलंबित असल्यास त्याची माहिती घेऊन कार्यवाही करावी अशी मी सुचना मांडत आहे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ६७ :- काशिमिरा नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज पूतळा परिसर सुशोभिकरण करणेबाबत निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६७ :-**

मिरा भाईंदर शहरात तत्कालिन नगरपालिकेमार्फत काशिमिरा नाका येथे रस्त्याच्या मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरुढ पूतळा उभारुन उद्यान सुशोभिकरण करण्यात आले आहे. सदर पूतळा व उद्यान उभारतेवेळी सदर रस्ता हा सरासरी १५.०० मीटर रुंदीचा होता. तद्नंतर सदर रस्ता ४५.०० मीटर रुंदीचा तयार करण्यात आला तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या उंचीपर्यंत रस्ता भराव करुन उंच करण्यात आला त्यामुळे रस्त्यास दोन्ही बाजूस सारखी जागा उपलब्ध नाही. तसेच उद्यान ची रेलिंग रस्त्याच्या समांतर आलेली आहे. सदर ठिकाण हे शहराचे प्रवेशद्वार असल्याने सदर श्री. छत्रपती शिवाजी महाराज पूतळा व उद्यानाची पुर्नबांधणी करुन परिसर सुशोभिकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता प्रथम टप्प्यात अशाप्रकारे कामाचे नकाशे, डीझाईन व अंदाजपत्रक तयार करणाऱ्या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्यास व त्याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर होणाऱ्या खर्चाची तरतूद अर्थसंकल्पात प्राधान्याने करण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे. सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन पुढील महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात यावा.

**सुचक :- श्रीम. वंदना चक्रे अनुमोदन :- सौ. प्रभात प्रकाश पाटील**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रशांत दळवी व अनुमोदक श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत काशिमिरा नाका येथे रस्त्याच्या मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पुतळा उभारून उद्यान सुशोभिकरण करण्यात आले आहे. सदर पुतळा व उद्यान उभारतेवेळी सदर रस्ता हा सरासरी १५.०० मीटर रूंदीचा होता. तद्नंतर सदर रस्ता ४५.०० मीटर रूंदीचा तयार करण्यात आला. तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या उंचीपर्यंत रस्ता भराव करून उंच करण्यात आला त्यामुळे रस्त्यास दोन्ही बाजूस सारखी जागा उपलब्ध नाही. तसेच उद्यानची रेलिंग रस्त्याच्या समांतर आलेली आहे. सदर ठिकाण हे शहराचे प्रवेशद्वार असल्याने सदर श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा व उद्यानाची पुर्नबांधणी करून परिसर सुशोभिकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याकरीता प्रथम टप्प्यात अशाप्रकारे कामाचे नकाशे, डिझाईन व अंदाजपत्रक तयार करणाऱ्या तांत्रिक सल्लागाराची नेमणूक केल्यास व त्याच्यामार्फत चांगला प्रस्ताव तयार करून अंमलबजावणी केल्यास सदर परिसर चांगल्याप्रकारे विकसीत होणार आहे. **याकरीता सुशोभिकरणाच्या कामासाठी तांत्रिक सल्लागार नेमावा असा ठराव मांडण्यात येत आहे.** परंतु हे सुशोभिकरणाचे काम घेण्याआधी प्रशासनाने या ठिकाणाच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूची अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करावेत, फेरीवाले हटवावेत, दोन्ही बाजूने रस्त्याचे रूंदीकरण करावे ही कामे प्राध्यान्याने करावीत अशी मी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. रोहिदास पाटील व अनुमोदक श्री. शरद पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

शिवाजी महाराजाच्या पुतळ्याच्या दोन्ही बाजूस रस्ता रुंद करणे व डावीकडे जाताना रस्ता रुंद करुन घ्यावा.

**सदर ठरावामध्ये श्रीम. वंदना चक्रे ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर शहरातील असणाऱ्या काशिमिरा येथील शिवाजी महाराजांचा पुतळा चोहीबाजूने व्यवस्थित दिसला पाहिजे अशी मी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. कमलेश भोईर व अनुमोदक श्री. रविंद्र माळी ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदरचे ठिकाण हे मिरा भाईंदर शहराचे प्रवेशद्वार असल्यामुळे त्या ठिकाणी सुशोभिकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच त्या ठिकाणी सुशोभित अशी प्रवेशद्वार भव्यदिव्य कमानी बनविणे देखील गरजेचे झाले आहे. त्याप्रमाणे मुंबई शहराचे प्रवेशद्वार दहिसर चेकनाका ह्या ठिकाणी ज्याप्रमाणे प्रवेशद्वार कमानी बनविलेली आहे. त्याचप्रमाणे सदरच्या ठिकाणी प्रवेशद्वार सुशोभित कमानी बनविण्यात यावी. याकरिता मी स्थानिक नगरसेवक या नात्याने आपल्याकडे दि. ०३/०६/२०१३, जा.क्र. ३४१/२०१३-१४ रोजी मा. आयुक्त सो. यांच्याकडे मागणी केलेली आहे. कृपया आपण हे मान्य करावे ही विनंती.

**सदर ठरावामध्ये श्रीम. शिल्पा भावसार ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

आपण ज्यावेळेला काशिमिरावरुन मिरा भाईंदरमध्ये प्रवेश करतो, त्या ठिकाणी आपण नवीन प्रकारे पाण्याचे कारंजे बनवावे अशी माझी सुचना आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(100)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ६८ ) :-** उत्तन घनकचरा प्रकल्पाच्या जागेस कुंपणभिंत, संरक्षक भिंत बांधणे इ. कामाबाबत.

**ठराव क्रमांक ( ६८ ) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन येथील घनकचरा प्रकल्पाची ३१ हेक्टर असलेली जागा ही डोंगराळ भागावर आहे. सदर मिळकतीची किंमत ही १३६.४० कोटी एवढी असून सदर मिळकतीची अतिक्रमणापासून संरक्षण होण्यासाठी सदर जागेस कुंपणभिंत असणे आवश्यक आहे. तसेच कचऱ्यातून लिचड शेतीकडील भागात जाऊन शेतीची नासाडी होत आहे. सदर ठिकाणी उंच संरक्षक भिंत बांधून त्याखाली गटार व लहान विहीर बांधल्यास शेतीमध्ये लिचड जाणार नाही. तसेच संरक्षक भिंती पर्यत कचरा अडून इनर्ट मटेरीयल उडून परिसरात देखिल त्रास होणार नाही. तसेच घनकचरा प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याचे देखिल मजबुतीकरण करावे लागणार आहे. सदर कामाकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | रस्ता मजबुतीकरण करणे. | रु. ९२,१०,२००/- |
| २ | कुंपणभिंत बांधणे | रु. १,३४,५९,७००/- |
| ३ | गटार व विहीर बांधणे. | रु. ६७,७७,२००/- |
| ४ | संरक्षक भिंत (पायथ्याशी ) | रु. ८,६४,५२,०००/- |

सदर जागा ही महत्वाची असून सदर जागेच्या सुरक्षेसाठी संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजनेच्या वरील खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामाच्या खर्चासाठी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात पुर्नविनियोजनाव्दारे सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करण्यास सदर जागेची शासकीय मोजणी करण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक:-** श्री. ध्रुवकिशोर पाटिल

**अनुमोदन :-** श्री. दुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

पिठासन अधिकारी

PC3/DK/2013-14/MT19

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ६९ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारती मध्ये आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व मा. पदाधिकाऱ्याकडे येणाऱ्या अभ्यांगताना बसण्याची व्यवस्था करणे, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व मा. पदाधिकारी दालनाचे नूतनीकरण करणे, आपतकालिन कक्ष, कॅटिन तयार करणे, मुख्यालय इमारतीची आवश्यक दुरुस्ती कामांबाबत निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ६९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत बांधून २००० मध्ये कामकाज सुरु करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेची लोकसंख्या, महानगरपालिका सदस्य संख्या देखिल वाढलेली असून मुख्य कार्यालयात कामकाजासाठी येणाऱ्या लोकप्रतिनिधी, नागरीकांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. महानगरपालिका मुख्यालय इमारतीत विशेषतः दुसऱ्या मजल्यावर पदाधिकारी, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे येणाऱ्या अभ्यागताना बसण्याची सोय नसल्याने त्यांची गैरसोय होते. मुख्यालयातील आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व पदाधिकारी यांची दालने ही १३ वर्षापूर्वी तयार केलेली असून सदर दालनांचे देखिल नूतनीकरण करण्याची आवश्यकता आहे.

शासनाच्या धोरणानूसार महापालिका मुख्यलयात तळमजल्यावर आपतकालिन कक्ष तयार करावयाचा असून इमारतीची देखिल गळती होत असल्याने आवश्यक दुरुस्ती कामे करावयाची आहेत. महानगरपालिका मुख्य कार्यालयात कॅटीन ची देखिल व्यवस्था असणे आवश्यक आहे.

तसेच अधिकारी व पदाधिकारी यांना जागेचे वापराकरीता दयावयाच्या सुविधाबाबत मा. आयुक्त यांनी योग्य धोरण ठरवून त्याची अंमल बजावणी करण्यात यावी. संपूर्ण कार्यालयातील जागेचे त्यानूसार नियोजन करुन दालनात व जागेत फेरबदल करण्याची आवश्यकता आहे. तळ मजल्यावर आपातकालीन कक्षासाठी, कॅटींन साठी जागेचे नियोजन करण्यात यावे.

वरील प्रमाणे सर्व नियोजन करुन सविस्तर नकाशे व प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी अनुभवी वास्तूविशारद/सल्लागार नेमण्यास व त्याकामी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सर्व खर्चासाठी सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पात पुर्नविनियोजनाव्दारे व सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे. वरील प्रमाणे कार्यवाही करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन पुढील मा. महासभेपुढे सादर करण्यात यावा.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये श्रीम. शिल्पा भावसार ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

भाईंदर (प.) पोलिस स्टेशन चौकीच्या बाजूला जे आपले प्रभाग कार्यालय आहे. तिकडे वयस्कर लोकांना वर जाणे अत्यंत अडचणीचे होत आहे. तरी आपल्या प्रभाग कार्यालय क्र. २ च्या इमारतीचीसुध्दा दुरुस्ती करण्यात यावी अशी माझी सुचना आहे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ७० ) :-** राजीव आवास योजनेतंर्गत सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता देणे.

**ठराव क्र. ( ७० ) :-**

केंद्र शासनाच्या राजीव आवास योजनेतंर्गत झोपडपट्टयाचा विकास करण्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमण्यासाठी मा.महासभा दि.२९/९/२०१० ठराव क्र. ५४ अन्वये मान्यता प्राप्त आहे. त्या अनुशंगाने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मे. वॉप्कोस लि. यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सल्लागारामार्फत सद्यस्थितीत भाईंदर (प.) आंबेडकर नगर झोपडपट्टी येथील झोपडपट्टीचा रु. १९०.०० कोटी रक्कमेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. सदर प्रकल्पांतर्गत २६९ चौ. फुट ची १७६० सदनिका व १८० दुकाने बांधणे प्रस्तावित आहे.

सदर सविस्तर प्रकल्प अहवाल म्हाडा, हुडको मार्फत केंद्र शासनाकडे सादर करण्यास व खर्चास प्रशासकिय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक:- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PC3/DK/2013-14/MS18

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ११/१२/२०१३

(105)

**प्रकरण क्रमांक ( ७१ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एनर्जी पार्क तथा सायटीफीक प्ले-पार्क विकसीत करणेस धोरणात्मक मंजूरी देणेबाबत....

**ठराव क्रमांक ( ७१ )** :-

मिरा-भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि. २५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि. २९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

रिलायन्स इंन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी सदरच्या आरक्षणामध्ये सायंटीफीक ॲन्ड एनर्जी प्ले-पार्क विकसीत करणेसाठीचा प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केलेला आहे.

सदरचे आरक्षण विकसीत होणेसाठी मे. रिलायन्स इंन्फ्रास्ट्रक्चर लि, यांचेकडून सुमारे रु. ६.०० कोटी खर्च होणार असून या कामी महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. तसेच आरक्षणाखालील जागा हस्तांतरीत करणेत येणार नसून आरक्षण विकसीत करुन महानगरपालिकेस पुढील कार्यान्वयासाठी उपलब्ध होणार आहे.

रिलायन्स इंन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनीने सायंटीफीक ॲन्ड एनर्जी प्ले-पार्क विकसीत केल्यास मिरा-भाईंदर शहरातील मुलांसाठी व पर्यटकांसाठी ही सुविधा उपलब्ध होऊ शकेल.

तरी सदर एनर्जी पार्क तथा सायंटीफिक प्ले-पार्क चा प्रकल्प पालिका हद्दीत आरक्षीत किंवा शासकीय जागेत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पाबाबत मा.गटनेते, पालिका पदाधिकारी यांची बैठक आयोजित करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असा ठराव मांडीत आहे.

**सुचक:- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC5//DK/2013-14/ MT-9

(105)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ७२ :-** **छत्रपती शिवाजी महाराज पथ सुशोभिकरण करण्याबाबत निर्णय घेणे.**

**ठराव क्र. ७२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ते गोल्डन नेस्ट जंक्शन पर्यतचा छत्रपती शिवाजी महाराज पथ ४५.०० मीटर रुंदीचा दर्शविण्यात आलेला आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरणे, दोन्ही बाजूस नाले व दुभाजक बांधण्याचे काम २००५ मध्ये पूर्ण झालेले असून सदर रस्त्याचा तीन वर्षाचा सुरक्षा कालावधी (Defect Liability Period) संपलेला आहे. सदर रस्ता हा नाल्यासहीत ३९.०० मीटर रुंदीचा तयार केलेला असून नाल्यालगत दोन्ही बाजूस विविध यंत्रणेच्या केबल्स, जलवाहिनी टाकण्यासाठी सर्व्हीस रस्ता ठेवलेला आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्यावर प्रचंड प्रमाणात वाहतूकीचा ताण पडत असून रस्त्याची रुंदी कमी पडत आहे. त्याकरीता सर्व्हीस रस्ते तयार करणे, नाल्याच्या स्लॅब ची लेव्हल खाली घेऊन त्याच्या रस्त्याचे रुंदीकरण करणे तसेच संपूर्ण रस्त्याचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. सदर रस्ता हा शहरातील मुख्य रस्ता असल्याने रस्ता व दुभाजक चांगल्या पध्दतीने तयार केल्यास शहराच्या शोभेत भर पडेल. तरी राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ते रेल्वे फाटक पर्यंतचा तसेच भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत सुशोभिकरणासाठी आराखडे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता अनुभवी सल्लागार नेमण्यास व होणाऱ्या प्रशासकीय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. सदर कामाच्या खर्चासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करण्यास पुर्नविनियोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवाल मा. महासभेपुढे सादर करावा.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(106)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. ११/०२/२०१४
# (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**ठराव क्र. ८० :-**

आपल्या महानगरपालिकेतील सन्मा. सदस्या श्रीमती कांचन पुजारी यांच्या पुत्राचे काल निधन झाले आहे तरी आम्ही सर्व भारतीय जनता पार्टी व सभागृह त्यांच्या दुखःत सहभागी आहोत.

परंतु, आजच्या सभेत शहराच्या विकासाचे महत्वाचे विषय आहेत. सदर विषय आचार संहितेपूर्वी घेणे महत्वाचे आहे. निवडणूक कालावधी जवळ आहे. त्यामुळे आजची सभा तहकुब करण्यात येऊ नये असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्रीम. गिता जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत बगाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | अँड. रवि व्यास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | प्रेमनाथ गजानन पाटील | ६ | वंदना मंगेश पाटील | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | लियाकत ग. शेख | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | खण्डेलवाल सुरेश | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | नरेश तुकाराम पाटील | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | शबनम लियाकत शेख | |
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | अनिता जयवंत पाटील | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | भावसार शिल्पा कमलेश | |
| २१ | नरेंद्र एल. मेहता | २१ | वंदना रामदास चक्रे | |
| २२ | सिमा कमलेश शहा | २२ | भोईर कमलेश यशवंत | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | |
| २४ | डॉ. नयना मनोज वसानी | २४ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| २६ | दिपीका पंकज अरोरा | २६ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २७ | मीरादेवी रामलाल यादव | २७ | पाटील सुनिता कैलास | |
| २८ | अनिल बाबुराव भोसले | २८ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | २९ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३० | रकवी सुहास माधवराव | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३२ | मोहम्मद फरीद सिध्दीक कुरेशी | |
| ३३ | तारा विनायक घरत | ३३ | काझी रशीदा जमील | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३४ | इनामदार जुबेर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५ | शुभांगी महिन कोटियन | ३५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३६ | जयमाला किशोर पाटील | ३६ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३७ | संदिप मोहन पाटील | ३७ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३८ | परमार अनिता भरत | ३८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३९ | पाटील प्रणाली संदिप | ३९ | भट दिप्ती शेखर | |
| ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ४० | विराणी रेखा अनिल | |
| ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | ४१ | सामंत प्रमोद जयराम | |
| ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | ४२ | मुन्ना सिंग | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१४
## (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ८० :-** **सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा दिनांक ०६/१२/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- पुर्नविनियोजन करणेबाबत.**

**ठराव क्र. ८९**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या अर्थसंकल्पात बऱ्याच लेखाशिर्षातील रक्कम अजूनपर्यंत खर्च झालेली नाही. या अनुषंगाने लेखाशिर्षातील कामे प्रस्तावित केलेली नाही. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकासकामे करावयाची असल्याने त्याकरीता विकासकामांना निधी देण आवश्यक असल्याने पुर्ननियोजन पत्रक तयार करण्यात आलेले होते. व विकासकामांना निधी वर्ग करण्यात आलेला होता.

सद्यस्थितीत महानगरपालिकेतील विभागप्रमुखांना पुर्ननियोजनाव्दारे वर्ग होणाऱ्या रकमेची आवश्यकता नसल्याचे दिसून येत आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामधील खर्च जर विभागप्रमुखांनी सन २०१४-१५ या तयार होणाऱ्या अर्थसंकल्पातील तरतुदी मध्ये घुसवून जास्तीचा खर्च केल्यास त्यांचेवर मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५६ प्रमाणे निलंबनाची कारवाई करण्यात येईल असा ठराव मांडण्यात येईल.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत बगाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | ॲड. रवि व्यास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | प्रेमनाथ गजानन पाटील | ६ | वंदना मंगेश पाटील | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | लियाकत ग. शेख | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | खण्डेलवाल सुरेश | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | नरेश तुकाराम पाटील | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | शबनम लियाकत शेख | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | अनिता जयवंत पाटील | |
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | भावसार शिल्पा कमलेश | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | वंदना रामदास चक्रे | |
| २१ | नरेंद्र एल. मेहता | २१ | भोईर कमलेश यशवंत | |
| २२ | सिमा कमलेश शहा | २२ | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २४ | डॉ. नयना मनोज वसानी | २४ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २६ | दिपीका पंकज अरोरा | २६ | पाटील सुनिता कैलास | |
| २७ | मीरादेवी रामलाल यादव | २७ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २८ | अनिल बाबुराव भोसले | २८ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | २९ | रकवी सुहास माधवराव | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३० | झिनत रऊफ कुरेशी | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | मोहम्मद फरीद सिध्दीक कुरेशी | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३२ | काझी रशीदा जमील | |
| ३३ | तारा विनायक घरत | ३३ | इनामदार जुबेर | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३५ | शुभांगी महिन कोटियन | ३५ | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | |
| ३६ | जयमाला किशोर पाटील | ३६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३७ | संदिप मोहन पाटील | ३७ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३८ | परमार अनिता भरत | ३८ | भट दिप्ती शेखर | |
| ३९ | पाटील प्रणाली संदिप | ३९ | विराणी रेखा अनिल | |
| ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ४० | सामंत प्रमोद जयराम | |
| ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | ४१ | मुन्ना सिंग | |
| ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | भोईर भावना राजू | | | |
| ४५ | भोईर राजू यशवंत | | | |

ठराव बहुमताने मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ७३ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आरक्षण क्र. २३१ (मार्केट) व आरक्षण क्र. २१८ (कम्युनिटी सेंटर) विकसित करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र.७३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. २३१ (मार्केट) व आरक्षण क्र. २१८ (कम्युनिटी सेंटर) विकसित करणेकरीता प्रस्ताव मा. महासभा दि. २१/३/२०१३ पुढे सादर करण्यात आला होता. त्याअनुशंगाने मा. महासभेने ठराव क्र. ३६ व ठराव क्र. ३४ अन्वये सदर आरक्षणाबाबत अधिक माहीती गोषवाऱ्यात नमूद करुन सदर प्रस्ताव पुनश्:च मा. महासभेपुढे सादर करण्याबाबत निर्णय घेतला होता.

त्याअनुशंगाने खालीलप्रमाणे माहीती सादर करण्यात येत आहे.

- **आरक्षण क्र. २३१ (मार्केट)**

| | |
|---|---|
| आरक्षणाचे एकूण क्षेत्र | २५००.०० चौ.मीटर |
| ताब्यात घेतलेले क्षेत्र | रु.१९७५.६८ चौ.मीटर |
| अंदाजित खर्च | रु. ३,७१,२२,०००/- |

- **आरक्षण क्र. २१८ (कम्युनिटी सेंटर)**

| | |
|---|---|
| आरक्षणाचे एकूण क्षेत्र | २६००.०० चौ.मीटर |
| ताब्यात घेतलेले क्षेत्र | १०० % जागा ताब्यात आहे. |
| अर्थसंकल्पातील तरतूद | |
| अंदाजित खर्च | रु. ४,८२,५८,६००/- |

वरील आरक्षणाच्या जागा ताब्यात आल्याने त्यांचा विकास कामे आवश्यक आहे. सदर आरक्षणावर होणाऱ्या खर्चासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूदी करण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे. तसेच वरील मार्केट (आ.क्र. २३१) व कम्यूनिटी सेंटर (आ.क्र. २१८) कामाच्या अंदाजपत्रकांनी प्रशासकीय आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. शरद पाटील व अनुमोदक श्रीम. निलम ढवण ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

वरील आरक्षण क्र. २३१ व आरक्षण क्र. २१८ च्या जागा ताब्यात आल्याने त्यांची विकासकामे चालू वर्षामध्ये उपलब्ध निधीतून करावीत. तसेच सदर आरक्षणा वरील खर्च सन २०१४-१५ या वर्षात होणार असल्याने २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करावी, तसेच आरक्षण क्र. २३१ मार्केट या होणाऱ्या इमारतीस स्व.मीनाताई बाळासाहेब ठाकरे हे नाव देण्यांत येत आहे, आरक्षण क्र. २१८ कम्युनिटी सेंटर या इमारतीस स्व.प्रमोद महाजनजी सभागृह हे नाव देण्यांत येत आहे अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ७४ :-** **पेणकर पाडा सर्व्हे क्र. १७३, २५९ येथे शासकीय जागेवर नविन बसस्थानक सुरु करणेसाठी आवश्यक सुविधा तयार करणेस मान्यता देणे.**

**ठराव क्र. ७४ :-**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस १०० बसेस मंजूर झाल्या आहेत. सदर बसेस करीता ३५.३० कोटी तसेच डेपो व टर्मिनल विकासाकरीता रू. ६.०० कोटी एवढी रक्कम मंजूर आहे. त्यापैकी ५०% रक्कम मिरा भाईंदर महानगरपालिकेस मंजूर झाल्याचे पत्र प्राप्त झालेले आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिकेस बस डेपो, टर्मिनल इ. आवश्यक सुविधा प्राधान्याने करणे बंधनकारक आहे.

सदर होणारा खर्च केंद्रशासन / राज्यशासनाकडील अनुदानातूनच करावयाचा आहे. असे गोषवाऱ्यात नमुद केलेले आहे. सर्व्हे क्र. १७३ या जागेत बसस्थानाकासाठी कुंपणभिंत बांधणे, जागेत नाला बांधणे व इतर आवश्यक कामे करण्याकरीता येणाऱ्या रु. ३,४८,९४,९००/- खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे. सर्व्हे क्र. २५९ ही जागा वादग्रस्त असल्याने सदर न्यायालयात मा. सर्वोच्च न्यायालयात वाद सुरु आहे. सदर जागेवर कोणत्याही प्रकारे बांधकाम करण्यात येऊ नये.


**सुचक :- श्री. प्रभाकर म्हात्रे** **अनुमोदक :- श्री. अरविंद ठाकूर**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| २ | कांगणे यशवंत बगाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | पाटील वंदना विकास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | वंदना मंगेश पाटील | |
| ६ | प्रेमनाथ गजानन पाटील | ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | निरंक |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | खण्डेलवाल सुरेश | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | नरेश तुकाराम पाटील | |
| १४ | मेधना दिपक रावल | १४ | शबनम लियाकत शेख | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | अनिता जयवंत पाटील | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | |
| २१ | नरेंद्र एल. मेहता | २१ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २२ | सिमा कमलेश शहा | २२ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २४ | डॉ. नयना मनोज वसानी | २४ | पाटील सुनिता कैलास | |
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २६ | दिपीका पंकज अरोरा | २६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २७ | मीरादेवी रामलाल यादव | २७ | रकवी सुहास माधवराव | |
| २८ | अनिल बाबुराव भोसले | २८ | झिनत रऊफ कुरेशी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | २९ | पुजारी कांचना शेखर | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३० | काझी रशीदा जमील | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | इनामदार जुबेर | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३२ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३३ | तारा विनायक घरत | ३३ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३४ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३५ | शुभांगी महिन कोटियन | ३५ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३६ | जयमाला किशोर पाटील | ३६ | भट दिप्ती शेखर | |
| ३७ | संदिप मोहन पाटील | ३७ | विराणी रेखा अनिल | |
| ३८ | परमार अनिता भरत | ३८ | सामंत प्रमोद जयराम | |
| ३९ | पाटील प्रणाली संदिप | ३९ | मुन्ना सिंग | |
| ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४३ | ठाकूर अरविंद दत्ताराम | | | |
| ४४ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



(११९)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ७५ :-** **घोडबंदर सर्व्हे क्र. २३३ येथील शासकीय जागेवर बसस्थानक सुरु करणेसाठी आवश्यक सुविधा तयार करणेस मान्यता देणे.**

**ठराव क्र. ७५ :-**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियना (JNNURM) अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिकेस १०० बसेस मंजूर झाल्या आहेत. सदर बसेस करीता ३५.३० कोटी तसेच डेपो व टर्मिनल विकासाकरीता रू. ६.०० कोटी एवढी रक्कम मंजूर आहे. त्यांपैकी ५०% रक्कम मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे प्राप्त झालेली आहे. क्रेंद शासनाने मंजूर केलेल्या सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिकेस बस डेपो, टर्मिनल इ. आवश्यक सुविधा प्राधान्याने करणे बंधनकारक आहे.

घोडबंदर येथे सर्व्हे क्र.२३३ येथे शासकिय जागा उपलब्ध असून सदर जागा महानगरपालिकेस उपलब्ध होऊ शकेल. सदर जागेवर बस स्थानक तयार केल्यास बसेस उभ्या राहू शकतील तसेच वाहतूक ही सुलभ होईल. सदर जागेवर बस स्थानक बांधण्यासाठी मा. आयुक्त सो., यांनी सदर विषय आर्थिक व प्रशासकिय मान्यतेसाठी सभागृहात सादर केलेला आहे. सदर जागेवर बसस्थानक बांधता येणार नाही. कारण सदर जागेवर शेतीचे अतिक्रमण आहे. त्याची नोंद पीकपाणी उतान्यावर आहे. सदर जागेवर मा. जिल्हाधिकारी यांनी शेतीचे अतिक्रमण नियमीत करून शासनाच्या नियमाप्रमाणे प्रस्तावित जमीन शेतकरी यांना देण्यांस राज्य शासनाकडे शिफारस केली आहे. तसेच मा. न्यायालयात प्रस्तावीत जागे विरूध्द महानगरपालिका व राज्यशासन दावा क्र. ६११/२०१३ चालू आहे. प्रस्तावित जागा न्याय प्रविष्ठ असल्याने व वादग्रस्त असल्याकारणाने सदर प्रस्तावित ठिकाणी बस स्थानक बांधू नये असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. अनिल भोसले** **अनुमोदक :- श्री. दिनेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत बगाजी | २ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | पाटील वंदना विकास | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | वंदना मंगेश पाटील | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ६ | प्रेमनाथ गजानन पाटील | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | खण्डेलवाल सुरेश | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | शबनम लियाकत शेख | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | अनिता जयवंत पाटील | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | म्हात्रे परशुराम प्रभाकर | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | वंदना रामदास चक्रे | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | सुमबंड महरुन्नीसा हारुनरशिद | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | दक्षता राजेंद्र ठाकूर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | नरेंद्र एल. मेहता | २१ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २२ | सिमा कमलेश शहा | २२ | पाटील सुनिता कैलास | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २४ | डॉ. नयना मनोज वसानी | २४ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | रकवी सुहास माधवराव | |
| २६ | दिपीका पंकज अरोरा | २६ | झिनत रऊफ कुरेशी | |
| २७ | मीरादेवी रामलाल यादव | २७ | पुजारी कांचना शेखर | |
| २८ | अनिल बाबुराव भोसले | २८ | काझी रशीदा जमील | |
| २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | २९ | इनामदार जुबेर | |
| ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | ३० | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | ३१ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३२ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३३ | तारा विनायक घरत | ३३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३४ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३४ | भट दिप्ती शेखर | |
| ३५ | शुभांगी महिन कोटियन | ३५ | विराणी रेखा अनिल | |
| ३६ | जयमाला किशोर पाटील | ३६ | सामंत प्रमोद जयराम | |
| ३७ | संदिप मोहन पाटील | ३७ | मुन्ना सिंग | |
| ३८ | परमार अनिता भरत | | | |
| ३९ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ४० | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ४१ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ४२ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४३ | ठाकूर अरविंद दत्ताराम | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(११९)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ७६ ) :-** काशिमिरा सर्व्हे क्र. १२३ (२४) (जकात नाका आरक्षण) या जागेवर बसस्थानक सुरु करणेसाठी आवश्यक सुविधा तयार करणेस मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ( ७८ ) :-**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत मिरा भाईदर महानगरपालिकेस १०० बसेस मंजूर झाल्या आहेत. सदर बसेस करीता ३५.३० कोटी तसेच डेपो व टर्मिनल विकासाकरीता रु.६.०० कोटी एवढी रक्कम मंजूर आहे. त्यापैकी ५० % रक्कम मंजूर झाल्याचे पत्र मिरा भाईदर महानगरपालिकेकडे प्राप्त झालेले आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिकेस बस डेपो, टर्मिनल इ. आवश्यक सुविधा प्राधान्याने करणे बंधनकारक आहे.

काशिमिरा येथे सर्व्हे क्र. १२३ (२४) १२२ (२६) ही जागा जकात नाका केंद्रासाठी व पार्कींग साठी आरक्षित असून त्यापैकी २६०० चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. त्याशिवाय इतर जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर जागेवर बस स्थानक तयार केल्यास बसेस उभ्या राहू शकतील व जाण्या-येण्यासाठी देखिल सुलभ होईल. सदर ठिकाणी जागेस कुंपणभिंत बांधणे व आवश्यक इतर कामे करणेकरीता रु. १,३५,४७,०५०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदर स्थानकासाठी उर्वरीत जागा ताब्यात घेण्याकरीता कार्यवाही करण्यास तसेच होणाऱ्या खर्चास व रु. १,३५,४७,०५०/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक:- प्रि. धुवकिशोर पाटील

अनुमोदन :- प्रि. दुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PC3/DK/2013-14/MT25

# मिरा-भाईदर महानगरपालिका

११५

## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्रमांक ( ७७ ) :-** उत्तन सर्व्हे क्र. ६५ व २५ मध्ये असलेल्या शेडचा वापर बस कार्यशाळेसाठी करण्यासाठी आवश्यक कामे करण्यास मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ( ७८ ) :-**

उत्तन येथे सर्व्हे क्र. ६५ व २५ या महानगरपालिकेच्या जागेत महानगरपालिकेची अर्धवट बांधकाम केलेली शेड असून सदर शेडचे क्षेत्रफळ १८१०.०० चौ.मीटर आहे. सदर शेडच्या प्लींथचे बांधकाम, कॉलम उभे असून फक्त लोखंडी ट्रस टाकून पत्रे बसविल्यास व आवश्यक बांधकाम केल्यास सदर शेडचा वापर सुरु करता येऊ शकेल. सदर शेडचा वापर परीवहन उपक्रमातंर्गत बसेसच्या दुरुस्तीसाठी कार्यशाळा म्हणून करता येऊ शकेल. परीवहन उपक्रमातंर्गत नव्याने मंजूर झालेल्या १०० बसेस करीता कार्यशाळा उभारणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर कार्यशाळा वापरात येईल. तरी सदर कामाच्या रु. १,३९,८९,०००/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक:-** श्री. बर्नड डिमेलो

**अनुमोदन :-** श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

PC3/DK/2013-14/MT26

116

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.११/१२/२०१३

**प्रकरण क्र. ७८ :-** **उद्याने व वृक्षप्राधिकरण विभागाकरीता आधुनिक पध्दतीने उद्याने विकसित करणेकामी लॅन्डस्केप आर्किटेक्चर प्लॅनरची नेमणुक करणेबाबत.**

**ठराव क्र. ७८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात चेणा ते उत्तन असा एकूण ७९ चौ.कि.मी. विस्तीर्ण परिसरात ०६ प्रभाग असून त्यामध्ये एकूण ५१ उद्याने, ९ मैदाने व २ चौपाट्या, १३ स्मशाने, १५ कि.मी. लांबीचे दुभाजक विकसित करण्यात आलेले आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बगीच्यासाठी आरक्षीत असलेली आरक्षणे मोठ्या प्रमाणात असून त्यामधील काही आरक्षणे विकसित केलेली असून त्यातील काही आरक्षणे विकसित करणेकरीता प्रस्तावित करावयाची आहे. यास्तव पूर्व नियोजित नकाशे, आरखडे तयार करून बगीचा विकसित करणे आवश्यक आहे जेणेकरून भविष्यात शहरात सुंदर उद्याने विकसीत होतील.

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खालीलप्रमाणे बगीच्यासाठी आरक्षित आरक्षणे क्रमांक ९३,१२०,१३९,१६२,२१४,२१६,२२६,२३०,२३५,२४२,२४८,२५४,२५५,२५८,२६९,३६८,३७० अशी आहेत.**

सन २०१३-१४ या वर्षाची मंजुर अंदाजपत्रकात मधील "उद्याने/दुभाजक सुशोभिकरण करणे" या शिर्षाखाली रू. १०००.०० लाख (रू. दहा कोटी फक्त) रक्कमेची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त आरक्षणे आधुनिक पध्दतीने विकसित करणेकामी सहा **लॅन्डस्केप आर्किटेक्ट प्लॅनर / सल्लागार** यांच्या पॅनलची तीन वर्षाकरीता नेमणूक करणेकरीता मा. महासभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

**सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्री. शरद पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

नमुद आरक्षण क्र. मधून ५० % पेक्षा आरक्षण क्षेत्राचा महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले आरक्षणासाठी फक्त लॅन्डस्केप आर्किटेक्ट व तांत्रिक सल्लागार किंवा कन्सलटन्टची नेमणूक करण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

117

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.११/१२/२०१३

प्रकरण क्र. ७९ :- महानगरपालिका उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता पदनिर्मितीबाबत.

ठराव क्र.७९:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात चेणा ते उत्तन असा एकूण ७९ चौ.कि.मीटर विस्तीर्ण परिसरात ०६ प्रभाग असुन त्यामध्ये एकुण ५१ उद्याने, ९ मैदाने, २ चौपाटया, १३ स्मशाने, १५ कि.मी. लांबीचे दुभाजक असल्याने परिसरातील सर्व उद्याने, मैदाने, दुभाजक यांची देखरेख, निगा ठेवणे तसेच दैनंदिन कामे जशी उद्यानात माती टाकणे, खड्डे बुजवणे, गवत कापणे, उद्यानांतील व रस्त्याचे दुतर्फा वाढलेल्या झाडांच्या फांद्याची छाटणी करणे, मा. नगरसेवक, नागरीक व स्वंयभावी संस्था यांचे तक्रारी व सुचनेचे पालन करुन कार्यवाही करणे, मोठया प्रमाणात रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे, देखरेख/निगा राखणे आवश्यक असते. मिरा भाईंदर महानगरपालिकेत काही ठिकाणी बऱ्याचशा प्रमाणात मॅग्रोव्हज (तिवराची) झाडे आहेत व ती तोडण्याबाबत केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाने कडक नियम केलेले आहेत. विना परवानगी झाडे तोड केल्याबाबत पंचनामा करुन एफ.आय.आर.सुध्दा दाखल करणे, मा. वृक्षप्राधिकरण समिती मा.स्थायी समिती व मा.महासभेस पाठविण्याचे गोषवारे तयार करणे, केंद्रशासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्जदाराने मागितलेली माहिती मुदतीत देणे, लोकशाही दिन, जनता दरबार, केंद्रशासन व राज्यशासन यांच्याकडे पत्रव्यवहार, विधानमंडळ अधिवेशन संबंधित संपूर्ण पत्रव्यवहार उदा.तारांकित, अतारांकित प्रश्न, कपात सुचना इ.इ. वटवृक्ष दिन त्याचबरोबर ५ जुन जागतिक पर्यावरण दिन साजरा करणे, लोकांमध्ये जनजागृती करणेकरिता दरवर्षी झाडे, फळे, फुले, भाजीपाला यांचे प्रदर्शन भरविणे इ.इ. कामे उद्यान विभागामार्फत करण्यात येत असतात.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उद्यान अधिक्षक पदनामाची दोन पदे मंजूर असुन सध्यस्थितीत केवळ दोन उद्यान अधिक्षक विभागामध्ये कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त या विभागाकरीता तांत्रीक, अनुभवी कर्मचारी कार्यरत नसल्याने दैनंदिन कामकाज करणे जिकीरीचे होत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका विकास आराखड्यातील विविध आरक्षित उद्याने, मैदाने उत्तम प्रकारे विकसीत करणेसाठी या विभागाकडे तांत्रिक कर्मचारी असणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेत सद्यस्थितीत सहा प्रभाग समित्या असुन हरित सुंदर मिरा भाईंदर महानगरपालिका शहराचा विकास झपाटयाने होत असुन महानगरपालिकेचा कारभार मोठया जोमाने वाढलेला आहे व भविष्यात देखील यात वाढ होणार आहे. उद्यान विभागाच्या कामात गतिमानता आणणेसाठी आढावा बैठका घेणे, कामावर नियंत्रण ठेवणे, कामाच्या आवश्यकतेनुसार पत्रक तयार करणे, वरिष्ठांची मान्यता घेणे, कार्यादेश देणे तसेच अस्तित्वातील उद्यानांची देखभाल व उद्यानांतील खेळ साहित्यांची दुरुस्ती करणे, उद्यानांतील पिण्याच्या पाण्याची सोय करणे, मातीचे परिक्षण करणे, उद्यानांतील पालापाचोळया पासुन कंपोस्ट खत तयार करणे, उद्यानांतील विद्युत विषयक कामांची दुरुस्ती व देखभाल करणे. उद्यानांची देखरेख करणे अशा प्रकारचे कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने खालील पदनिर्मिती करणे आवश्यक आहे. प्रशासकीय कामकाज पारदर्शक होण्यासाठी सध्या आवश्यक कर्मचारी वर्ग नाही, प्रशासकीय काम गतिमान व लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात अधिक अधिकारी व कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे व त्या करीता खालील पदे उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात मंजूर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | प्रस्तावित पदे मंजुरी करिता | वेतनश्रेणी / कर्तव्य |
|---|---|---|---|
| १. | मुख्य उद्यान अधिक्षक<br>वर्ग – १ | ०१ | वेतनश्रेणी – १५६०० - ३९१००<br>ग्रेड पे - ५४००<br><br>कर्तव्य - उद्यान विभागाचे नियंत्रण व पर्यवेक्षण करणे वेगवेगळया सेवाभावी संस्थाना उद्यानात सांस्कृतिक व पर्यावरणविषयक कार्यक्रम घेण्यास मान्यता देणे. उद्यान विकासकामे आराखडा तयार करणे. तसेच उद्यान विभागाच्या कामात गतिमानता आणणेसाठी आढावा बैठका घेणे. तसेच मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ नुसार नेमुन दिलेली सर्व कर्तव्ये पार पाडणे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संवर्धन आणि संवर्धन नियम, २००९ सह शासन आदेश अधिसुचनाचे कर्तव्य पार पाडणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | उप मुख्य उद्यान अधिक्षक<br>वर्ग – २ | ०२ | वेतनश्रेणी – ९३०० - ३४८००<br>ग्रेड पे – ५४००<br>कर्तव्य - मुख्य उद्यान अधिक्षक यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ नुसार नेमुन दिलेली सर्व कर्तव्ये पार पाडणे. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संवर्धन आणि संवर्धन नियम, २००९ सह शासन आदेश अधिसुचनाचे कर्तव्य पार पाडणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ३. | सहाय्यक उद्यान अधिक्षक<br>वर्ग – ३ | ०६ | वेतनश्रेणी – ९३०० - ३४८००<br>ग्रेड पे – ४२००<br>कर्तव्य - अस्तित्वातील सर्व उद्यानांची देखरेख करणे व मुख्य उद्यान अधिक्षक/उप मुख्य उद्यान अधिक्षक यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. सर्व पर्यवेक्षक यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे व कामाचे आदेश देणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ४. | कनिष्ठ अभियंता<br>वर्ग – ३ | ०१ | वेतनश्रेणी – ९३०० - ३४८००<br>ग्रेड पे - ४२००<br>कर्तव्य - नियंत्रणा खालील क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत येणाऱ्या उद्यानातील स्थापत्य विषयक कामांची प्रत्यक्ष जागा पाहणी करुन कामाची कार्यवाही करणे. कामाच्या आवश्यकतेनुसार पूर्वगणक पत्रक तयार करणे, वरिष्ठांची मान्यता घेणे. कार्यादेश तयार करणे. कामाचा दर्जा राखणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ५. | वरिष्ठ लिपीक<br>वर्ग – ३ | ०१ | वेतनश्रेणी – ५२०० - २०२००<br>ग्रेड पे - २४००<br>कर्तव्य - कार्यालयातील प्रशासकीय कामकाजात सरलेखनिक यांना सहकार्य करणे. अंदाजपत्रकाबाबतची सर्व कामे तसेच तसलमात करणे, माहिती अधिकार पत्रव्यवहार कामकाज करणे, कार्यालयातील सेवकांवर नियंत्रण ठेवणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ६. | कनिष्ठ लिपीक<br>वर्ग – ३ | ०४ | वेतनश्रेणी – ५२०० - २०२००<br>ग्रेड पे - १९००<br>कर्तव्य - आवक जावक बारनिशी, निविदा प्रक्रियेतील सर्व कामे, रजा प्रकरणे तयार करणे, वरिष्ठांनी नेमून दिलेली कामे वेळेत पूर्ण करणे. तसेच वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. |
| ७. | हेड माळी<br>वर्ग - ३ | १२ | वेतनश्रेणी – ५२०० - २०२००<br>ग्रेड पे - १९००<br>कर्तव्य - उद्यान देखभाल/वृक्षारोपणाची संबंधित सर्व कामे करणे. |
| ८. | प्लंबर<br>वर्ग - ३ | ०२ | वेतनश्रेणी – ५२०० - २०२००<br>ग्रेड पे - १९००<br>कर्तव्य - उद्यानातील पाणीपुरवठ्याशी संबंधित सर्व कामे. |

वर नमुद प्रमाणे उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागास नविन पदनिर्मिती प्रस्तावास ही सभा मान्यता देत असून सदर पदनिर्मितीचा प्रस्ताव त्वरित शासनाकडे मान्यतेस्तव पाठविण्यात यावा.

सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील  अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

सदर ठरावामध्ये सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदक श्री. शरद पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली. महानगरपालिकेच्या ज्या विभागात पदनिर्मिती आवश्यक आहे ते पुढील महासभेत सादर करावे अशी मी सुचना मांडत आहे.

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(119)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१४
## (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ८१ :-** **सन्मा. विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र एल. मेहता यांचा दिनांक ०६/१२/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- हाऊस फॉर डिसहाऊस या आरक्षणामधील डी.सी. रुलमधील तरतुदीमध्ये विकास परवानगीच्या अनुषंगाने बदल करणेबाबत.**

**ठराव क्र. ८२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये हाऊस फॉर डिसहाऊस करीता भाईंदर (प.) येथे आरक्षण क्र. ७२ व १५० क्षेत्र ७.२६ हेक्टर जागा आरक्षित आहे. सदर आरक्षण संपूर्ण सी.आर.झेड ते बाधीत आहे. तसेच भाईंदर (पूर्व) नवघर येथे आरक्षण क्र. २२२ क्षेत्र ४.२२५ हेक्टर, आरक्षण क्र. २२२ अ क्षेत्र ५.७७५ हेक्टर ही आरक्षणे हाऊस फॉर डिसहाऊस करीता आरक्षित आहे. भाईंदर (पूर्व) नवघर येथील आरक्षणे सी.आर.झेड ने बाधीत आहे.

वरील दोन्ही आरक्षणातील जागा विकसीत करावयाची असल्याने भविष्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेचा विकास पाहता अनेक नागरीकांची पुर्नविकासामध्ये व रस्ता रुंदीकरणामध्ये घरे, दुकाने तुटणार आहेत. याकरीता त्यांना सदनिका, दुकाने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने हाऊस फॉर डिसहाऊस या आरक्षणामध्ये मनपाने कोणत्याही प्रकारची परवानगी देवू नये. तसेच सदर जागा टी.डी.आर. चा मोबदला देवून ताब्यात घ्यावीत.

सदर आरक्षणामध्ये डी.सी. रूलप्रमाणे १० टक्के सदनिका, दुकाने मनपास मोफत बांधून दिल्यास ९० टक्के घरे विकासकास बांधण्यास परवानगी देवू नये. डि.सी. रुलप्रमाणे सदर आरक्षणे कोणी विकसीत करावे हा संपूर्ण अधिकार मनपाचा आहे. म्हणून यापुढे व वर नमुद केल्याप्रमाणे सदर दोन्ही हाऊसिंग फॉर डिसहाऊस आरक्षणामध्ये कोणत्याही प्रकारची परवानगी देऊ नये. सदर आरक्षणे मिरा भाईंदर महानगरपालिकेने विकसीत करावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(120)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१४
## (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ८२ :-** **सन्मा. सदस्या श्रीम. मिरादेवी रामलाल यादव यांचा दिनांक ०६/१२/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत धोरणात बदल करणेबाबत.**

**ठराव क्र.८३ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये काशिमिरा विभागामध्ये बी.एस.यु.पी. योजना राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत नागरीकांना लॉटरीद्वारे घरे मिळालेली आहेत. याठिकाणी सर्व धर्मांचे नागरिक अनेक वर्ष एकत्र राहत आहेत. जे नागरिक मंदीर, मज्जीद, कब्रस्थान या ठिकाणी राहत आहेत अश्या नागरिकांना त्याच परिसरात घरे दिल्यास त्यांना तेथे राहणे सोयीचे जाणार आहे. तरी ज्या विभागामध्ये जे नागरिक खूप वर्षापासून राहत आहेत अश्या नागरिकांना ते राहत असलेल्या परिसरामध्ये व बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेमधून घरांचे वाटप त्याच ठिकाणी करावे. याकरीता बी.एस.यु.पी. योजनेअंतर्गत धोरणामध्ये व नियमात बदल करुन घेण्याचा अधिकार मा. आयुक्त सो., यांना देण्यात येत आहे.

सदर बी.एस.यु.पी. प्रकल्पास २ वर्ष विलंब झाल्या कारणाने भविष्यात २०० कोटींचा अतिरिक्त भार पडणार. या विलंबनासाठी जे दोषी अधिकारी असतील त्यांच्यासाठी उच्चस्तरीय चौकशी अधिकारीची राज्य शासनामार्फत नेमणूक करावी आणि या विषयासाठी मा. महासभा आयोजित करावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्रीम. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१२५)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१४

दु:खवटा ठराव ८३ अ :-

भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नगरसेविका कांचन पुजारी ह्यांचे चिरंजीव मनोज शेखर पुजारी ह्यांचा दिल्ली शहाँजनपूरकडे अपघाती मृत्यु झाला त्याचा मी शोक प्रस्ताव मांडतो. तसेच हिराजी जयराम पाटील नवघर माणिकपूर ह्यांचे निधन झालेले आहे. तसेच सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंगच्या आई मयत झाल्या आहेत त्यांचा देखील शोकप्रस्ताव मांडतो.

सुचक :- श्री. जुबेर इनामदार        अनुमोदक :- श्री. रोहिदास पाटील

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१४

**प्रकरण क्र. ८३ :-** दि. १९/११/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ८४ :-**

दि. १९/११/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :-                      अनुमोदन :-

श्री. ध्रुवकिशोर पाटील     ठराव सर्वानुमते मंजुर     श्री. झुबेर इनामदार

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१४

प्रकरण क्र. ८४ :- स्थायी समितीच्या एका सदस्याने राजीनामा दिल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये एक (१) सदस्याची नेमणूक करणे. राजीनामा दिलेल्या सदस्याचे नांव :- १) श्रीम. शर्मिला विन्सन बगाजी. (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष)

ठराव क्र. ८५

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष ह्यांनी दिलेल्या पत्रानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० च्या तरतूदी अनुसार शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम. यांची मा. स्थायी समितीमध्ये उर्वरित कालावधीसाठी नामनिर्देशन करण्यात येत आहे.

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१२५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१४

**प्रकरण क्र. ८५ :- राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेबाबत.**

**ठराव क्र. ८६ :-**

आजच्या मा. महासभेमध्ये राष्ट्रीय फेरीवाला धोरण हा विषय चर्चा व मंजूरीकरीता ठेवण्यात आलेला आहे. राष्ट्रीय फेरीवाला धोरण ठरविणेकरीता सभागृहासमोर प्रशासनाकडून गोषवारा व या संबंधीत माहिती दिलेली नाही. या विषयासंबंधित अभ्यास करणे महत्वाचे असल्याने तसेच फेरीवाल्यांवर या धोरणामुळे अन्याय व अडचण निर्माण होऊ नये याकरीता प्रशासनाने या विषयाबाबत सर्व सदस्यांना सविस्तर माहिती द्यावी.

तसेच मा. आयुक्त सो. यांनी बाजार लिलाव निविदा मागवून लिलावाची प्रक्रिया पूर्ण करावी. मा. आयुक्त सो. यांनी राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेकरीता सर्व पक्षीय बैठक बोलावून या विषयाची चर्चा ठेवावी. त्यानंतर उपरोक्त विषय संपूर्ण माहितीसह मा. महासभेमध्ये घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१५)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ११/०२/२०१४

**प्रकरण क्र. ८६ :-** **शहरातील पावसाळ्यापुर्वी कच्चे/ पक्के नाले सफाई करणे व इतर आरोग्य विभागाच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.**

**ठराव क्र. ८०:-**

**अ) पावसाळ्यापुर्वी कच्चे, पक्के नाले सफाई /खोदाई करणे :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यानुसार पावसाळ्यापुर्वी मुदतीत नाले सफाईची कामे करणे अत्याआवश्यक असल्याने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात महानरगपालिका क्षेत्रातील कच्चे/ पक्के नाले सफाई व खोदाई करणे, गाळ/माती वाहतुक करणे आदी कामे पावसाळ्यापुर्वी करणे कामी भाडयाने जे.सी.बी., पोकलन, बोटपोकलन मशीन, हायड्रा मशीन, क्रेन, डंपर, टोरस घेणे, कच्चे/ पक्के नाले सफाई करण्यासाठी कंत्राटी मजूर घेणे तसेच सखल भागातील पाण्याचा उपसा करणे कामी विविध क्षमतेचे सक्शन पंप, आदी भाडयाने घेणे, त्याचप्रमाणे इमारतीच्या प्रवेशद्वारा जवळ तसेच रोड क्रॉसिंग करुन पावसाच्या पाण्याचा निचरा करणे कामी विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप आवश्यकतेनुसार खरेदी करणे आदी कामाची निविदा प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ नुसार मागविणेस मान्यता देत असून आगामी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकातील वॉर्ड सफाई/नाले सफाई या लेखाशिर्षाच्या तरतुदीतून दिड कोटी खर्च करण्यास हि सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे. तसेच मा. आयुक्त सो. याला पूर्ण जबाबदार राहतील त्यांच्या नियंत्रणाखाली त्यांनी हे सर्व मंजूर करायचे आहे. तसेच ज्या वॉर्डात नालेसफाई होईल त्या वॉर्डातल्या नगरसेवकांना सुचना द्याव्यात आणि नगरसेवक तिथे जावून उपस्थित राहतील असा मी ठराव मांडत आहे. तसेच एकात्मिक डास नियंत्रण करणे कामी अळी नाशके, किटक नाशक, दुर्गंधी नाशके खरेदी करणेसाठी हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**ब) एकात्मिक डास नियंत्रण करणे कामी अळी नाशके, किटक नाशक, दुर्गंधी नाशके खरेदी करणे :-**

मनपा क्षेत्रातील डास नियंत्रण करणे कामी प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार शहरातील डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणे कामी एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम राबविणेसाठी नामांकित कंपनीचे डास नाशके, अळी नाशके, किटक नाशके तसेच औषध फवारणी करणे कामी लागणारे यंत्र सामुग्री साहित्य वस्तु, वाहने इत्यादी खरेदी करणे, त्याचप्रमाणे मनपाच्या विविध आस्थापना तसेच मच्छी मार्केट, भाजी मार्केट इत्यादी ठिकाणी साफसफाई करणे कामी दुर्गंधी नाशके, पावडर व साहित्य वस्तु खरेदी करणे आदी कामाच्या निविदा मागविणेस मान्यता देत असून आगामी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम करणे, दुर्गंधी नाशके व किटक नाशके खरेदी करणे या लेखाशिर्षाच्या तरतुदीतून खर्च करणेस हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत असून ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०३/२०१४
## (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ८७ :- घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी कामी मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ८८ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार महापालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प मौजे उत्तन येथे मे. हेंजर बायोटेक मिरा यांच्या तर्फे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर उभारण्यात आला आहे. सदर प्रकल्प माहे मे २००८ मध्ये कार्यान्वीत झालेला आहे. सदरचा प्रकल्प पुनश्चः सुरु करताना घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पर्यायी जागेत स्थलांतरीत करण्यात येईल असे लेखी आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार मा. महासभा दि.२९/०६/२०१०, ठराव क्र.१३ अन्वये मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प मौजे वर्सोवा येथे पर्यायी जागेत स्थलांतरीत करणेबाबत मंजुरी मिळाली होती. सदरची जागा (इको सेंसेटीव्ह झोन) मध्ये असल्याने सदर जागेबाबत शासनाने मंजुरीचा निर्णय प्रलंबित आहे. मा. उच्च न्यायालयाने दि.०२/०४/२०१३ रोजी दाखल रिट याचिका १७४०/१९९८-५२ बाबत आदेश देताना मनपा क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन कालमर्यादेत करणेबाबत आदेशीत केलेले आहे. सदर आदेशाबाबत महापालिकेने केलेल्या कारवाईचा आढावा घेणेकरीता मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी दि.१७/०७/२०१३ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीत महापालिकेत जागा नसल्यास तळोजा येथे समाईक भराव भुमित सामील व्हावेत अशी सुचना दिलेल्या होत्या.

महापालिकेने केलेल्या मागणी नुसार मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी क्रमांक महसुल/कक्ष-१/टे-९/ज.मा./मि.भा.म.न.पा./कावि-२२२७, दि.२१/१०/२०१३ अन्वये मौजे सकवार तालुका वसई येथील स.नं./हि.नं./८३/१-ब क्षेत्र १३-१०-० हे आर. ही सरकारी जमिन महापालिकेस घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे करणेकामी दिलेली आहे. महापालिकेने सदर जमिनीची रक्कम रु. ७३,१०,८१६/- शासनाकडे जमा केली आहे. महापालिकेस सदरच्या जागेबाबतची ताबा पावती मिळाली आहे.

उपरोक्त जागेवर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणी करणे करीता सल्लागाराची नियुक्ती करणे, घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे करीता सध्या उपलब्ध असलेल्या पर्यायापैकी योग्य पर्यायाची निवड करणे, प्रकल्प जागेवर पायाभुत सुविधा तयार करणेस तसेच मौजे सकवार येथील जागेवर व मौजे सकवार मध्ये ग्रामस्थांचे सर्वांगिण विकासासाठी विविध सुविधा (उदा. रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, रोजगार इ.) साठी मदत करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

एमएमआरडीए मार्फत विकसीत होणाऱ्या तळोजा येथील सामाईक भराव भुमीत किंवा इतर महापालिकेच्या प्रकल्पात योग्य असल्यास सामील होणेस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच याबाबतीत निर्णय घेणेबाबत सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे. याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुर देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १ | कोठारी सुमन रमेश | |
| २ | अशोक तिवारी | २ | कांगणे यशवंत ठकाजी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | ३ | सिंग मदन उदितनारायण | |
| ४ | पाटील वंदना विकास | ४ | पाटील रोहिदास शंकर | |
| ५ | पाटील वंदना मंगेश | ५ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | |
| ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | |
| ८ | स्टिवन जॉन मेंन्डोसा | ८ | मेहता डिंपल विनोद | |
| ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ९ | केळुसकर प्रशांत नारायण | निरंक |
| १० | डॉ. आसिफ गुलाब शेख | १० | भानुशाली वर्षा गिरीधर | |
| ११ | गोविंद हेलन जॉर्जी | ११ | रावल भगवती जयशंकर | |
| १२ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | १२ | शाह राकेश रतिशचंद्र | |
| १३ | लियाकत ग. शेख | १३ | शरद केशव पाटील | |
| १४ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | १४ | मेघना दिपक रावल | |
| १५ | खण्डेलवाल सुरेश | १५ | जैन गिता भरत | |
| १६ | नरेश तुकाराम पाटील | १६ | जैन रमेश धरमचंद | |
| १७ | शबनम लियाकत शेख | १७ | डॉ. राजेंद्र जैन | |
| १८ | अनिता जयवंत पाटील | १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | |
| १९ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | |
| २० | भावसार शिल्पा कमलेश | २० | सुजाता रविकांत शिंदे | |
| २१ | वंदना रामदास चक्रे | २१ | मेहता नरेंद्र लालचंद | |
| २२ | भोईर कमलेश यशवंत | २२ | शाह सिमा कमलेश | |
| २३ | रविंद्र भिमदेव माळी | २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | |
| २४ | दक्षता राजेंद्र ठाकूर | २४ | डॉ. नयना मनोज वसानी | |
| २५ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | २५ | जैन दिनेश तेजराज | |
| २६ | पाटील सुनिता कैलास | २६ | अरोरा दिपीका पंकज | |
| २७ | वेतोसकर राजेश शंकर | २७ | मीरादेवी रामलाल यादव | |
| २८ | प्रभात प्रकाश पाटील | २८ | अनिल बाबुराव भोसले | |
| २९ | सुहास माधवराव रकवी | २९ | निलम हरिश्चंद्र ढवण | |
| ३० | झिनत रऊफ कुरेशी | ३० | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | |
| ३१ | पुजारी कांचना शेखर | ३१ | संध्या प्रफुल्ल पाटील | |
| ३२ | काझी रशीदा जमील | ३२ | प्रविण मोरेश्वर पाटील | |
| ३३ | इनामदार जुबेर | ३३ | शुभांगी महिन कोटियन | |
| ३४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | ३४ | जयमाला किशोर पाटील | |
| ३५ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | ३५ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | |
| ३६ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | ३६ | जाधव मोहन महादेव | |
| ३७ | डिसा मर्लिन मर्विन | ३७ | भोईर भावना राजू | |
| ३८ | दिप्ती शेखर भट | ३८ | भोईर राजू यशवंत | |
| ३९ | विराणी रेखा अनिल | | | |
| ४० | सामंत प्रमोद जयराम | | | |
| ४१ | मुन्ना सिंग | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(128)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.०१/०३/२०१४

## (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ८८ :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी इमारतीवर वेदरशेड उभारणेकरिता सुधारीत धोरण निश्चित करणेबाबत.**

**ठराव क्र. ८९:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध रहिवासी इमारतीच्या शेवटच्या मजल्यावर वेदरशेड उभारणेसाठी महानगरपालिकेकडून परवानगी देण्यात येते. सदरची परवानगी मा. महासभा ठराव क्र. ८३, दि.१६/०१/२००९ अन्वये देण्यात येते. महानगरपालिकेकडून सध्या देण्यात येत असलेल्या परवानगीमध्ये नमुद अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. सदर शेडची मध्यभागी उंची ५ फुटापेक्षा जास्त नसावी.
२. सदर शेडचा वापर वातावरणापासुन संरक्षण होण्याच्या मर्यादेत असुन शेडचा अन्य वापर करता येणार नाही.
३. सदर परवानगी तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यायोगे कोणतेही पक्क्या स्वरुपाचे बांधकाम करता येणार नाही.
४. सदर शेड उभारताना मालकी हक्काचा वाद किंवा तक्रार प्राप्त झाल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.
५. सदर प्रकरणात सादर केलेले कागदपत्रे विधीग्राह्य नसल्यास नाहरकत दाखला रद्द करुन विहीत कार्यवाही करण्यात येईल.
६. सदर परवानगीमुळे विद्यमान इमारत अधिकृत होत नाही व इमारतीच्या अनधिकृत बांधकामाच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा येणार नाही.
७. सदर शेडमुळे विद्यमान इमारतीच्या स्ट्रक्चरल स्टॅबिलिटीस धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल.
८. वेदरशेडच्या परवानगीमुळे इमारतीस भोगवटा दाखला प्राप्त होत नाही.
९. वरील अटीशर्तीचा भंग केल्यास परवानगी रद्द करणेत येईल.
१०. सदरची परवानगी (तीन महिने) राहिल.
११. मुदत संपल्यानंतर वेदरशेड स्वखर्चाने काढणे बंधनकारक राहिल.
१२. वेदर शेडची मुदत पूर्ण झाल्यानंतर संबंधित प्रभाग अधिकारी यांना त्वरीत अवगत करुन द्यावे.

उपरोक्त नमुद अटी व शर्तीचे अवलोकन केले असता, वेदरशेडची परवानगी ही ०३ महिन्याच्या कालावधीकरिता देण्यात येते. तद्‌नंतर दिलेल्या परवानगीस मुदतवाढ घेण्यात येत नाही व इमारतीवरील वेदरशेड काढणेत येत नाहीत. त्यामुळे वेदरशेड काढून टाकण्याबाबत महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त होत आहेत.

इमारतीच्या टेरेसवर वेदरशेड उभारल्यानंतर कोणतीही सोसायटी व इमारतधारक हे आयर्न ॲन्गल, पाईप व लोखंडी पत्रे, इ. साहित्याचा वापर करुन वेदरशेड उभे केले जातात. त्यामुळे ०३ महिन्याचा परवानगी कालावधी संपुष्टात आल्यानंतर वेदरशेड काढून ठेवणे व पुन्हा परवानगी प्राप्त करुन वेदरशेड उभारणे ही बाब निश्चितच इमारतधारकांना खर्चिक व अडचणीची आहे. त्यामुळे विद्यमान धोरणात नमुद अटी व शर्ती क्र. ९, १०, ११, १२ वगळण्यात येत असून नव्याने खालील अटी व शर्तीचा सामावेश करण्यात येत आहेत.

१. वेदरशेडचे जागेत कोणत्याही स्वरुपाचे चटईक्षेत्र (रहिवास, वाणिज्य व अन्य) वापर करता येणार नाही.
२. वेदरशेडचे जागेस महानगरपालिकेकडून कर आकारणी करण्यात येणार नाही.

३. महानगरपालिकेस आवश्यकता वाटल्यास परवानगी रद्द करण्यात येईल व वेदरशेड काढून टाकण्यात येईल.
४. सदरची परवानगी ही तात्पुरती स्वरुपाची असल्यामुळे सदर परवानगीचे नुतनीकरण / मुदतवाढ प्रथम परवानगी दिलेल्या दिनांकापासून तीन वर्षाचा कालावधी संपुष्टात येण्यापूर्वी नुतनीकरण / मुदतवाढ प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील अन्यथा वेदरशेडचे महानगरपालिकेकडून विनासुचना विना नोटीस काढून टाकण्यात येईल.

सद्यस्थितीत रहिवास इमारत एका विंगकरिता अनामत ठेव रक्कम रु.५,०००/- व वेदरशेड शुल्क रु.२,५००/- याप्रमाणे आकारणी प्रतीवर्ष करण्यात ठराव मंजूर करणेत येत आहे.

**सुचक - श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक - श्री. जुबेर इनामदार**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

आपण डिपॉझीट व भाडे आकारुन त्याची मुदत तीन वर्षाची केलेली आहे. ज्या धोकादायक इमारती आहेत त्या ह्याच्यात बसत नाहीत. ज्या इमारतीला आपण परवानगी देतो मुळात त्या लोकांना चालवणं मुश्किलीचं असून आपण त्यांना फक्त तीन वर्षाची मुदत दिली आहे. नुतनीकरण करावयाची मुदत तीन वर्षाऐवजी पाच वर्षाची ठेवा अशी माझी सुचना आहे

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

अट एकमध्ये सदर शेडची मध्यभागील उंची पाच फुटापेक्षा जास्त नसावी असा उल्लेख आहे. सदर उंची सात ते आठ फुट करण्यात यावी अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(१२०)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/०३/२०१४

प्रकरण क्र. ८९ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ९६ (खेळाचे मैदान) व आरक्षण क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाचे करारनाम्याबाबत.

(सदरचा ठराव तहकूब करण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(131)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा, मंगळवार दि. ०१/०३/२०१४**

(दि. २१/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ९० :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ९० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३५ शाळा असून त्यापैकी इयत्ता १ ते ४ थी चे ३२४, इयत्ता १ ते ५ वी चे १२६, इयत्ता १ ते ७ वी चे ८४२२ असे दि. ३० सप्टेंबर २०१३ च्या पटसंख्येनुसार एकूण ८८७२ विद्यार्थी-विद्यार्थीनी शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात १०% संभाव्य वाढ लक्षात घेउन एकूण अंदाजे १०,००० पर्यंत पटसंख्या अपेक्षित आहे. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी-विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश - टाय सह (प्रत्येकी – २) बुट मोजे, वह्या, बॅग, पाण्याच्या बाटल्या ई. पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे. मनपा शाळेतील विद्यार्थी-विद्यर्थीनींना सदर धोरणानुसार सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे. सबब साहित्य खरेदी करण्याकरिता पुरवठा करण्यात आलेले गणवेश विद्यार्थ्यांना मोजमाप फिटींग्स मध्ये आणण्याकरिता गरज भासल्यास ठेकेदाराने टेलरची व्यवस्था शाळेत करावी याकरिता हि सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटील

**अनुमोदक :-** श्री. झुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

60

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०१/०३/२०१४

(दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्रमांक ( ९१ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीच्या स्ट्रीट लाईट पोलचे वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ( ६९ )** :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या मालकीच्या स्ट्रीट लाईट पोलची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रु. ७५.०० लक्ष खर्चास व वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास, आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच नविन निविदा मागवून कार्यादेश देईपर्यंत सद्यस्थितीत कामे करणाऱ्या कंत्राटदारांची मुदत ही दि. ०९/०१/२०१४ रोजी संपल्याने सदर कंत्राटदारास जुन्या मंजूर दराने मुदतवाढ देण्यात येत आहे. नविन नेमण्यात येणाऱ्या कंत्राटदारासोबत योग्य अटीशर्तींचा करारनामा करण्यात यावा. तसेच मे. रिलायन्स इंन्फ्रा लि. मार्फत बसविण्यात आलेल्या स्ट्रीट लाईट पोलच्या देखभाल दुरुस्ती, नविन पोल बसविणे बाबत महानगरपालिकेच्या हिताचा करारनामा करण्यास मा. आयुक्त यांना ही सभा प्राधिकृत करीत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकारी

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.११/०३/२०१४

(दि.११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्रमांक ( ९२ )** :- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या "भाडे तत्वावरील घरे" या योजनेतून महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या सदनिकांचे वाटप धोरण निश्चित करणे बाबत...

**ठराव क्रमांक ( ९२ )**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मार्फत मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये "भाडे तत्वावरील घरे" (रेन्टल हाऊसिंग स्कीम) ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये विशिष्ट आकारमानाच्या बांधल्या जाण्याऱ्या सदनिका या भाडेतत्वावर वितरित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे संबंधित विकासकाकडून विनामुल्य हस्तांतरित केल्या जातात. या महानगरपालिका हद्दीमध्ये सद्यस्थितीत काही योजना पुर्णत्वास येत आहेत व त्यातुन आवश्यक सदनिका मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे विनामुल्य हस्तांतरित होणार आहेत.

सदर सदनिका धोकादायक इमारतीमधील रहीवाशांना वितरीत करावयाच्या असून त्यासाठी हमीपत्र व करारनामा करण्यासाठी खालील प्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१) सदर सदनिकाचे मासिक भाडे रु. ~~२५००~~ 3000/- प्रति सदनिका असेल.

२) अ) सदर सदनिकेचा वापर केवळ तात्पुरत्या निवासासाठी होणार असल्याने या ठिकाणी वाढीव / अतिरिक्त बांधकाम, वाढीव लाईट फिंटींग, विजेचा अवाजवी वापर, पाण्याचा अनावाश्यक वापर इ. बाबी कटाक्षाने टाळुन सदर परिसर स्वच्छ ठेवावयाचा आहे. या सदनिकेचा वापर भोगवाटादाराने स्वतःच्या रहिवासासाठीच करावयाचा असून ती कोणत्याही इतर व्यक्तीस भाडयाने किंवा अन्य मार्गाने हस्तांतरीत करता येणार नाही. किंवा तिचा व्यावसायिक वापर करता येणार नाही, सदर अटींची भग केल्याचे आढळल्यास किंवा भाडयाची रक्कम व इतर देय रक्कम तीन महिन्याचे वर थकविल्यास सदनिका वाटप आदेश रद्द करण्यात येऊन ती महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल.

ब) या सदनिकेसाठी वापरण्यात येणाऱ्या विद्युत व पाणी वापराचे देयक भोगवटादाराने भरावयाचे आहे.

क) आवश्यकता भासल्यास महापालिका इतर ठिकाणच्या संक्रमण शिबीरातील सदनिकांमध्ये सदर भोगवटारास स्थलांतरीत करणेचे अधिकार महानगरपालिकेकडे असतील.

ड) सदर वाटप केलेल्या सदनिकांचे आवश्यकतेनुसार अथवा दर ६ महिन्यांनी थर्डपार्टी सोशल ऑडीट (सामाजीक लेखापरिक्षण) करण्यात येईल तसेच सदनिका धारकांची उपस्थिती बायोमेट्रीक पध्दतीने तपासण्यात येईल.

इ) एका कुटुंबास एकाच सदनिकेचा ताबा देण्यात येईल.

ई) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कुटुंबातील पती / पत्नी अज्ञान मुले व त्याच्या अविवाहीत मुलींचे नावे इतर ठिकाणी घर सदनिका असल्यास ते असे सदनिका मिळण्यास पात्र ठरणार नाहीत.

३) अशा सदनिका धारकांचे मुळ इमारतीमधील निवासाचे हक्क कायमस्वरुपी अबाधीत ठेवून सदरचे स्थलांतरण करण्यात येणार आहे.

४) धोकादायक इमारतीत जे रहिवाशी सदर इमारत धोकादायक / अथवा मानवी वस्तीस अपात्र घोषीत करण्यात आलेल्या दिनांकास, ११ महिन्याच्या लिव्ह लायसन्सवर अथवा भाडेतत्वावर रहात असतील, त्यांना सद्यस्थितीत मानवतेच्या दृष्टीकोनातुन व इमारत संपुर्णपणे निष्कासन होण्याच्या दृष्टीने या योजनेमध्ये संक्रमण निवासस्थानात स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

५) येत्या पावसाळयानंतर रिक्त राहणाऱ्या सदनिका हया महापालिकेचे मंजुर राज्य व केंद्र शासनाच्या गृहबांधणी प्रकल्प मिशन कालावधीत पुर्ण होणेकरीता त्यांचा वापर करणेस परवानगी देता येईल.

६) "भाडे तत्वावरील घरे" प्रकल्पामध्ये प्राप्त झालेल्या इमारती, आणि परिसराची देखभाल व दुरुस्ती, लिफ्ट देखभाल दुरुस्ती, सार्वजनिक विजेच्या वापरासंबंधीचे कामे, मोकळी जागा व उद्यान, पार्किंग परिसर, पॅसेजेस, साफसफाई, सुरक्षा रक्षक व लिफ्टमन इत्यादी दैनंदिन हाऊसकीपींगच्या कामासाठी महानगरपालिकेमार्फत निविदा मागविण्यात येतील व निविदा अंतीम होईस्तोवर सदरची कामे महानगरपालिके तर्फे सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने करण्यात येतील. यासाठी नवीन लेखाशिर्ष तयार करुन पुढील कार्यवाही करण्यात यईल.

७) सदर सदनिकांचे वाटप लॉटरी पध्दतीने करण्यात येतिल.

८) एकुण प्राप्त सदनिका मधील २५ % सदनिका महानगरपालिकेकडे आपतकालिन स्थितीत रहिवाशांच्या व्यवस्थेसाठी राखुन ठेवण्यात याव्यात.

९) सदर सदनिका हस्तांतरीत करण्यासाठी ३ वर्षासाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स (करारपत्र) करुन सदर कालावधी मुळ दिनांकापासुन जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत सिमित असेल.

१०) सदरचे धोरण मा. महासभेने मंजुरी दिलेल्या दिनांकापासुन अंमलात येईल.

११) धोकादायक इमारतीमधील दुकान दाराना भविष्यात एम.एम.आर.डी.ऐ कडून दुकाने प्राप्त झाल्यास सदर दुकाने वाटपाबाबत वरील अटीशर्तीनुसार कार्यवाही करावी.

१२) सदर धोरण या पुढील अस्तित्वातील धोकादायक इमारती मधील रहीवाशासांठी लागू राहील.

१३) वरील प्रमाणे धोरणात परिस्थितीनुसार शिथिलता आणण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत.

वरील धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**सुचक :-** श्री. ध्रुवकिशोर पाटिल

**अनुमोदन :-** श्री. जुबेर इनामदार

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**पिठासन अधिकारी**

(136)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. ०१/०३/२०१४
## (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ९३ :- महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयीसुविधांच्या विकास कामासाठी विशेष अनुदानातून करावयाच्या विकास कामांना मान्यता देणे.**

**ठराव क्र. ९३ :-**

शासन निर्णय क्र. जी ई एन - २०१३/प्र.क्र. २९५/नवि-१६, दि. ०३/१२/२०१३ अन्वये विकास कामांसाठी अनुदान उपलब्ध होणार आहे. सदर कामाकरीता मा. श्री. गिल्बर्ट जॉन मेंडोन्सा, मा. श्री. प्रताप सरनाईक व मा. श्री. मुझफ्फर हुसेन या तीन सन्माननीय आमदारांनी निधी करीता शासनाकडे मागणी केलेली होती.

त्या कामांसाठी ८०% निधी राज्य शासनाकडून उपलब्ध झालेला आहे तसेच सदर कामांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

(131)

## मा. महासभा दि. ०७/०३/२०१४

(दि. २२/०२/२०१४ रोजीची तहकूब सभा)

प्रकरण क्र. :- ९४

ठराव क्र. ९४

विषय :- राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (**National Urban Health Mission**) कार्यक्रम महानगरपालिका हद्दीत राबविण्यास मंजुरी मिळणेबाबत.

शहरातील झपाटयाने वाढणारी लोकसंख्या व तेथे उपलब्ध असलेल्या अपुऱ्या वैद्यकीय सोयी-सुविधा लक्षात घेऊन केंद्र शासनाने राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०१३-१४ पासून सदर अभियान सुरू करण्यात येत आहे.

शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (Programme Implimentation Plan) तयार करण्यात आलेला आहे.

सदर अभियान राबविण्याकरिता आवश्यक असलेला निधी केंद्र शासन व राज्य शासनातर्फे देण्यात येणार आहे. या अंतर्गत लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन आरोग्य केंद्रे चालू करण्यासाठी व आरोग्य विषयक विविध कार्यक्रम राबविण्यासाठी निधी प्राप्त होणार आहे. सदर कार्यक्रमांतर्गत नवीन उभारावयाच्या आरोग्य केंद्रांसाठी जागा उपलब्ध करून देणे, त्यांची स्थान निश्चिती करणे, शासनाच्या मार्गदर्शक सुचनांन्वये प्रकल्प अंमलबजावणी आराखडा बनवून आवश्यकते नुसार त्यात फेरफार करणे व मंजुरीकरिता शासनाकडे पाठविणे इत्यादींसाठी मा. महानगरपालिका आयुक्त यांना अधिकार प्रदान करणे आवश्यक आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) राबविणेस व त्या अंतर्गत वेळोवेळी आवश्यक ते निर्णय घेण्यास मा. आयुक्त यांना अधिकार देण्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सूचक : श्री. ध्रुवकिशोर पाटील

अनुमोदक : श्री. जुबेर इनामदार

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०३/२०१४

प्रकरण क्र. ९५ :- मौजे नवघर येथील महानगरपालिकेने विकसित केलेल्या जागेचा मोबदला मिळणेबाबत.

(सदरचा ठराव तहकूब करण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा मंगळवार दि. ११/०३/२०१४

(दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकूब सभा)

प्रकरण क्र. ९६ आरक्षण क्र. १०२ मध्ये बेकायदेशीरपणे दिलेली इमारत बांधकाम प्रारंभपत्र (मंजूरी) रद्द करणेबाबत.

ठराव क्र. ९५

मिरा-भाईंदर महानगरपालिक्का मंजूर विकास आराखड्यामधील सर्व्हे क्र. (जुना) १५४, (नवीन) २६ हा क्षेत्रातील काही भाग आरक्षण क्र. १०२ प्रमाणे बगीचा व मैदानाकरीता आरक्षीत आहे. सदर आरक्षणामध्ये महानगरपालिकेने मे. ओस्तवाल या विकासकास दिलेल्या बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्यानुसार विकासकामार्फत या ठिकाणी इमारत बांधकाम सुरु आहे. बगीचा व मैदानाकरीता आरक्षीत केलेले भूखंडावर बेकायदेशीर इमारत बांधकाम सुरु आहे.

तरी वास्तुविशारद मे. तेजस कन्सलटंन्ट्स यांचा इमारत बांधकामाचा प्रस्ताव व महापालिकेमार्फत प्राप्त झालेली बांधकाम परवानगी रद्द करावी तसेच संबंधीत वास्तुविशारद व विकासक यांचेवर दंडात्मक कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे.

**अनुमोदक : ~~मनिषा पिसाळ~~**

**सूचक :-**

**महापौर**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. ०१/०३/२०१४

## (दि. ११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्र. ९७ :-** **सन्मा. सदस्या सौ. गिता भरत जैन यांचा दिनांक ०४/०२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- वर्धमान डेव्हलपर्स (टाऊन पार्क, शिवार उद्यान) यांचे कंत्राट रद्द करणेबाबत.**

**ठराव क्र. ९६ :-**

मिरा भाईंदर महानगरपलिकेने आरक्षण क्र.२६२ विकसीत करण्याचा हेतू असा होता की, नागरीकांना टाऊन पार्कमधुन चांगल्या सोयीसुविधा मिळणे हा मुख्य उद्देश होता. करिता, बांधा वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर सदर आरक्षणातील जागा विकसीत करण्यासाठी मे. वर्धमान डेव्हलपर्स यांना हे काम दिलेले होते.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने वर्धमान डेव्हलपर्स लि. यांना वार्षिक भाडे रु.४५,४५,०००/- एवढ्या रक्कमेत B.O.T. तत्वावर दिलेले आहे. सदर आरक्षण दोन भागात विभाजीत केले आहे. प्लॉट A व प्लॉट B प्लॉट A मध्ये खाजगी व वाणिज्य वापर व प्लॉट B मध्ये पूर्ण विकसीत करुन फक्त नाममात्र रुपये २/- प्रवेश फी आकारुन शहरातील नागरीकांना प्रवेश देण्याचा आहे. या अटीशर्तीवर B.O.T. तत्वावर देण्यात आलेले आहे. विकासक वर्धमान डेव्हलपर्स लि. याने सदर आरक्षणातील प्लॉट B मध्ये अनधिकृत बांधकाम केलेले आहे. तसेच विकासकाने मनपास उशिरा वार्षिक देय दिलेले आहे.

सदर आरक्षणात मोठ्या प्रमाणात अटीशर्तीचे उल्लंघन करुन वाणिज्य वापर करीत आहे. त्यामध्ये नाममात्र रु.२/- तिकीट दर आकारुन सामान्य नागरीकांना कुठल्याही प्रकारे मोफत सुखसुविधा देत नाही. प्लॉट B चा मोठ्या प्रमाणात राईड्स, व्हीडीओ गेम्स, रेस्टॉरेंट यासाठी वापर करुन नागरीकांकडुन पैसे वसुल करीत आहे. प्लॉट B चे आरक्षण हे लग्नाकरीता व इतर कार्यक्रमासाठी सुध्दा देत आहेत.

प्लॉट B मध्ये ३१ डिसेंबर व इतर सुट्टीच्या दिवशी खाजगी कार्यक्रमाचे आयोजन करुन पैसे वसुल केले जातात. सदर कार्यक्रमावेळी मोठ्या प्रमाणात मारामाऱ्या व इतर भांडणे होत असतात. अशाप्रकारे वर्धमान डेव्हलपर्स यांनी करारनाम्यातील अटीशर्तीचा भंग केलेला आहे. तसेच त्यांनी महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे. पालिका प्रशासन उपरोक्त त्रुटींकडे दुर्लक्ष करीत आहे. याकरीता वर्धमान डेव्हलपर्स यांच्याकडून राहिलेले भाडे व्याजासह वसुल करुन व वरील त्रुटीचा आढावा घेऊन मे. वर्धमान डेव्हलपर्स यांचे कंत्राट रद्द करावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. गीता जैन** **अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | निरंक |
| २ | कांगणे यशवंत ठकाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोंसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | पाटील वंदना विकास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | पाटील वंदना मंगेश | |
| ६ | पाटील प्रेमनाथ गजानन | ६ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | स्टिवन जॉन मेन्डोसा | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| १० | भानुशाली वर्षा गिरीधर | १० | गोविंद हेलन जॉर्जी | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | |
| १२ | शाह राकेश रतिशचंद्र | १२ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| १३ | शरद केशव पाटील | १३ | खण्डेलवाल सुरेश | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | नरेश तुकाराम पाटील | |
| १५ | जैन गिता भरत | १५ | शबनम लियाकत शेख | |
| १६ | जैन रमेश धरमचंद | १६ | अनिता जयवंत पाटील | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | डॉ. राजेंद्र जैन | १७ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| १८ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १८ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १९ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १९ | वंदना रामदास चक्रे | |
| २० | सुजाता रविकांत शिंदे | २० | भोईर कमलेश यशवंत | |
| २१ | मेहता नरेंद्र लालचंद | २१ | सुमबंड महरूनीसा हारूनरशीद | |
| २२ | शाह सिमा कमलेश | २२ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २३ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २३ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| २४ | डॉ: नयना मनोज वसानी | २४ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | |
| २५ | जैन दिनेश तेजराज | २५ | पाटील सुनिता कैलास | |
| २६ | मीरादेवी रामलाल यादव | २६ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २७ | अनिल बाबुराव भोसले | २७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| २८ | निलम हरिश्चंद्र ढवण | २८ | झिनत रऊफ कुरेशी | |
| २९ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | २९ | काझी रशीदा जमील | |
| ३० | श्रीमती संध्या प्रफुल्ल पाटील | ३० | इनामदार जुबेर | |
| ३१ | प्रविण मोरेश्वर पाटील | ३१ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३२ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३३ | शुभांगी महिन कोटियन | ३३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३४ | जयमाला किशोर पाटील | ३४ | विराणी रेखा अनिल | |
| ३५ | परमार अनिता भरत | ३५ | सामंत प्रमोद जयराम | |
| ३६ | पाटील प्रणाली संदिप | ३६ | मुन्ना सिंग | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३८ | जाधव मोहन महादेव | | | |
| ३९ | भोईर भावना राजू | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. ०१/०३/२०१४

प्रकरण क्र. ९८ :- सन्मा. सदस्या सौ. गिता भरत जैन यांचा दिनांक ०४/०२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मे. टंडन ॲण्ड असोसिएट्स यांचेवर गुन्हा दाखल करुन दंडात्मक कार्यवाही करणेबाबत.

(सदरचा ठराव तहकूब करण्यात आला.)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(१५३)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०१/०३/२०१४

(दि.११/०२/२०१४ रोजीची तहकुब सभा)

**प्रकरण क्रमांक ( ९९ )** :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (ज) अन्वये प्रस्ताव.

नगरसेवक स्वेच्छा निधितुन करावयाच्या कामाच्या शासन परिपत्रकात बदल करणे बाबत.

**ठराव क्रमांक ( ९७ )**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पात "नगरसेवक स्वेच्छा निधी" या लेखाशिर्षाखाली तरतुद करण्यात येते. सदर लेखाशिर्षातुन करावयाची कामे ही राज्यशासन, नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ए एम सी १४२००/२२६४/प्र.क्र.१४४/नवि-२२ दि.२६ फेब्रुवारी २००१ अन्वये करण्यात येतात तथापी सदर परिपत्रकात नमुद नसलेली खालील कामे देखिल शहराच्या विकासकाच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे.

१) ॲम्ब्युलन्स खरेदी करणे

२) डास फवारणी साठी गाडया खरेदी करणे

३) दिशादर्शक कमानी, नामफलक बसविणे.

४) रु. २.०० लक्ष रक्कमेवरील कामांना मंजुरी देणे.

~~५) नगरसेवक निधीतील पाच वर्षापर्यंतचा एकत्र निधी वापरुन मोठे काम करणे.~~ वॉर्डमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे.

Dhawan

६) रस्त्याचे पुर्नपृष्ठीकरण, सुशोभिकरण करणे, पट्टे मारणे.

७) फूटपाथ, दुभाजक बांधणे, सुशोभिकरण करणे.

८) शाळा खोली बांधणे

९) बसस्थानके बांधणे, चौक बांधणे

१०) आरोग्य बुथ, पोलीस बुथ उभारणे

११) चौकात डेकोरेटीव्ह लाईट पोल बसविणे, सिग्नल यंत्रणा बसविणे.

वरील कामांचा नगरसेवक [illegible] प्रस्ताव निधित समावेश करण्यास व शासनाकडे प्रस्ताव पाठवून शासनाची मंजुरी घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- सौ. निर्मला [illegible] सावळे     अनुमोदन :- S. m. Koliyan सौ. शुभांगी कोटीयन

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

पिठासन अधिकार

PC-1/DK/2013-14/MT 2